**Dr. Narayan R. Varma**
**Head of the Department of History,**
**Smt. V.N. Mahila Mv. Pusad**
**Asst. Professor**
**E-mail ID : narayan varma67@gmail.com**



| Sr. No. | Tital of Research Paper | Year Publication | National/ International | Page No. |
|---|---|---|---|---|
| 1 | आधुनिक भारताच्या इतिहासात स्त्री उन्नती संदर्भात भारतीय स्त्री समाज सुधारकांचे कृतिशील योगदान एक ऐतिहासिक अध्य़यन | Research Journal of India Year 2020 | National | 1-4 |
| 2 | मध्ययुगीन कालखंडातील साहितय आणि लोक प्रबोधनातमक जागृती एक ऐतिहासिक अध्य़यन | Current Golbal Reviewer 2020 | International | 5-6 |
| 3 | 19 व्या शतकातील (प्रबोधनकाळ) स्त्री जीवन आणि भारतीय स्त्री | VIDYA WARTA 2020 | National | 7-11 |
| 4 | नक्षलवाद - भारतीय लोकशाही संसदीय शासन प्रणाली आणि विकासाला मारक एक अभ्यास | Ayushi 2020 | International | 12-15 |
| 5 | मानवी हक्क़ व हिंसा एक ऐतिहासिक अध्य़यन | UPA e Journal 2020 | National | 16-19 |
| 6 | स्वातंत्रयोध्दा कै. गोधाजीराव मुखरे यांचे भारतीय स्वातंत्र चळवळीतील योगदान | Shodhankan 2021 | International | 20-22 |
| 7 | भारतीय राज्य़घटना आणि महिला सबलीकरणाची ऐतिहासिक वाटचाल एक अध्य़यन | B. Aadhar 2021 | International | 23-26 |
| 8 | भारतीय स्वातंत्र लढयात विदर्भातील स्त्रीवादी नेतृत्वाचे आणि स्त्री चळवळीचे योगदान एक अभ्यास | ITHAS DARPAN 2022 | National | 27-32 |
| 9 | भारतावर ब्रिटिश आक्रमणाचे राजकीय जीवनावर झालेले परिणाम एक ऐतिहासिक चिंतनशील अध्य़यन | B. Aadhar 2021 | International | 33-36 |
| 10 | सामाजिक चळवळीत भारतीय स्त्री वर्गाचे योगदान एक ऐतिहासिक अध्य़यन | B. Aadhar 2021 | International | 37-41 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 11 | स्वामी विवेकानंद आणि त्यांची राष्ट्रवाद संकल्पना | World Champion Swami Vivekanand 2022 | National | 42-44 |
| 12 | भारतीय स्वातंत्र चळवळीत क्रांतीकारक व्यक्ती आणि त्यांचे विचार यांचे ऐतिहासिक अध्ययन | India @75 B. Aadhar 2022 | International | 45-49 |
| 13 | भारतीय स्वातंत्र लढा आणि भारतीय स्त्री वर्गाचे योगदान एक ऐतिहासिक अध्ययन | Contribution of Women in Indian Independence 2022 | National | 50-52 |
| 14 | प्रदुषनाची साधने त्याचे मानवी जीवनावर होणारे परिणाम आणि प्रदुषण नियंत्रणाच्या उपाययोजनाचे एक ऐतिहासिक अध्ययन | Vidya bharati | International | 53-56 |
| 15 | भारतीय स्त्री वर्गाच्या आत्मभान आत्मसन्मान व परिवर्तन घडवीण्यासाठी भारतीय स्त्री साहित्याचे योगदान एक ऐतिहासिक अध्ययन | NCE To CHE 2023 | International | 57-59 |

Research Journal of India / Vol. 7 / Issue 2 / Jan. 2020 / Special Issue / ISSN 2349-9370
Peer Reviewed National Indexed Journal with Impact Factor 5.455 (SJIF) / 88

# आधुनिक भारताच्या इतिहासात स्त्रीउन्नती संदर्भात भारतीय स्त्रीसमाज सुधारकांचे कृतीशील योगदान एक ऐतिहासीक अध्ययन

प्रा. डॉ. एन.आर. वर्मा
(इतिहास विभाग प्रमुख)
श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद
जि. यवतमाळ मो.नं. ९४२०७७३२०३

इतिहासाचे संशोधन करण्यासाठी अनेक साहित्याचा संदर्भानुसार अभ्यास करावा लागतो. संशोधनात सत्यता, वस्तूनीष्ठता निर्माण करावी लागते. पुर्वग्रह ठेउन संशोधन करणे इतिहासाला न्याय देणारे ठरणार नाही. आधूनिक भारताच्या इतिहास स्त्रीजीवन कसे होते? स्त्री समाज सुधारकांनी कोणकोणते कार्य केले? या सर्वांचा अभ्यास साहत्यांव्दारे परिक्षण, निरीक्षण करून अचूक पणे करणे आवश्यक ठरते.

आधूनीक भारत काळात तत्कालीन स्त्रीजीवन सर्व प्रकारच्या दु:खात, निराशमय, अंधकारमय, शोचनीय, दयनीय अवस्थेत जीवन जगत होती. स्त्रीजीवनाला स्व:ताहाचा आत्मा अगर आवाज सुध्दा नव्हता. नेक प्रकारच्या नरकमय यातना स्त्री जीवनाने भोगल्या आहेत. आजची स्त्रीजीवन पाहून १९, २० व्या शतकात हे घडले असेल का? असे प्रश्न अनेक स्त्रियांना आज येत असतील. पण ते सत्य आहे.

कारण भारतीय समाजात अनेक प्रकारच्या अंधश्रध्दा, वाईट चालीरीती, वाईट रूढी, परंपरा होत्या. त्या कुप्रथांनी स्त्री जीवन व्यापून टाकले होते. भारतीय समाजात अनेक प्रकारचे दोषस्थळे होती. सर्वत्र अशिक्षीतपणा, अडाणीपणाचा समाज होता. योग्य मार्गदर्शन करणारा कोणीच नव्हता. स्त्री जीवनाचे दु:ख, अन्याय, गुलामी दाखवीणारा कोणी नसल्यामूळे सर्वत्र दैववाद, नशिबवाद, अंधश्रध्दावाद वाढलेला होता. म्हणून स्त्री जीवन कुंठा अवस्थेत, निराशावादाच्या छायेत, अन्याय सहन करीत जीवन जगत होती.

तत्कालीन समाज स्त्री जीवनाकडे एक वापरण्याची वस्तू या प्रमाणे वागत होते. स्त्री जीवनाला स्वत:ची आत्मा, इच्छा, आकांक्षावाद नव्हता.अशा अवस्थेत ''स्त्री समाज सुधारकांनी'' आपल्या कार्यातून, व्यासपीठावरून, लेखनीव्दारे, आवाजाव्दारे स्त्रीजीवनाचे हक्क, अधिकार मांडून आशेचा किरण जागृत केला. त्या कर्तुत्वाची माहिती पुढील प्रमाणे.

## ताराबाई शिंदे –

- ताराबाई नी ''स्त्री पुरूष तुलना'' या ग्रंथाव्दारे १९ व्या शतकातील स्त्री जीवन, अन्याय, अत्याचार आणि विसंगतीची माहिती मांडून सांहसी, श्रेष्ठ कोण हा प्रश्न निर्माण केला. स्त्री जीवनाची हालाखीची, गुलामीची स्थिती मांडून याला पुरूष प्रधानता जबाबदार असे प्रश्न उपस्थीत केले. स्त्री जीवनाचा खरा वैरी कोण याचे उत्तर भारतीय समाजाने दयावे ही भुमिका मांडून स्त्री जीवना बद्दल हळहळ व्यक्त केली आणि जागृती घडवून आनली.

## पं. रमाबाई –

**रमाबाईनी तत्कालीन परिस्थीतीत स्त्री शिक्षण, स्वावलंबन, जागृतीवर भर दिला. स्त्री जीवनाने फक्त स्वयंपाक करावा, घरची कामे करावी, मुलाबाळांना सांभाळावे का? स्त्री जीवनाला पुस्तके वाचने, शिक्षण घेणे, ज्ञान मिळवीणे हा हक्क अधिकार नाही का? असे व्यासपीठाव्दारे, लेखनीव्दारे सांगून उठा भगिनींनो, डोळे उघडा, जाग्या व्हा, हा संदेश दिला.**

## श्रीमती रमाबाई रानडे –

**स्त्री जीवनाच्या सर्वकुप्रथा समाजाच्या आहेत हे स्पष्ट मत मांडून स्त्री जीवनाने शिक्षण घ्यावे, पुनर्विवाह करावा, स्वावलंबी बनावे हे सुचवीले.** स्त्री जीवनाला शकून, अपशकून, अपमान, टिंगल, टवाळकी का आहे हे

स्पष्ट करून शिक्षणा शिवाय उध्दार नाही ही शिकवण दिली. फक्त पोथीवाचने, धर्मकार्य करणे म्हणजेच स्त्री जीवन आहे का? हा प्रश्न केला. सर्व बंधने, मर्यादा, स्त्री जीवनालाच आहे का? हे तत्व मांडून स्त्री जागृती घडवून आनली.

एकंदरीत १९ व्या शतकात वरील स्त्री समाज सुधारकांनी आपल्या कृतीशील कार्याव्दारे आवाज उठवून स्त्री जीवनाचे प्रश्न मांडून न्याय, हक्क, अधिकार ची भाषा वापरली. तर २० व्या शतकात इ.स. १९१४ ते १९१८ या काळात पहले महायुध्द झाले. तेंव्हा स्त्रियांनी स्वतःचे प्रश्न मागे टाकून राष्ट्राच्या स्वातंत्र्य रक्षणार्थ कामास सुरूवात केली. लोकमान्य टिळकांना आपला राजकीय हक्क आपण मिळविलाच पाहिजे असे वाटत होते. स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे आणि तो मी मिळविणारच अशी त्यांची विचारसरणी होती. राजकारण आधी का समाजकारण असा प्रश्न समाजधोरणांमध्ये निर्माण झाला. लो. टिळकांनी राजकारणावर भर दिला तर आगरकर यांनी समाजसुधारणेला महत्व दिले.

महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी इ.स. १९१६ रोजी महला विद्यापीठाची स्थापना केली. महिलाश्रम स्थापन करून प्रथम विधवा स्त्रियांना शिक्षण देउन नवजीवन देण्याची त्यांची धडपड होती. प्रथम फक्त विधवा स्त्रियांसाठी असणाऱ्या या संस्थेने गरजु कुमारिका, परित्यक्ता, अनाथ स्त्रिया व मागासवर्गीय स्त्रियांनाही सामावून घेतले. १९२० मध्ये कर्वे यांनी स्थापन केलेल्या महिला विद्यापीठाला सर विठठलदास ठाकरसींनी खुप मोठी देणगी दिली. त्यामुळे या विद्यापीठाचे नाव श्रीमती नाथीबाई महाराष्ट्र आणि गुजरामध्ये शाखा निर्माण झाल्या. स्त्री शिक्षणाला गती मिळाली, शिक्षणाने स्त्रियांना स्वतःकडे पाहण्यास शिकविले.

इ.स. १९३० नंतर च्या काळात मध्यम वर्गातील सुशिक्षित स्त्रिया परदेशी कापडाच्या होळीमध्ये भाग घेउन स्वातंत्र्याच्या चळवळीत उतरल्या. सुतकताई करणे व परदेशी कापडाला खादीचा पर्याय निर्माण करणे, हा कार्यक्रम स्त्रियांनी सोयीचा होता. अहिंसेच्या ठरतील हा गांधीजींचा विश्वास होता. त्यामुळे स्त्रियांचा आधिकाधिक सहभाग असण्याच्या दृष्टीने त्यांनी प्रयत्न केले. १९३० च्या दांडीयात्रेत, पिके टिंगमध्ये, सत्याग्रहात, कायदेभंगाच्या चळवळीत स्त्रियांनी मोठया संख्येने भाग घेतला. गांधीजीनी स्त्रीदास्यविमोचनाच्या चळवळीची राजकीय आंदोलनाशी सांगड घातली. कृतिशील राजकारण स्त्रियांनी प्रवेश केला. उच्चकुलीन स्त्रीपासुन ते कामगार स्त्रीपर्यंत स्त्रिया थेट रस्त्यावर आल्या. यातून स्त्रियांमध्ये नव सामर्थ्य व आत्मविश्वास निर्माण व्हायला फार मोठे साहाय्य लाभले. स्त्रीला तिच्या सर्वांगीन शोषणाविरूध्द लढयाला त्यामुळे आपोआपच दिशा मिळाली. गांधीजी म्हणत स्त्री–पुरूष हयांच्यातील शोषणाचे नाते लैंगीक व्यवहाराशी निगडीत आहे. बाईपणा आणि पुरूषपणा बाजूला ठेवून स्त्री–पुरूष जर सामाजिक राजकीय कामासाठी राष्ट्र उभारणीच्या उच्चतर ध्येयासाठी एकत्र आले तर खऱ्या अर्थाने स्त्रिया निर्भय होतील आणि सार्वजनिक जीवनात योगदान देउ शकतील आणि झालेही तसेच. गांधीजींच्या प्रेरणेने स्त्रिया स्वतःला सिध्द करण्याच्या दिशेने पांवले उचलू लागल्या. आंदोलनात सामील झाल्या.

इ.स. १९२७ मध्ये अखिल भारतीय महिला परिषदेचा जन्म झाला. पहिले अधिवेशन पुण्यास होउन स्त्री शिक्षणाच्या स्वास्थासंबंधी चर्चा झाली. एक शिक्षण योजना तयार केली गेली. १९२८ मध्ये सरकारने हंटिंग कमशिन नेमून हिंदूस्थानातील शिक्षणांची पाहणी केली. महला परिषदेने सरोजिनी नायडू यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ पाठवून आपली शिक्षण योजना कमशिनला सादर केली. डॉ. ॲनी बेझंट, डॉ. मधुलक्ष्मी रेड्डी, मिसेस पी.के. सेन, बेगम हमीद अल्ली, लेडी रूस्तमजी फर्दुनजी, अमृत कौर यासारख्या स्त्रियांच्या कमशनपुढे साक्षी झाल्या.

सुभाषचंद्र बोस यांच्या राष्ट्रीय लष्करातही याच काळात कॅप्ट लक्ष्मी यांच्या नेतृत्वाखाली स्त्रीयांची फलण उभी राहिली होती. तर दुसरीकडे हजारो दलित स्त्रियाही सामील झाल्या. १९२९ च्या गरण्यांच्या सार्वत्रिक संपाचे नेतृत्व उषाताई डांगे यांनी खंबीरपणे पेलले होते. एकुणच या काळात स्त्रिया निर्भय होउन घराबाहेरच्या सार्वजनिक जीवनात योगदान द्यायला पुढे झाल्या होत्या. १९२७ मध्ये अकोला येथे एका धर्मनिर्णय मंडळाची स्थापना झाली तेथे झालेल्या ब्राम्हण परिषदेत ब्रम्हीभुत प्रज्ञेश्वर यांनी विधवांच्या केशवपनावर चर्चा करून एक ठराव पास केला. त्यात म्हटले होते की, सकेशा विधवांना कोणत्याही प्रकारे अशुभ मानू नये. श्राध्द–पक्ष, कुळधर्म, कुळाचार, नैवेद्य, उपनयन, विवाहसंस्कार व धार्मिक मंगल प्रसंगी त्यांनी सध्द केलेले अन्न निषिध्द मानू नये. त्यांना परमार्थिक धर्मकृत्य करण्याचा पूर्ण अधिकार आहे. या चेंमुळे पतिनिधनानंतर स्त्रियांना केशवपन करण्यास प्रवृत्त केले जात होते त्याला आळा बसला. जुनाट परंपरा असणाऱ्या भारतीय समाजात लैंगीक शिक्षण आणि संततिनियमनाच्या शिक्षणांची गरज होती. त्यासाठी रघुनाथ कर्वे आणि त्यांची पत्नी

यात स्त्रियांची प्रगती खुंटली आहे. वा त्यांची पिछेहाट होत आहे असा निष्कर्ष त्यात काढलेला होता. त्यामुळे समाजात सर्वत्र खळबळ माजली.

पंचवार्षिक योजनांअतर्गत विकास प्रक्रियेतून स्त्रियांचे प्रश्न बाजूला पडून, स्त्रियांना अधिकच दारिद्रय अन् दुय्यमता मिळत गेली. यंत्रसामुग्रीमुळे शेती क्षेत्रातील रोजगाराची घट स्त्रियांच्या वाटयाला आल्याचे लक्षात आले. वाढत्या लोकसंख्येचे खापर स्त्रियांच्याच माथी फोडून कुटूंब नियोजन–नसबंदीचे लक्ष्य गाटण्यासाठी स्त्रियांवरच दडपशाही लादल्याचे लक्षात आले. तशातच १९६० नंतर जगभर उभ्या राहिलेल्या स्त्रीमुक्ती आंदोलनाचे पडसाद आपल्या देशातही उमटत गेले. या पार्श्वभुमिवर विविध स्तरावर संघर्ष देण्याची निवड आपल्या देशातही स्त्रियांना भासू लागली आणि त्यातुनच स्त्रियांच्या चवळी उदयाला आल्या. भारतीय महिला फेडरेशन, समाजवादी महला सभा अशा स्त्रियांच्या संघटना स्त्री अन्यायाविरूध्द चळवळ उभ करू लागल्या. स्त्री सुधारणेसाठी कायदे झाले तरी स्त्री जीवनात म्हणावे तसे लौकीकार्थाने परिवर्तन झाले नाही. शासकिय, योजनांमधून स्त्रियांना कामे मिळावीत, शासकीय नोकऱ्यांमध्ये राखीव जागा मिळाव्यात या मागण्या अखिल भारतीय महिला फेडरेशन ने केल्या. अविवाहित मुलींना नोकरी देणे आणि विवाहानंतर त्यांना काढून टाकणे या धोरणाविरूध्द फार्मस्युटिकल एम्प्यलॉईज फेडरेशने मोहीम उभारली. समान वेतन कायदा १९७५ ला होउनही त्याची अंमलबजावणी होत नसल्याने नारीमुक्ती संघटनेने लढा सुरू केला.

१९७५ च्या आंतराष्ट्रीय महिला वर्षात पदार्पण केलेल्या स्त्रियांच्या हाती १९७४ वा भारतातील स्त्रियांची स्थिती हा अहवाल आलेला होता. त्यात असे म्हटले होते की, पुरूषवर्गाच्या तुलनेत महलावर्गाची घटत जाणारी संख्या व कमी होत जाणारी आयुमर्यादा, प्रसुती काळातील स्त्रियांचे वाढते मृत्यू स्त्रियांच्या कामातला कमी होणारा सहभाग, स्त्रियांमधील निरक्षरता यांच्या आकडेवारीतून आजवरच्या विकासाचा भारतीय स्त्रीवर झालेले परिणाम हे विपरीत कसे आहेत तै निरीक्षणात मांडले होते त्यातूनच संयुक्त राष्ट्रसभेने १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणन घोषीत परिषदेच्या निमित्ताने स्त्रीमुक्ती संघटना जन्माला आली. स्त्री मुक्तीची ललकारी हे गाण्याचे पुस्तक प्रसिध्द करण्यात आले ज्योती म्हापसेकर लिखित मुलगी झाली हो या पथनाटयाचे प्रयोग सादर होउ लागले. १९७५ हे वर्ष आणि त्यानंतरचे दशक आंतरराष्ट्रीय महिला दशक म्हणून घोषित करण्यात आले होते. त्यानंतर महिला दक्षता समिती स्त्री आत्याच्यार महिला मंच स्त्री, स्त्री आधार केंद्र, मोलकरीन संघटना, स्त्री मुक्ती संघटना अशा अनेक स्त्रिविषयक चळवळी निर्माण झाल्यात. त्यानंतर भारत सरकार मध्ये मनुष्य बळ विकास मंत्रालयात महिला व बालविकास हे खाते नव्याने सुरू झाले. त्या खात्यामार्फत स्त्रीयांसाठी विविध योजना आणि विकास महामंडळे स्थापन होउन कार्यान्वीत झाल्यात. त्यानंतर स्त्रियांना मारहाण, बलात्कार, हुंडयाच्या संदर्भात छळ, स्त्रि गर्भपात अशा स्त्रियांच्या समस्या निर्माण झाल्या. तोपर्यंत स्त्रियांना समान कामानुसार समान वेतन मिळत नव्हते यासाठी स्त्रि समाजात जागृतीला प्रारंभ झाला.

एकंदरीत २० व्या शतकात स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोन बऱ्याच प्रमाणात परंपरागत होता. नौकरीच्या ठिकाणी स्त्रीला अनेक अडथळे निर्माण झाले. स्त्री वर्गावर चारित्र्याचे शिंतोडे उडविण्यात आले. स्त्रीने स्वावलंबी होउ नये असे माननारा सुध्दा वर्ग होता, पण घरच्या विकासासाठी स्त्री नोकरी करू लागली. कलांतराने घरकामासाठी मालकरीन ठेवण्यात आली त्यातुन मोलकरनीचे प्रश्न निर्माण झाले. आपल्या पुरूष प्रधान संस्कृतीने स्त्रीवर्गाची अहवेलना केली. त्यामुळे स्त्री संघटनाने कायदेशिर मार्गाने मदत मिळविण्यास सुरूवात केली. १९६० ते १९७५ या काळात स्त्रियांना व्यक्ती स्वातंत्र्याची चाहुल लागली त्यातुन स्त्री चळवळीशी संबंधी अनेक स्त्रियांनी स्त्रीवादी विचार मांडण्यासाठी आपल्या व्यासपीठ निर्माण केले. त्यातुन स्त्रीवादी चळवळीची व्याख्या निर्माण केली. या स्त्रिवादी संघटना राजकीय विचार धोराविरूध्द नसुन पुरूष प्रधान व्यवस्थे विरूध्द आहे हे स्पष्ट झालेले दिसुन येते. स्त्री सक्षमीकरण हा शब्द त्यामध्येनिर्माण करण्यात आला. त्यातुन स्त्रियांना अनेक क्षेत्रात आरक्षण मिळावे अशी मागणी या स्त्रीवादी चळवळीने चालु ठेवली. त्यामधुन इ. स. १९९३ मध्ये पंचायत राज व्यवस्था निर्माण झाली. या पंचात राज कायद्यानुसार स्त्रियांनासुध्दा आरक्षण मिळाले हे आरक्षण स्थानिक स्वराज संस्थामध्ये मिळाले आहे. एकंदरीत पुरूष प्रधान संस्कृतीने स्त्रीवर्गाला सत्येच्या परिघा बाहेर ठेवण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. पण तो प्रयत्न स्त्री मुक्ती संघटना संघर्ष करून आपले हक्क अधिकार मिळविण्याच्या प्रयत्नात आहेत. हीच खरी स्त्री उन्नती होय.

संदर्भ ग्रंथ व टिपा :


१. रानडे प्रतिभा – स्त्री प्रश्नाची चर्चा – प्रकाशक – पदमगंधा प्रकारान, पुणे २००५
२. रानडे रमाबाई – आमच्या आयूष्यातील काही आठवणी– प्रकाशक – समन्वयक प्रकाशण कोल्हापूर, २०१२
३. वैद्य सरोजीनी – श्रीमती काशिबाई –कानिटकर आत्मचरित्र आणि चरित्रे – पापूलर प्रकाशन, १९८०, मुंबई
४. डॉ. कर्वे स्वाती – स्त्री विकासाचे नवे क्षितीज – प्रकशक – प्रतिमा प्रकाशन पुर्णे – २००८
५. डॉ. वैद्य सुमन, डॉ. कोठेकर शांता – स्वातंत्र भारताचा इतिहास (१९४७ ते १९८६) प्रकाशक – साईनाथ प्रकाशन नागपुर – २००४
६. डॉ. पाटील भिना – खांदेशातील समाज प्रबोधनाची चळवळ (१९०० ते १९५०) प्रकाशक – भुषण पाटील पाचोरा (जळगांव) २००५
७. महाराष्ट्र शासन अभ्यास मंडळ – महाराष्ट्राचा इतिहास – प्रकाशक – महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे – २०१२
८. डॉ. पगार एकनाथ – प्रबोधन परंपरा व वृत्तपत्र सृष्टी – प्रकाशक – यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, २००६
९. संपादक मंडळ – स्वातंत्र्य उत्तर वाडमयीन प्रवाह – प्रकाशक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, २००६
१०. संपादक – शिक्षण संक्रमण (मासिक मार्च २०१२)
११. संपादक – मिळुन साऱ्याजनी (मासीक मार्च २०१२)
१२. डहाके वसंत आबाजी – मराठी साहित्य इतिहास व संस्कृती प्रकाशक – पापूलर प्रकाशन, मुंबई २००५


❖❖❖

| CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | | ISSN- 2319-8648 |
|---|---|---|
| Impact Factor - (SJIF) – 7. 139 Special Issue - 101 ,Vol. II | Jan. 2020 | Peer Reviewerd |

5

# "मध्ययुगीन कालखंडातील साहित्य आणि लोकप्रबोधनात्मक जागृती एक ऐतिहासिक अध्ययन"

**डॉ. एन. आर. वर्मा**
(इतिहास विभाग प्रमुख), श्रीमती व.ना.म.महा. पुसद जि. यवतमाळ

---

मध्ययुगीन काळाचे इतिहासाचे संशोधन करतांना तत्कालीन शास्त्रीय दृष्टीकोना सोबत तत्कालीन साहित्य विषयक माहिती चे विश्लेषन करावे लागते. कारण वास्तववादी प्रमाण अधिक महत्वाचे ठरतात. साहित्याचा तुलनात्मक अभ्यास करुन माहिती, आकडेवारी संकलीत करुन संशोधनाला एक योग्य दिशा दिल्या जाते आणि योग्य निष्कर्ष काढल्या जाते.

वास्तविक पाहता इतिहासाचे लेखन सत्य, वस्तूनिष्ठ असावे लागते. भूतकाळाचे निरीक्षण करुन, तथ्य शोधून ऐतिहासीक अध्ययन करणे आवश्यक ठरते.

इतिहास हा विषय कालखंडावर आधारीत आहे. प्राचीन, मध्ययुगीन, आधूनीक या कालखंडातील सर्व घटना, घडामोडी, स्थिती, त्यामधील बारकावे ची माहिती दिली असते. या सर्वांना एकत्रीत करणारा दुवा म्हणजे साहित्य पुरावा. साहित्य शिवाय आजचे संशोधन पूर्ण होत नाही. कारण साहित्य तत्कालीन तत्वाचा, घटनांचा पुरावा असतो. इतिहास व साहित्याचा घनिष्ठ संबध आहे. कारण साहित्य संबंधीत वर्तमान चा भाष्यकार असतो. साहित्यात तत्कालीन समाज, धर्म, संस्कृती, रितीरीवाज, कार्य प्रणालीचा आरसा असतो. तत्कालीन घटना, घडामोडीचे वस्तूनिष्ठ चित्रण त्यामध्ये समावलेले असते. कोणत्याही कालखंडासाठी साहित्य पार्श्वभूमी असते म्हणून साहित्याची भुमिका नाकारता येत नाही. साहित्याने इतिहासाची, भूतकाळाची मांडणी करणे सोपे जाते. मध्ययुगीन कालखंडातील ऐतिहासीक अध्ययन सुध्दा साहित्यीक पारदर्शकता दर्शवीतात. त्या काळातील चित्रण रेखांकीत करतात.

मध्ययुगीन कालखंडात सर्व सामान्य जनता अशिक्षीत, धर्मनिष्ठ, पिडीत, शोषीत, गुलामगीरी चे जीवन जगणारी, लाचारी, निराशाभाव, दारिदय जीवनमान, अंधश्रध्दा, परंपरा जपणारी होती. सर्वसामान्य अशिक्षीत जनतेला जीवन जगण्याचा मार्ग माहितच नव्हता. राजेशाही, सुल्तानशाही, सरंजामशाही ने व्यापलेली राजकीय व्यवस्था असल्यामुळे सर्व सामान्य जनतेचा कोणीच वाली नव्हता. अशा निराशावादी समाजात आशेचा किरण निर्माण करण्याचे कार्य साहित्याने केले व लोक प्रबोधन, लोकशिक्षण, जागृती घडवून आनन्याचे महान कार्य केले. त्याची माहिती पुढील प्रमाणे.

**संतवाड:मय -**

संत म्हणून ओळखले जाणारे सर्वजण वारकरी संप्रदाय किंवा पंथ मध्येच मोडतात. या सर्व संतानी आपले साहित्य सर्व सामान्य बोलीभाषेत, लोकरंजन, संगीत चा वापर करुन समाजला जागृत करण्याचे कार्य केले. अभंग, भुपाळी, ओवी, श्लोक, गोंधळ, भारुड, जागरण, आरती या साहित्याचा वापर करुन लोक संवाद साधन्याचे कार्य केले. संत ज्ञानेश्ववर, तुकाराम, एकनाथ, सावतामाळी, संत जनाबाई यांच्या कार्याने व त्यामधून निर्माण झलेल्या साहित्याने भारतीय समाजाला भावनीक, शारीरिक एकत्र करुन मने जोडण्याचे कार्य केले. लोकगीते, भारुडे, किर्तन, च्या माध्यमातुन सोवळे-ओवळे भेद नाहीसा केला. शुभ-अशुभ, मोक्ष-मुक्ती, बंधनातून समाजाची सुटका करण्याचे कार्य केले. समाजात खऱ्या अर्थाने समानता, बंधूभाव निर्माण केले. देवदेवतांची पुजा निषीध्द ठरवून पोथीबंद विचार मांडले.

संतवाड:मयाने क्रांतीकारी साहित्य मांडून समाजात जागृती सर्जनशीलता आनली. धर्मवेडेपणा, सनातनी लाटा थांबवण्याचे कार्य केले. जून्या धर्मग्रंथाची मक्तेदारी मोडून परिवर्तनवादी समाज निर्माण करण्याचे कार्य केले. त्यामूळेच पिढयान पिढया दबून गेलेला वर्ग, समाज जागृत होऊ लागला. या वारकरी चळवळीत संत नामदेव यांनी विद्रोही विचार मांडले. अभंगाच्या माध्यमातुन महाराष्ट्रात आणि पंजाब मध्ये आपले विचार मांडून सर्वधर्म समभावाचे सिध्दांत जागृत केले. संत नामदेवांनी दु:ख, दारिदय चे साहित्य मांडून लोकप्रबोधन घडवून आनले. एकंदरीत सर्व संतानी आपल्या मौखीक, काव्य रचनेतुन अविष्कार माडून सुधारणावादी चळवळ निर्माण करण्याचे कार्य केले. या संतांना भारतीय समाजाने छळण्याचे कार्य केले. तरीपण पुराण, प्रवचन सोबत गोधड, जागरण सप्ताह, पालखी, काला, दिंडी, वारी, भजन याला सुध्दा महत्व देण्याचे कार्य केले.

किर्तन या प्रकारात भक्त मंडळी एकत्र जमते. त्यामध्ये टाळ, मृदंग, वीणा, संगीत असते. किर्तनकार सामूहीक गजर करायला लावतो. टाळया याव्दारे श्रोते देहभान विसरतात. त्यामधून निरक्षर लोकांना प्रबोधन घडवून आनन्याचे कार्य केल्या जाते. किर्तन एकप्रकारे ग्रामीण-अशिक्षीत जनतेचे मुक्त व्यासपीठ होय. यामधून परस्पर बंधूभाव वाढून जातीभेद नष्ठ होण्यास हातभार लागतो.

दिंडी, यात्रा मधून अनेक लोक-समाज एकमेकाशी जोडल्या जातो. संताच्या जन्मस्थळी दिंडी, यात्रा भरते. देहू, आळंदी, पैठण, मंगलवेढे, तेर, एदलबाद या ठिकाणी दिंडी चे केन्द्र आहेत. दिंडी च्या मार्फत भजन, भारुडे चा जागर होतो. लोकांच्या भेटीगाठी होतात. ऐक्य व बंधूभाव जोपासने यातून शक्य होते.

एकंदरीत संत वाड:मयातून मध्ययुगीन कालखंडात जी राजकीय, सामाजिक, सांस्कृतीक, धार्मिक अंधाधुंदी होती. लोकामध्ये निराशावाद होता. सर्वस्तरावर विषमता वाढली होती. सर्वत्र दु:खाचा डोंगर होता. तो दुर करुन परमेश्वर, भक्ती चे वेड लावून जनतेत सहकार्य बंधूभाव निर्माण करण्याचे कार्य संतवाड:मयाने केले. त्यामधून निश्चित मनोरंजनात्मक प्रबोधन घडून आले. सर्वसामान्य ग्रामीण



5

CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7. 139 | Special Issue - 101 ,Vol. II | Jan. 2020 | Peer Reviewerd

(6)

जनतेच्या दु:खाच्या वेदनेला फुंकर घालणे शक्य झाले. म्हणूनच संतवाङ:मयाने लोक प्रबोधनात्मक जागृती घडवून आनली हे मान्य करावे लागेल.

**शाहिरीवाङ:मय -**

महाराष्ट्रातील लोकसाहित्यामध्ये शाहीरी, पोवाडा, हे स्फुर्ती देणारे, वीररस उत्पन्न करणारे मराठी साहित्य होय. महाराष्ट्रात शाहीर काव्याने, पोवाडयानी लोकांच्या मनात घरकरुन आपल्या पूर्वजाच्या गाथा, आख्यायीकांना महत्व दिले. शाहिर लोकांनी पोवाडयाच्या माध्यमातून देशभक्ती चे बीज सर्वसामान्य लोकांना रोवणचे कार्य केले. लोकभावनेचा आदर करुन, लोकांना हवे असणारे शब्द पोवाडे किंवा शाहिरी मार्फत मांडून भुतकालीन इतिहास जिवंत करण्याचे कार्य केले. शाहीरी वाङ:मयात पोवाडे, लावणी, डफळयावरती गाणे, फटके, भुपाळी, गौळण हे प्रकार येतात. वीर, थोर लोकांनी स्तूती, किर्ती सांगून इतिहास रंगवीला जातो. शाहीर पोवाडे गुणकौशल्याने भरले असून ते सामर्थ्यांचे प्रतिक आहे. तत्कालीन लढाई, यूध्दे, पराक्रम, वंशावळ ची माहिती यामध्ये मांडलेली असते. शाहिर वाङ:मयात वीररस उत्पन्न होतो. हे काव्या जनतेत चेतना, स्फुर्ती निर्माण करतात. या वाङ:मयात लोकांच्यारीती, समजूती, असून लोकरंजन, लोकशिक्षण मांडून जाणीव, जागृती निर्माण करण्याचे कार्य केले जाते. शाहीर हे अल्पशिक्षीत असतात पण पठन, पाठांतराने लोकांसमोर पोटतिडकीने पराक्रमी व्यक्तीची भुमीका मांडतात. यामध्ये परखड विचार, शब्द मांडलेले असतात. आवेश, जोश, आवाजातील चढ-उतार या रचनेव्दारे शाहिरीकाव्य मांडले जाते. हे काव्य राजकीय व सामाजीक जीवनाचे प्रतिबींब आहे.

शाहिरांनी भाषाशैलीव्दारे पोवाडे या काव्याव्दारे सैन्य, शस्त्रे, पराक्रमी व्यक्तीची वंशावळ, मोहीम, दैन्यअवस्था, देशस्थीती ची बाजू मांडली व तत्कालीन चित्र मांडण्याचे कार्य केले. एकंदरीत या वाङ:मयाने मराठी समाज, त्यांच्या गाथा उत्पन्न करुन समाजात एकोपा निर्माण करण्याची भुमिका मांडली. म्हणूनच शाहिर वाङ:मय हे लोक प्रबोधनाचे जागृत कृतीशील केंद होते हे मान्य करावे लागेल.

**बखर वाङ:मय -**

बखर म्हणजे खबर, बातमी होय. बखर वाङ:मयात तत्कालीन घटना, घडामोडी रंगवीले जात असून ऐतिहासीक प्रसंगाचे, व्यक्तीचे चित्रण केले जाते. बखर वाङ:मयात राजकीय, सामाजीक, स्वरुपात अख्यायीका, सांगोसांगी बातम्या असतात. एखादया प्रसंगात बखर कार त्या व्यक्तीला बोलते करतो. वेळ, काळ पाहून प्रसंग चित्रे उभे केली जातात. प्रत्यक्ष यूध्दाचे प्रसंग उभे करुन सत्यता मांडण्याचे कार्य केले जाते. एकंदरीत जी घटना घडली तीचे वर्णन वार्ता स्वरुपात कळवीण्याचे कार्य बखरकार करतो. पण हे करीत असतांना भाषा, अलंकार कलात्मक पध्दतीने मांडतो. बखर कधी कधी सजवलेली असते. यामध्ये म्हणीचा प्रचंड वापर केला जातो. म्हणूनच हा वाङ:मय प्रकार सत्य मानावा का? असे बोलल्या जाते. परंतू जो पर्यंत विरोधी पूरावा मिळत नाही तोपर्यंत ही घटना सत्य आहे हेच सर्व अर्थाने मान्य केल्या जाते.

बखर या वाङ:मयात युध्दकौशल्य, व्यक्ती सापेक्ष पराक्रम व दर्शन, नियोजन, राष्ट्रभक्ती, स्वाभीमान, रणकौशल्य दाखवून तत्कालीन परिस्थीचे चित्रण केले जाते. मध्युगीन कलखंडात मराठेशाही च्या उदयानंतर बखर करांना महत्व प्राप्त झाले. पानिपत युध्दाचे वर्णन, नाना फडणीसाचे कार्य, छ. राजाराम महाराजांचे कार्य, छत्रपती शिवाजी महाराजे शौर्य, चतुराई, प्रत्यक्ष रंगवीण्याचे कार्य बखर करांनी केले. या वाङ:मय प्रकारात चरित्र, आख्यान, हकीकत, कैफीयत, आत्मवृत्त चा सुध्दा समावेश केला जातो. काही बखरी विशिष्ठ राजकिय आज्ञेवरुन लोकभाषेत लिहण्यात आल्या. त्यामधील विचार, घटना, घडमोडी त्या जीवनाचे, स्थितीचे वर्णन करीत असते. एकंदरीत या साहित्याचे प्रबोधन घडवून आनले.

**महानुभाव वाङ:मय -**

मध्ययुगीन कालखंडात तेराव्या शतकात महानुभाव पंथ उदयास आला. या पंथांने मराठी भाषेत वाङ:मय निर्मीती करुन सामाजिक विषमता, अंधश्रध्दा, जातीयवाद, व्रतवैफल्य चा प्रभाव नाहीसा करण्याचे कार्य केले. कारण त्या कालखंडात ज्ञानभाषा लोकांना समजत नव्हती. म्हणुन श्री चक्रधर स्वामी यांनी मराठी भाषेतून आपले विचार मांडून सर्व सामान्य जनतेचे शोषन थांबवीण्याचे कार्य केले. धर्मांच्या नावाखाली वागवल्या गेलेला समाज होता. अशा गांजलेल्या समाजाला दिलासा देऊन आधार देण्याचे कार्य श्री चक्रधर स्वामी नी केले. तत्कालीन सर्व सामान्य जनता ज्ञाना पासून दूर होती. म्हणून त्यांनी लोकभाषा चा आधार घेऊन साध्या, सोप्या शब्दात आपले विचार मांडले. श्री चक्रधर स्वामी यांनी पारंपारीक सनातनी मूल्य बाजूला सारुन मानवतावादी विचाराची समाजात पेरणी केली. धर्माची दोर मोकळी करण्याचे कार्य महानूभाव पंथाने केले.

महानुभाव पंथाने आपले तत्व, विचार साहित्यात मांडून लोक समजूती, रुढी परंपरा चे जाळे नष्ठ केले. या वाङ:मयाने मराठी भाषा समृध्द केली व दैवतांची, व्रतवैफल्याची मक्तेदारी संपवीण्यासाठी हातभार लावला. रिध्दपूर हे महानूभाव पंथाचे पवित्र महाक्षेत्र आहे. एकंदरीत महानूभाव वाङ:मयाने विषमतेने पिडीत लोकांसाठी विचार मांडून दैववाद संपवीण्यास हातभार लावला. सारांश रुपाने निष्कर्ष हाच की, वरील सर्व वाङ:मय प्रकार व साहित्याने लोकजागृती, प्रबोधन, शिक्षण, देऊन लोकांची मने जोडली व लोकांचा अंध्दविश्वास दूर केला.

**संदर्भ ग्रंथ -**

१) गदे, डॉ. प्रभाकर. इतिहास लेखनाच्या परंपरा, मंगेश प्रकाशन, नागपूर
२) कुलकर्णी, डॉ. अजय., वाटाणे, डॉ. राजेन्द्. (संपा) संशोधन क्षितीज, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर, २०१८.
३) दिक्षीत, नी. सी. आधूनीक भारत व महाराष्ट्र, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर, २०१२
४) (संपा) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ - मध्ययुगीन वाङ:मय प्रवाह नाशिक व त्यांचे मंडळ, २००२

17

# १९ व्या शतकातील (प्रबोधनकाळ) स्त्री जीवन आणि भारतीय स्त्री जीवनाचे बदलते स्वरूप एक ऐतिहासीक अध्ययन

**प्रा. डॉ. एन.आर. वर्मा**
संशोधक, इतिहास विभाग प्रमुख,
श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय,
पुसद, जि. यवतमाळ

**********

भारतीय स्त्रीयांचे कालखंडानुसार, स्वरूप बदलत चाललेले दिसून येते. कारण महाराष्ट्राच्या इतिहासाचा विचार केला असता इ.स. १८१८ मध्ये पेशवाई च्या समाप्ती नंतर ब्रिटीश राजवट सुरू झाली आणि मुंबई प्रांताचे तत्कालीन गव्हर्नर माऊट स्टुअर्ट एलफिन्स्टन याने इंग्रजी सत्तेचे पानेमूळे भारतात खोल रूजवीण्यासाठी उदारमतवादी, दुरदृष्टी, व्यवहारवादी धोरणाचा पुरस्कार केला. इंग्रजी राजवटीत भारतीय समाज, जनतेच्या मनात, भावनेत शिरण्यासाठी विश्वास आणि जागृतीचे धोरण अंगीकारले गेले. त्यामूळे भारतीय समाजात बदल, परिवर्तन घडू लागले. माऊंट स्टुअर्ट एलफिन्सन याने आपल्या काळात इंग्रजी ज्ञानाचे भांडार भारतीय जनतेसाठी मोकळे, खुले केले. त्यामूळे इंग्रजी शिक्षण, ज्ञान, भारतीय समाज, जनतेला मिळण्यास सुरूवात झाली. महाराष्ट्रातच मुद्रण कला, पाठयपुस्तके, पुस्तक निर्मीती होऊ लागली. त्यामूळे पेशवाईच्या काळातील शिक्षण व्यवस्था कालबाहय झाली. बुध्दीवाद, तर्कवाद, शब्द प्रामाण्यवाद, भौतीकवाद, विज्ञानवाद, विचारवाद चर्चा, वादविवाद ला महत्व प्राप्त झाले..

१९ व्या शतकात महाराष्ट्रातील जगन्नाथ शंकर सेठ, डॉ. भाउदाजी लाड, जमशेटभाई, बाळशास्त्री जांभेकर, गंगाधरशास्त्री फडके, दादोबा पांडुरंग या समाज सुधारकांनी इंग्रजी शिक्षणासाठी भारतीय जनतेच्या मनात अपूलकी ची भाषा निर्माण केली. त्या धोरणामूळे इ.स. १८२९ पर्यंत भारतात नउ शाळा निघाल्या. त्यामध्ये ४०० मूली तेव्हा शिकत असत. हळूवारपणे शिक्षणाला सुरूवात झाली.

इंग्रजी शिक्षणाच्या माध्यमातून भारतीय समाज व्यवस्थेवर अमूलाग्र बदल, परिवर्तन, आत्मपरिक्षण, चिंतन, मनन, घडून आले. स्वातंत्र, समता, बंधूता, लोकशाही, वैचारीक जागृती मोठया प्रमाणात घडली. परिवर्तनवादी विचार मांडले जाउ लागले. मुर्तिपुजा, जातीभेद, धर्म संक्लपना यावर टिका, वादविवाद घडू लागले. या नवशिक्षणाने भारतीय समाजाचा दृष्ट्रीकोन बदलवीला. भारतीय समाजात धर्म, रूढी, परंपरा, वाईट प्रथा, कर्मकांड, अंधश्रध्दा याचे मोजमाप सुरू झाले. कोणत्याही गोष्टी आपन किती प्रमाणात स्विकारले पाहिजे याचा आलेख भुमिका मांडल्या जाउ लागली. आत्मपरिक्षण, मुल्यांकन चर्चा ची लाट निर्माण होउ लागली.

एकंदरीत भारतीय समाज इंग्रजी शिक्षणाच्या, ज्ञानाच्या स्पर्शाने जागृत झाला. आपले उज्वल भविष्य आता कशात आहे हे त्याल कळू लागले. शिक्षणातून गरजेच्या नव्या संधी हे समीकरण तयार झाले. जुन्यासंस्था परंपरावादी श्रध्दा, मुल्ये ची गुंतागुंत आता परिवर्तनवादी, ध्येयवादी होउ लागली ते पुढील प्रमाणे –

**१९ व्या शतकातील (प्रबोधन काळातील) भारतीय स्त्री जीवन –**

“भारतीय समाज नवजागृती, नव शिक्षण, नवज्ञान घडवीणारा काळ म्हणजे प्रबोधनकाळ होय.” या प्रबोधन काळात बुध्दी, विचार, तत्वे, आत्मपरिक्षण, शोध, चिंतन, मनन, मोठया प्रमाणात घडले आणि परंपरावादी मुल्येचे परिक्षण करण्यात आले.

प्रबोधन काळात स्त्री जीवनाकडे पाहण्याचा भारतीय दृष्ट्रीकोण प्रतिगामी, परंपरावादी, आणि समजिक नियमाचे बंधने मान्य करणारा होता. शास्त्रात जे म्हटले आहे ते मान्य करावेच लागेल असा हा काळ होता. धर्म परायनता, रूढी बंध्दता परकोटीला

पोहचली होती. वडिलधाऱ्या मंडळींचा शब्दप्रामण्य मानणारा हा काळ होता. स्त्रियांनी वास्तवादी विचारांची चिकित्सा करू नये, नवे सिध्दांत मान्य न करणारा हा काळ होता. नवनिर्माण केलयापेक्षा धर्मवादी, पुराणप्रिय, दैववादी, नशिबवादी समाज होता. भारतीय स्त्री म्हणजे मेणाचा गोळा, आपल्या मालकीची वस्तू, या प्रमाणे पाहिल्या जात असे.

भारतीय स्त्रीने जीवन जगतांना आपल्या डोळयांनी काय पहावे, पाहुनये, काय बोलावे, बोल नये, काय ऐकावे, काय ऐकू नये या पध्दतीच्या मान्यता होती. स्त्री म्हणजे विवाहाची वस्तू, तीने घराची काम करावी, सासु—सासरे ची मर्जी संपादन करून पतिच्या घरात रहावे, पतिच्या कुटुंबातील इतर व्यक्तिंची सेवा करावी, पति साक्षात परमेश्वर आहे हे मान्य करावे ही शिकवण लहानपणापासुन स्त्री अगर मुलीला तिचे आई—वडील देत असत. भारतीय स्त्री जीवनाला जगत असतांना मन, भावना, इच्छा, आकांक्षा नसतात हे समाजमन असायचे. समाजाची लक्ष्मण रेषा ओलांडून नये, समाजामन विरूध्द बोलू नये, अपमान, अपशब्द ला तोंड उघडू नये, नकार देउ नये हे स्त्री जीवनाचे अलंकार होते. "चूल व मूल" या संकल्पनेत जीवन जगण्याचा भारतीय स्त्री ला अधिकार होता. म्हणूनच तर डॉ. सरोजनी बाबर — "स्त्री शिक्षणाची वाटचाल" मध्ये लिहतात की, "ज्या स्त्रीचा पति देशातरी (कामकरण्यासाठी बाहेर गावी) गेला आहे त्या स्त्रीने हासणे, खिदळणे, दुसऱ्याच्या घरी जाणे, चांगले कपडे घालणे या गोष्टी करू नये." म्हणजेच भारतीय स्त्री जीवन पतिशिवाय गती नाही या प्रकारचे दिसून येते. स्त्रीचे ज्ञान चूलीपर्यंत हा शब्द प्रयोग अनेकदा समाज करीत असे श्रीमती रमाबाई रानडे "आंमच्या आयुष्यातल काही आठवणी" मध्ये लिहतात की, "त्याकाळी मूलीला लिहणे, वाचने पापमूलक समजले जात असे." न्या. रानडे शी विवाह झाला तेव्हा रमाईंना अक्षराची ओळख सुध्दा नव्हती. म्हणजे स्त्रीजीवनाचा शिक्षणाशी काहीच संबंध नाही हे समाजाने मान्यच केले होते. "श्रीमती काशिबाई कानिटकर आत्मचरित्र आणि चरित्र" चे लेखन डॉ. सरोजीनी बाबर यांनी केले. त्या लिहतात की, "मुलींचे शिक्षण म्हणजे डाळ, तांदूळ निवडणे, भाजी चिरणे, तारात जिन्नस वाढणे, आपली साडी अंथरूण व्यवस्थीत राखणे याकडे घरातील मंडळी कटाक्षपणे लक्ष देत असे." तसेच "स्त्रियांनी शुध्द बोलू नये" याकडे पाहिल्या जात असे.

स्त्री शिकली तर बोलती होईल वडिलधारी मंडळी, पतिशी उध्दटपणे वागेल या भितीतून स्त्री वर्गाला त्या काळी वडिलधाऱ्यांनी शिकविलेच नाही. स्त्रीवर्गाने बाजारात जाउ नये, पुरूषाच्या आवडी प्रमाणे वस्तू निवडाव्या, बाजारात गेले तर काय घालावे हे सुध्दा वडिलधाऱ्या मंडळी ला विचारावे लागत असे हे स्पष्ट केले. जणू काही भारतीय स्त्री आणि तिचे जीवन पुरूष वर्गाच्या नियमात बांधले गेले होते.

डॉ. सरोजीनी बाबर यांनी "श्रीमती काशिबाई कानिटकर यांचे आत्मचरित्र" लिहले. त्यामध्ये त्या लिहतात की, "एखादया स्त्री ने हातात वाचण्यासाठी कागद घेतला की वडिलधाऱ्या मंडळीची अमर्यादा झाली हे समजावे. जणूकाही त्या स्त्रीने काही अमर्यादा केली. एखादया स्त्री अगर मुलींचे नाव वर्तमानपत्रात आले, लेख प्रसिध्द झाला तर त्या कुटूंबाची मानहानी झाली, त्या लेखामूळे मोठा गुन्हा झाला से समजा समजत असे."

श्रीमती काशिबाई कानिटकर यांनी "डॉ. आनंदीबाई जोशी यांचे चरित्र व पत्र हे आत्मचरित्र लिहले." त्यामध्ये त्या लिहतात की, "त्याकाळी स्त्रियांना इतके शिक्षण काय कामाचे, स्त्रियांनी शिकून काय करायचे आहे, चाकरी करायची आहे का? जर स्त्रियांना अगर बायकोला असे मोकळे सोडले तर आपला संसार कसा होईल या भितीतून वडिलधारे उपदेश करीत असत." जेघरात आणून दिले त्याची नीट नीट की व्यवस्था करावी म्हणजे खरी विद्या होय हे समाजमत होते. "बायको अगर स्त्रियांनी शिकल्यावर पुरूषांनी काय करावे? घराची कामे कोणी करावी?" हे वडिलधारी मंडळीचे बोल स्पष्ट केले.

यावरून भारतीय समाज स्त्री जीवना विषयी

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 | Vidyawarta® Peer-Reviewed International Publication | February 2020 Special Issue-01 | 066

शिक्षण नको या विचाराचा होता हे दिसते. कारण संसार, व्यवस्था यातून भिती दिसून येते. वास्तवीक पाहता स्त्री–पुरूष अगर पती–पत्नी समाजाचे परस्पर पुरक अंग आहे. विश्वास हा नात्यातला भाव असतो. हा विश्वास, प्रेमसंबंध सहकार्य, प्रबोधनकाळात किती प्रमाणात होता याचे परिक्षण आवश्यक आहे. घरात घरपण नसेल तर त्या सहजीवनाला काय अर्थ? ज्या स्त्रीचा स्वत:हाच्या शरीरावर, मनावर, भावनेवर स्वत:हाचा अधिकार नाही, त्या स्त्रियांनी त्या काळात कसे जीवन व्यतीत केले असेल हे त्या काळालाच माहित. पण या मधून जूनी परंपरावादी मंडळी, पुरूष अगर वडिलधारी मंडळी ने स्त्री जवीनवार किती प्रमाणात अन्याय केला, बंधने टाकलीत हे दिसून येते. स्त्री जीवनाने सामाजिक मर्यादित रहावे हीच तत्कालीन समाजाची रचना, नियमे होती. स्वतंत्र वृत्ती अगर सहभाव व्यक्त करू दिल्या जात नाही हेच तत्कालीन स्त्री जीवन होते. सर्व प्रकारची मुस्काटदाबी, दडपशाही करण्यात आली हे वरील सर्व उदाहरणावरून दिसून येते.

श्रीमती रमाबाई रानडे “आमच्या आयुष्यातील काही आठवणी” मध्ये लिहतात की, जर स्त्रीने घरात अभ्यासकेला किंवा हातात पुस्तक घेतले आणि ते पुस्तक वडिलधाऱ्या मंडळीना दिसलेतर घरीच स्त्रीमंडळी खमंग चर्चा करीत असत. त्या चर्चा मध्ये स्त्रीचा उपहास करणे, लाजवीणे, टाकून बोलणे हे प्रकार केले जात.

भारतरत्न महर्षी धोंडो कर्वे यांची दुसरी पत्नी सौ. अनंदीबाई कर्वे यांनी “माझे पुराण” मध्ये लिहले की, विधवा स्त्रीचे जीवन नरकमय, अंधारकोठडीत असते. स्व:ताहा विधवा असल्यामूळे समाज विधबेला कसा वागवितो कसा पाहतो याचे उदाहरणे दिली. त्यामध्ये अपशकून, परतवेल, नापिता, नवऱ्याला खालले, मागच्या जन्मीचें पाप अगर भोग या शब्दाचा समाजाने वापर केला. विधवा स्त्रीने शिकूनये किंवा मुलींने शिक्षण घेवुनये हे समाजमत होते हे अनेक उदाहरणाव्दारे स्पष्ट केले.

भारतरत्न महर्षी कर्वेच्या आश्रमात श्रीमती पार्वतीबाई आठवले राहल्यात. त्यांनी “माझी कहाणी” मध्ये समाजमताची उदाहरणे दिली. स्त्री विधवा झालीतर तीचे केस कापून नवऱ्याच्या अर्थीवर अगर चितेवर टाकल्या जात असे. समाजमता विरूध्द काही कार्य केले तर बहिष्कार घातल्या जात असे. जर विधवा स्त्रीने केशवपन करून पुन्हा केस वाढवीले तर वेगळया अर्थाने समाज पाहत असे. विधवा स्त्री एक बेवारस वस्तू प्रमाणे वडिलधारी मंडळी पाहत असे आणि वागवीत असे. म्हणूनच ती विधवा स्त्री जिवंत असून मेल्यासारखी निर्जीव जगत असे. विधवा स्त्रीने गोड खाउ नये, गदीवर झोपू नये, चार चौघात येउ नये, शुभकार्या प्रसंगी पुढे येउ नये, दसलीतर अपशकुन झाला असे समजा समजत असे ची उदाहरणे दिली.

प्रबोधन काळात भारतीय स्त्री जीवनातला निर्दयी, अत्याचाराची, बेवारसवस्तू प्रमाणे, बंधनांची मालिका असलेली वागणूक मिळालेली दिसून येते. स्त्री शिक्षणा पासून वंचीत ठेवण्यात आली स्व:ताहाचे अपयश झाकण्यासाठी वडिलधाऱ्या मंडळींनी स्त्री जीवनाला शिक्षण मिळू दिले नाही. कारण अशिक्षीत स्त्रीवर अधिकार गाजवीणे सोपे जाते. शिक्षणाचा संबंध विधवा जीवनाशी सुध्दा लावण्यात आला. प्रतिगामी, क्लिस्ट, यातनामय, जीवन जगण्यास स्त्रियांना भाग पाडणारा हा काळ होता हे वरील सर्व साहित्यातील दाखल्यावरून दिसून येते. बाल विवाह हा तर स्त्री जीवनाला लागलेला अभिषाप होता. ७–८ वर्षाचा पति अगर नवरदेव आणि २–३ वर्षाची पत्नी अगर नवरी मिरवीत नेल्याच्या वार्ता तत्कालीन वर्तमानपत्रात आढळून येतात. ७–८ वर्षाची अगर ११ वर्षापर्यंतची मुलगी आणि ३०–४० वर्षाचा नवरा विवाह झालेची अनेक उदाहरणे आहेत. प्रबोधन काळ म्हणजे सामाजिक रूढी, परंपरा, कर्मकांड जोपासण्याचा काळ होय हेच म्हणावे लगेल. तर प्रबोधन काळातील स्त्रीजीवन म्हणजे पतिपरमेश्वरला सत्य मानून पतिकुटुंबाशी आपले सर्व जीवन अर्पण करणारी, प्रसंगी अनेक व्यवहाराशी त्याग करणारी, पतिव्रता, तिळ तिळ दु:ख भोगणारी, मानपान, सेवा मध्ये जीवन व्यथीत करणारी, सोशीक, मुकाटयाने सहन करणारी, न बोलणारी, फक्त अबोल दु:ख

झाले तर अश्रु ढाळणारी, चाकोरीबध्द, मातृसत्ताक जीवन जगणारी भारतीय स्त्री होय. जिचा स्वत:हाच्या शरिरावर, मनावर, भावनेवर, इच्छेवर अधिकार नाही.

२० व्या शतकात सुरूवातीच्या काळात पति साक्षर, शिक्षीत आहे म्हणून त्यांच्या मार्गदर्शनामुळे, धाकामुळे, दडपनामुळे स्त्रिया शिकत असत. पण या स्त्रियांची संख्या अल्प हाती. अखिल भारतीय महिला परिषदेच्या रूपाने २० व्या शतकाच्या दोन दशकात स्त्रीशिक्षणाची जागृती केली. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात राजकीय जागृती वाढू लागल्याने अनेक स्त्रियांनी त्यामध्ये भाग घेतलेला आढळून येतो. पण स्त्री शिक्षणाला सामाजिक बंधने होतीच. एकंदरीत विवाह संबंधी "समती वयाची चळवळ" पुण्यात सुरू झाल्यामुळे मुलीच्या विवाहाचे वय वाढले. १४ वर्षाची मुलगी तर १६–१८ वर्षाचा मूलगा हे समंतीवया नुसार ठरवीण्यात आले. इ.स. १९२४ मध्ये "शारदा कायदा" पास झाला. त्यानुसार मुलीच्या विवाहाचे वय १५ आणि मुलाचे १६ व त्या पुढे ठरविण्यात आले. ग.ज. लार्ड कर्झन ने भारतात आपल्या काळात शिक्षणावर भर दिला. "स्त्री शिक्षा" ला चांगली सुरूवात झाली. मुली शाळेत जाउ लागल्या. उच्च शिक्षणाची गती वाढू लागली. परंतु अनेक कुटुंबात स्त्री शिक्षणाला टोचून बोलणे, अपशब्द वापरणे सुरू होते. समाजाला स्त्री शिक्षण, सुधारणा पचत नव्हते. विरोधक मताची संख्या जास्त होती. म्हणुनच स्त्री शिक्षणाला चांगल दिवस प्राप्त व्हावे या उद्देशाने श्रीमती रमाबाई रानडयांनी १९०९ मध्ये मुंबईत "सेवा सदन" स्थापन केले. त्यामध्ये विवाहीत स्त्रियांसाठी व्यावसायीक शिक्षण दिल्या जात असे. २० व्या शतकात सुरूवातीला महाराष्ट्रत माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांची निर्मीती व स्थापना झाली. त्यामध्ये मुलींचे शिक्षणाचे प्रमाण हळूवार वाढल्याचे दिसते.

म्हणुनच इ.स. १९१६ मध्ये भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी स्त्री शिक्षणासाठी "भारतवर्षीय महिला विद्यापीठ" ची स्थापना केली. त्यामध्ये मातृभाषा व स्त्री जीवनाला आवश्यक विषय घेण्याची सुवीधा होती. स्त्री शिक्षणावर त्यांनी भर देउन स्त्री उन्नती साधण्याचा प्रयत्न केला.

तरीपण भारतीय स्त्री जीवनाचा सारासार विचार केला असता धार्मिक निति–नियमांच्या प्रचंड पगडयामूळे समाजात स्त्री जीवन "प्रबोधन काळा" सारखेच होते. फक्त अल्पप्रमाणात, मर्यादित स्त्री शिक्षण, सुधारणा घडू लागली आणि स्त्रियांचे मते, लेख, विचार, वर्तमानपत्रात येत असत. इ.स. १९२९ मध्ये सतीप्रथा बंदी कायदा पास झाला. तरी भारतीय समाजमत त्या विरूध्द होतेच. विधवा स्त्रीवर बरीच मर्यादा बंधने होतीच. पुनर्विवाह फार थोडया मुलींचे झाले. तरी पण समाजात "स्त्री जागृती" मोठया प्रमाणात घडून येउ लागली. अनिष्ठ रूढी, परंपरा, कर्मकांड यावर चौफेर, शाब्दीक हल्ले होवु लागले. सामाजिक रूढी, परंपरा आतातरी बदलणे, मोडीत काढण्याची भाषा वापरलया जाउ लागली. एकंदर भारत स्वतंत्र होईपर्यंत स्त्री शिक्षणाची गती वाढू लागली आणि स्वातंत्र्यवादी चळवळीत असंख्य स्त्रिया भाग घेउ लागल्या. यावरून काही प्रमाणात स्त्री सुधारणा, जागृतीला चांगली सुरूवात झालेली दिसून येते. समाज मन बदल वाटू लागला. स्वातंत्र पूर्व काळात भारतीय स्त्री आपल्या मर्जी नुसार जीवनात, माजघरात मोकळेपणाची स्वतंत्रतेची जाणीव घेउन वागू लागली. स्त्रियांनी आपले पाय या क्षेत्रात खंबीरपणे रोवण्यास सुरूवात केली. संघर्षाला, अन्यायाला सुखाची किनार लाभू लागली. स्त्री शिक्षणाच्या प्रेरणेने मार्गदर्शनाने स्त्रीयांना उडाण, भरारी मारण्याचे दिवस येउ लागले. परंपरावादी कुटुंबात सुध्दा काहीप्रमाणात अस्वस्थता जाणवू लागली. जी स्त्री आतापर्यंत दुर्बल, मुकी होती ती स्त्री या काळात बोलू लागली. वर्तमानपत्रात मासिकात, पुस्तकात, आत्मचरित्रात, निबंधात, शाळेत स्त्रीचा गाजावाजा होउ लागला. स्त्री जीवनाकडे, स्वत:कडे पाहण्यास शिकू लागली. दुर्बलता, अन्याय, सोशिकता ची जागा सबलता ने घेतली. १९ व्या शतकात स्त्रियांचे जे दुर्बल स्वरूप होते ते बदलून २० व्या शतकात आशादायक, प्रगतीपथावर होउ लागले. भरारी मारण्याची गती वाढू लागली. या काळात श्रीमती कमलाबाई देशपांडे गंगूताई पटवर्धन, यांनी स्त्री शिक्षणासाठी स्वत:हाला वाहून घेतले.

श्रीमती पार्वतीबाई आठवले यांनी विधवा स्त्रियांना शिक्षण, प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी संघर्षकरत राहिल्या. केशवपन ला आळा बसू लागला. भारतीय स्त्री नशिब, दुर्दव्याशी दोन हात करण्यास प्रवृत्त, सज्ज झाली व जगणे सुखकारक वाटू लागले. स्त्री सुधारणावादी पं. रमाबाई यांनी "स्त्री धर्म निरपेक्षता" पुस्तकामध्ये केलेल्या मार्गदर्शनामूळे या काळात स्त्री जीवन ध्येयवादी, संघर्षरत झाले. डोळे उघडून चांगले, वाईट ठरवीण्याची भाषा बोलल्या जाउ लागली. विचार, भावना प्रवृत्त बनून संसार सुखाचा करण्याचा प्रयत्न होउ लागला. दु:ख, संकटे वर मान करून कृतिशल संघर्षाव्दारे दोन हात करण्यीच मानसिकता निर्माण झालेली स्त्री पहावयास मिळाली.

**निष्कर्ष :**

एकंदरीत १९ व्या शतकात स्त्री जीवणाकडे पहाण्याचा दृष्टीकोण परंपरागत, दुय्यम, एकवस्तु या प्रमाणे होता. स्त्री जीवन धर्म आणि समाज च्या चौकटीत बंधीस्त होती. समाजाने अलिखीत नियम तयार करून स्त्रीयांना स्वतंत्रपणे जगु दिले नाही. तिच्यावर चुल आणि मुल ची संकल्पना लादली. त्या काळात कोणतीही स्त्री वडीलांच्या घरातुन पतीच्या अगर सासरच्या घरात जात असे पती परमेश्वर हेच स्त्री चे जिवन होते. कारण स्त्री जीवन निरक्षर होते. त्यांना परावलंबीत्व होते. त्यामुळे हा सर्व भेदभाव त्या काळात सहन करावा लागला.

इंग्रजी शिक्षणामुळे भरतात स्त्री शिक्षणाची दारे उघडल्या गेली. त्यामधुन भरतात शिक्षणाचा प्रसार झाला. वृत्तपत्रे, प्रसारमाध्यमे, समाज सुधारक शिक्षणामुळेच उदयास आले. समाज सुधारकांनी स्त्री शिक्षणाची चळवळ भारतात मोठया प्रमाणात राबविली. समाजात टिका करून, दोष दाखवुन कुप्रथा ची बाजु मांडुन जमाजातले दोष चव्हाटयावर आणले. त्यामुळे हळुंवारपणे स्त्री शिक्षण वाढु लागले. त्यामुधन स्त्रीया शिक्षीत झाल्या, बोलु लागल्या आणि स्त्री स्वातंत्र्याची पहाट हळुवारपणे स्त्रीयांकडे येवु लागली. शेवटी स्त्री जीवनात समाज सुधारकांनी चळवळीच्या माध्यमातुन आणि शिक्षणाच्या माध्यमातुन बदल घडवुन आणण्यासाठी प्रयत्न केले. त्यातुन समाजाचे विचार प्रवाह बदलण्यास हातभार लागला आणि स्त्री उन्नती चे वारे वाहु लागले.

**संदर्भ ग्रंथसुची :**

१. रानडे प्रतिभा — स्त्री प्रश्नांची चर्चा, प्रकाशक — पदमगंधा प्रकाशन, एरंडवन, पुणे, २००५
२. पंडिता रमाबाई — स्त्री धर्मनिती, प्रकाशक — साधना प्रकाशन, पुणे, १९६७
३. कानिटकर सौ. काशिबाई — डॉ. आनंदीबाई जोशी यांचे चरित्र व पत्रे, प्रकाशक — का. र. मित्र मनोरंजन ग्रंथ प्रसारक मंडळी, मुंबई — १९१२
४. मालशे स.ग. आणि नंदा आपटे — विधवा विवाह चळवळ, १८००—१९००, प्रकाशक — कुलसचिव, एस.एन. डी.टी महिला विद्यापीठ मुंबई, १९७८
५. बाबर डॉ. सरोजनी — स्त्री शिक्षणाची वाटचाल, प्रकाशक — शासकिय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, १९६८
६. वैद्य सरोजिनी — श्रीमती काशिबाई कानिटकर — आत्मचरित्र आणि चरित्र, १८६१—१९४८, प्रकाशक — प्यॉपूलर प्रकाशन मुंबई, १९८०
७. कर्वे सौ. आनंदीबाई — माझे पुराण, प्रकाशक — केशव भिकाजी ढवळे, श्री समर्थ सदन, मुंबई, १९४४
८. रानडे श्रीमती रमाबाई — आमच्या आयुष्यातील काही आठवणी, प्रकाशक — आर्यभुषन मुद्रणालय, पुणे, १९५३
९. ढेरे अरूणा — विवेक आणि विद्रोह, प्रकाशक — पत्मगंधा प्रकाशन, पुणे, २००४.

❑❑❑

# नक्षलवाद – ''भारतीय लोकशाही, संसदीय शासन प्रणाली आणि विकास ला मारक एक अभ्यास''

भारत दि. १५ ऑगष्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय राज्यघटना ची भारतात अंमल बजावणी सुरू झाली. आज भारताला स्वतंत्र होऊन ७३ वर्ष झाले. परंतू आजही भारताच्या काही भागातच्या अंतर्गत–अशांतता समस्या सुरू आहेत. त्या अंतर्गत समस्या कधी सोडवील्या जातील हा खरा प्रश्न आहे. वास्तवीक पाहता राज्यघटने नुसार व भारताचा लोकशाही तत्वानुसार भारताचा राज्यकारभार चालत आहे. भारतीय नागरीकांना राज्यघटनेत कलम ५ ते ११ आणि १४ ते १८ मध्ये नागरीकत्वाचे अधिकार दिले आहेत. स्वतंत्र, समता, बंधूता, समानता हि सर्व तत्वे असून सुध्दा एकसमानता, एकोपा, सहकार्य आहे का? हा प्रश्न अनेक भारतीयांच्या मनात पडलेला प्रश्न आहे. कारण या ७३ वर्षाच्या काळात चूकले कोण? हा खरा प्रश्न आहे. शोषण, पिळवणूक, अन्याय कोणावर झाला हे आजही भारतीय समाजाला पुर्णपणे माहित नाही. जातीय, वर्णीय, भाषीक, धार्मिक, वांशिक, शोषीत, विषमता च्या आधारे आज भारतात ''नक्षलवाद'' फोफावत आहे. नक्षलवादी चळवळ आपल्या हक्क, अधिकार प्राप्तीसाठी संघर्षकरीत आहे. याचे स्वरूप सर्व भारतीयांना आज माहित आहे. त्यामध्येच अर्बन नक्षलवाद हा शब्द सुध्दा जोडला जात आहे. पण का? कशासाठी? हे कोणालाच खरे स्वरूपमाहित नाही.

इ.स. १९८० नंतर भारतात सर्वप्रथम आसाम राज्यात नक्षलवाद उदयास आला असा प्रचार झाला. आसामच्या मूळ निवासी, भुमिपूत्रांनी घुसखोर लोकांना भारतातून हद्द पार करण्यासाठी संघर्ष केलेला आपन पाहत आहोत. त्यामधून ''बोडो आंदोलन'' सुरू झाले. स्वतंत्र बोडोलॅन्ड असावे ही त्यांची मूळ मागणी होती. त्या प्रमाणे पंजाब राज्यात ''खालीस्थान'' निर्मिती चा आग्रह सुरू झाला. ''या मागणीला १९८४ मध्ये पूर्ण विराम मिळाला. त्यानंतर कधी–कधी ''खलीस्थान'' हा शब्द ऐकण्यास मिळत आहे. त्यानंतर नागालॅन्ड, मणिपूर, त्रिपूरा राज्यात फूटीरवादी गट चा प्रभाव वाढू लागला. त्यांनी ईशान्य भारत संघर्षमय करून ठेवलेला आहे. आजही महाराष्ट्र, छत्तीसगड, आंध्रप्रदेशात नक्षलवादी कार्यवाही चालू आहे. नक्षलवाद चळवळी मूळे अराजकता, अशांतता, अस्थिरता असून भारताचे लचके तोडण्याचे कार्य जे फूटीरवादी आज करत आहे त्याला एक प्रकारे समर्थन, बळ मिळतांना आज दिसत आहे. बंदूकचे उत्तर बंदूक नसून चर्चा, पाठपूरावा, विकास, सामाजिक व राष्ट्रीय प्रवाहत येणे हा आहे. सर्वांना समानता नुसार न्याय मिळणे आज गरजेचे वाटते. कारण अन्याय, विषमता, शोषन, अस्मिता यामधूनच नक्षलवाद

समस्या उभी राहते हे विसरता येत नाही. प्रत्येक सरकारने याकडे लक्ष देणे काळाची गरज आहे. सरकारने प्रत्येकांना संधी दयावी. कारण, आजच्या काळात नक्षलवाद का वाढला आहे हे पाहणे आवश्यक ठरते.

**१) उत्पादनाची साधने व वितरण व्यवस्था –**

उत्पादीत साधनावर वितरण व्यवस्थेवर सरकार, समाज चे नियंत्रण असावे. न्याय पध्दतीनुसार वर्ग, वर्ण, जात, भाषा, प्रांत याला महत्व न देता समानता, बंधूभाव नुसार सर्वांना साधने पुरवली पाहिजे. सर्व स्तरावर व्यवस्थेनुसार वितरण पध्दत असावी. पण हे सर्व होत नाही. मागचे मागचे राहतात. त्यांची पिळवणूक होते. त्यांना मूळ प्रवाहात आनलेच जात नाही. दुरावा वाढतो त्यामधून नक्षलवाद वाढतो.

**२) भांडवलदार, श्रीमंत वर्गाचे स्वरूप –**

आज भारतात प्रचंड लोकसंख्या आहे. त्यानुसार सरकारचे, भांडवलदारांचे, श्रीमंत वर्गाचे धोरण सर्वांना समावून घेणे हे असावे. प्रत्येकाच्या परिस्थीतीचा, प्रवाहाचा विचार करून सर्वांना एकत्र घेउन चालणे आवश्यक आहे. प्रत्येक ठिकाणी पात्रता, गुणवत्ता भिन्न–भिन्न असते. हे सर्व प्रथम लक्षात घ्यावे. परंतू प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नाही. अन्याय, अत्याचार, शोषन वाढत आहे. त्यामधून विरोधाभास, दृष्टप्रचार या कारणास्तव नक्षलवाद वाढत आहे. संपत्तीचे समान वाटप व्हावे, न्याय सर्वांना मिळावा पण हे काहीच होत नाही. गरिब दिवसेन दिवस गरिबच आहे. ७३ वर्षात अन्न, वस्त्र, निवारा, विज, पाणी, रस्ते, शिक्षण, आरोग्य च्या सुविधा मिळाल्याच नाही. गरिबाची गरिबी हटली नाही.

**३) सरकारचे धोरण –**

भारत सरकार, अनेक राज्य सरकारे यांनी मुख्य प्रवाहत लोक यावीत, न्याय मिळावा, समान वाटप व्हावे, शिक्षण, विज, पाणी, रस्ते, आरोग्य धोरण ठरवितांना प्रत्येक प्रांतानुसार, विभागानूसार कार्य करावे. गरिबी, बेरोजगारी, मागासभाग, विषमता का? याचा शोध घेउनच कार्यक्रम राबवावे. परंतु तसे होत नाही. भेदभाव वाढत आहेत. जात, धर्म ची व्याप्ती वाढली आहे. याला उत्तर म्हणजे नक्षलवाद वाढत आहे. म्हणुनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्पष्ट म्हटले होते की, ''आर्थिक लोकशाही'' निर्माण केल्याशिवाय ''संसदीय लोकशाही'' यशस्वी होउ शकणार नाही. भारतीय जाती व्यवस्था संसदीय लोकशाहीला अडथळा आहे. तो दूर करणे आवश्यक आहे.

पण आजच्या काळात भारतीय लोकशाही खरी लोकशाहीचे स्वरूप आहे का? असे प्रश्न अनेकांना पडत आहे. बहूमता व्दारे सरकार सत्तारूढ झाले म्हणजे लोकशाही नव्हे. लोकशाहीत सर्वांना

समान हक्क अधिकार असतात. जात, धर्म, वंर्ग, प्रांत, भाषा, संस्कृती ला महत्व नसते. पक्षात लोकशाही आहे का? आणि भारतीय लोकांना लोकशाही चे धडे दिले जातात. यातून नक्षलवाद निर्माण होणार नाही का? नक्षलवाद ला आळा घालण्यासाठी सरकारे, त्याचे स्वरूप, धोरणे, कार्यक्रम समसमान पाहिजे तरच नक्षलवाद समाप्त होईल असे वाटते.

**नक्षलवाद रोखण्याचे विधायक मार्ग –**

१) ग्राम राज्य, ग्रामसभा, जनसभा व्दारे लोक प्रशासन निर्माण करणे. ग्रामच्या समस्या ग्राम मध्येच समाप्त करणे, समान तत्वाचा अंगीकार करून कार्यक्रम राबवीणे. सर्वांना सहभागी करावे.

२) शोषीत, प्रवाहत नसलेली, अडाणी, निरक्षर लोकांसाठी विशेष परिस्थीती नुसार नियम असावे. नियमांचा काटेकोरपणा नसावा कारण काही भागात ७३ वर्षात भारतीय जनतेला पाणी, विज, रस्ते, अरोग्य, शिक्षण मिळाले नाही. आता तरी नियमाला अनूसरून हेच असावे हे धोरण नसावे. लवचीकता ठेवावी, समाज, लोकांना कृतिशिल प्राधान्य दयावे.

३) अन्न, वस्त्र निवारा, श्रम, रोजगार, दळणवळण, शिक्षण, आरोग्य हे सर्व घटक जनतेपर्यंत गेले पाहिजे. कागदावर बजेट नसावे. शेतक–यांचे प्रश्न शेताच्या धू–यावरून सोडवीणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष पाहणी करून निर्णय घेतले जावे. ऐकूण, दुरून निर्णय होउ नये.

४) प्रशासन गतिमान असावे. शब्दाचा किस पाडू नये, नियमांना दुसरे सोपे नियम ठेवावे. सहभागातून चर्चा व्दारे मत अजमावून कार्य केले जावे. सर्वांना समान संधी दयावी. कायदयानुसार सर्वांचे ऐकून घ्यावे. प्रत्येकाला वाटावे की मला सूध्दा मान आहे.

५) जबाबदारीचे तत्व सर्वांना असावे. ग्राम ते सचीवालय सर्वांना जबाबदार धरले जावे. कल्याणकारी योजनांची योग्य रितीने अंमलजावणी जबाबदारी तत्वानुसार झाली पाहिजे. गिळंकृत करणे ही भाषा नसावी. लाभ धारक गरिब असो की निरक्षर त्याला माहिती देउन समजावून सांगून लाभ दयावा. भ्रष्टाचाराला आळा बसला पाहिजे. प्रत्येक घटक आपलाच आहे या कार्यक्रमानुसार समानतत्व वाटप व्हावे.

आज २१ व्या शतकात भारतात अनेक राज्यात नक्षलवाद समस्या आहे. त्यामूळे अनेक राज्य अशांत, अस्थिर आहेत. १३५ कोटी लोकसंख्या असलेला लोकशाही वादी देश आज अनेक समस्यांनी घेरलेला आहे. भारताचे विकासाचे स्वप्न कधी पूर्ण होणार हा खरा प्रश्न आहे.

विकास करण्यासाठी शांतता, स्थैर्य असने काळाची गरज आहे. लोकशाही टिकवीणे सर्वांचे कर्तव्य आहे. भारताच्या अंतर्गत सुरक्षेला नक्षलावादने ज्वलंत आव्हान निर्माण केले आहे.

(15)

कोणत्याही राष्ट्रच्या सुरक्षेचे मापदंड केवळ सीमे वरील सुरक्षिततेने मोजले जात नाही. त्या राष्ट्राची अंतर्गत सुरक्षीतता फार महत्वाची ठरते. राष्ट्र जर अंतर्गत स्वरूपात मजबूत नसेल तर मूलभूत संरचना कमजोर पडत असते. त्यातून, राष्ट्र विकासाच्या मार्गतून प्रक्रयेतून मागे पडत जातो.

इतिहास ज्वलंत साक्षी आहे की, समस्या प्रत्येक राष्ट्रात आहे. म्हणुन भारतात लोकशाही मार्गानेच त्या समस्याचे निराकरण झाले पाहिजे. तरच लोकशाही टिकेल. पुर्ण व्यवस्था वाईट आहे, अकार्यक्षम आहे असे म्हणता येणारच नाही. पण काही शक्ती, राष्ट्रविरोधी कार्य करणारी तत्वे, भारताचे अहित पाहणारे अदृश्य घटक, निरक्षर, दारिद्री जिवन जगणारे लोक यांना भडकावून भारताच्या संयमी, सहनशील मूल्यतत्वावर घाव घालून वाईट करत आहे. वाईट भासून अंतर्गत सुरक्षितता धोक्यात आनत आहेत. त्यातून देश, समाज पोखरला जात आहे. विकासाला बाधा, मर्यादा येत आहेत. हेच खरे स्वरूप आज दिसत आहे. असे घडू नयें यासाठी सर्वांनी एकत्र येवुन खंबीरपणे नक्षलवाद हा शब्द, ती चळवळ समाप्त कशी होईल हे कृतीशील पाहणे आवश्यक आहे. कृतीशील योगदानातून हे कार्य घडू शकते याबद्दल शंका नाही.

आज भारतीय लोकशाही जींवत ठेवणे प्रत्येक भारतीय जनतेचे कृतीशील कर्तव्य व जबाबादरी आहे. विकासाला ''मारक तत्व'' शोधून नष्ट करणे, मारक तत्वांना उघडकीस आनून त्यांना मार्गदर्शनाव्दारे, वैचारीक बदला व्दारे भारताच्या मूळ प्रवाहात आनने आणि सर्वांना समान संधी आहे हे त्यांना पटवून देणे हे आज सर्वांचे कर्तव्य आहे. हे ज्या दिवसी घडेल त्या दिवशी नक्षलवाद समाप्त झाल्याशिवाय राहणार नाही.

**संदर्भ ग्रंथ सूची –**


१) किर्ती मिलींद – दहशदवाद – सुगावा प्रकाशन, पुणे, २००८

२) पवार एन. जी. – भारतीय समाज क्रांती विचारधारा – बूक नक्लेव, जयपूर, २०००

३) संपादक मंडळ – स्वतंत्र भातातील राजकीय विचार प्रवाह – कूलसचीव, वाय.सी.एम.ओ.यू. नाशिक, २००२



**संशोधक**

**प्रा.डॉ. एन.आर. वर्मा**
**इतिहास विभाग प्रमुख**
**श्रीमती व.ना.महिला महा., पुसद**
**मो.क्र. ९४२०७७३२०३**

# "मानवी हक्क आणि हिंसा एक ऐतिहासिक अध्ययन"

"मानवी हक्क म्हणजे मानवाला जन्मापासून मिळालेले हक्क आणि अधिकार होय. प्रत्येक व्यक्ती जन्मतहा लिंग, वंश, भाषा, वर्ण ने स्वतंत्र असतो. त्याला स्वतःताहाच्या हंक्काचा उपभोग घेण्याचा अधिकार आहे."

संयूक्त राष्ट्रसंघटनाने "मानवी हक्क" कलम 55 मध्ये नागरीकांचे हक्क, अधिकार मांडले. त्यानुसार दि. 10 डिसेंबर 1948 रोजी "मानवी हक्काचा जाहीरनामा" प्रसिध्द केला. त्यामध्ये 30 कलमे आहेत. म्हणुन जगात 10 डिसे. हा दिवस मानवी हक्क दिवस मानला जातो. त्यानुसारच समान काम समान वेतन, शिक्षण, संपत्ती, न्याय, स्वतंत्र, समानता, बंधूता इत्यादी हक्कांची देणगी दिली आहे. या शिवाय वेंठबिगारी, गुलामगिरी, वर्णभेद वर बंदी घातली आहे. इ.स. 1955 मध्ये जागतीक मानवी हक्क जाहीरनाम्यात मानवी हक्क रक्षणासाठी उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत.

आज भारतीय राज्यघटनेत नागरीकांच्या मूलभूत हक्क, अधिकारी तरतूदीमध्ये कलम 12 ते 35 मध्ये हे अधिकार लिखीत स्वरूपात आहेत. भारतीय राज्यघटनेत सर्वनागरीकांना राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतीक आणि इतर अधिकार प्राप्त आहेत. त्यानुसार स्वतंत्र, भाषन, समान दर्जा, आचरण, बंधूता, एकात्मता, स्त्री–पुरूष समानता हे अधिकार दर्शवीले आहे. म्हणूनच भारतीय नागरीकांना निसर्गदत्त अधिकार प्राप्त झाले आहेत.

परंतु आज भारतात आणि जगात मानवी हक्क, अधिकार च्या संरक्षणार्थ प्रचड प्रमाणात हिंसा, हिंसाचार, अत्याचार घडून येत आहेत. आज मानवी हक्क, अधिकार ची प्रचंड अवहेलना करून अन्याय घडून आनल्या जात आहेत. सर्वत्र वंशवाद, वर्ण, व्देष आढळून येतो. अमेरीका, आफ्रीका, युरोप, ऑस्ट्रेलिया देशात प्रचंड प्रमाणात गोरे विरूध्द काळे चा संघर्ष चालू आहे. तर आशियाखंडात पॅलेस्टाईन विरूध्द इस्त्रयल याचा सघर्ष चालू आहे. चीन विरूध्द आजूबाजूची लहान सार्क राष्ट्रे यांचा संघर्ष चालू आहे. भारतात जम्मू–काश्मिर मध्ये संघर्षाची स्थिती वारंवार घडत असते. ईशान्य भारतात असे संघर्ष वारंवार दिसून येतात. यामधून मानवाचे हक्क, अधिकार डावलले तेंव्हाच संघर्ष होतांना दिसत आहेत. आज भारतात भाषीक, जातीय, धार्मिक, दंगली होत असतात. आज नक्षलग्रस्त भागात आणि दहशतवादी संघटना व्दारे अतिक्रमणे, हिंसाचार करून मानवी हक्कावर गदा आनण्याचे कार्य केले जात आहेत. विज्ञान आणि तंत्रज्ञान च्या युगात गुन्हेगारी, भ्रष्ट्राचार, बेजबाबदारी, फसवणूक चे प्रचंड प्रमाण वाढले आहे. एक व्यक्ती दुस–या व्यक्तीचे हक्क, अधिकार हिरावून घेण्याचा प्रयत्न करतो. अनेकवेळा अधिकार पदाचा दुरूप्योग करून, शोषन, अन्याय, गुलामगिरी, वर्चस्वाची भाषा करत असतो. आजही भारतात स्वातंत्र मिळवून 73 वर्षे झालीत परंतू गरिबांना अन्न, वस्त्र, निवारा, घरे, काम, जीवन जगण्याचा मार्ग सापडत नाही. सर्वांना आरोग्य सुविधा, पाणी विज मिळत नाही. वारंवार पुर, दुष्काळ, नैसर्गीक वादळे येतात आणि पर्यावरणाची प्रचंड हानी होते. यामधून व्यक्तीचे हक्क, अधिकार सुरक्षित

राहतील का? हा खरा प्रश्न आहे. कारण भारतात दिवसेदिवस लोक गरिब होत आहेत. जनतेच्या कल्याणकारी योजना कागदावरच राहतात. म्हणजेच त्यांचे मानवी हक्क आणि अधिकार ओरबडून घेतले जात आहेत. याला जबाबदार कोण?

आज भारतात मानवी हक्क आणि स्त्री वर्गाची स्थिती चा संशोधनात्मक विचार केला तर जानवते की, असंख्य स्त्रिया आपल्या हक्क, अधिकार पासून वंचित आहेत. अनेक प्रसंगात, परिस्थिती नुसार त्यांच्यावर अन्याय, अत्याचार होत असतात. स्त्रीवर्गाची स्थिती दुय्यम आहे. स्त्री वर्ग शोषनाच्या, गुलामगिरीच्या, वर्चस्वाच्या भोव–यात सापडला आहे. स्त्री वर्गाला शिक्षण, संपत्ती, निर्णय प्रकिया मध्ये भाग घेण्यासाठी प्रचंड संघर्ष करावा लागत आहे. जरी कायदा केला तरी स्त्री भृण हत्या घडतच असतात. समाजाच्या रूढी, परंपरा आणि अंधश्रध्दांचे असंख्य स्त्री वर्गाचा बळी घेतला आहे. कारण भारतात हुंडा पध्दत आहे. अनेक प्रसंगात कायदयाला कलाटणी देउन देवान–घेवान होत असते. भारतात जातीव्यवस्था प्रचंड प्रमाणात असल्याने अनेक प्रसंगात मानवी हक्क, अधिकार ची पायमल्ली होत असते. आज प्रत्येक दिवसी वर्तमानपत्रे आणि प्रसार माध्यमामध्ये स्त्री वर्गाच्या छळ, अन्याय, अत्याचार ची बातमी असते. भारतीय समाजात स्त्री पुरूष समानता आहे हे सर्व चित्र वरवर चांगले दिसते. अनेक प्रसंगात स्त्री वर्गाची अवहेलना, विषमता, दुय्यम दर्जाची वागणूक दिसते. स्त्रियांना पुढे येउ दिल्या जात नाही. समाजात मानसन्मान प्रसंगा नूसार असतो.

आज भारतात आणि जगात ''बालकामगार'' ची स्थिती फार वाईट दिसून येते. ''मूल ही देवाघरची फूल'' म्हटले जाते. परंतू भारतात औद्योगीक क्षेत्रात, कामगार क्षेत्रात, अनेक कारखान्यात मुलांना काम करण्यास बाध्य करून त्यांचे जीवन कोमेजून टाकले जाते. घराबाहेर मूल सुरक्षित नसतात. कमी वयात लहान मूलांना असाध्य कामकरायला लावले जाते. त्यातून बालपणाचे हक्क, अधिकार नष्ट केले जातात. मूले देशाचे भावी नागरीक आहेत. पंरतू त्यांनाच सशक्त बनवीण्या ऐवजी अशक्त केले जाते. बाल कामगार ही समस्या भारताची प्रचंड डोकेदुखी आहे. त्यांचे शोषन थांबवीणे काळाची गरज आहे. तरच भारताची पत, प्रतिष्ठा वाढेल. सर्वांना न्याय मिळेल.

निसर्ग सृष्टीचा नियम आहे की ''जगा आणि जगूदया'' प्रत्येक भारतीय व्यक्तीला जीवन जगण्याचा अधिकार आहे. तर मानवी हक्क या विचार सारणीचा केंद्रबिंदू आहे. परंतू आज मानवी हक्काचे अपहरण, हनन होत असते. आज शाषीत वर्ग, वंचित वर्ग यांच्या अधिकार चे हनन होत असते. भारतात प्रचंड जातीभेद व्यवस्था असल्याने अनेकांचे मानवी हक्क, अधिकार डावलले गेले याचा इतिहास आहे.

एकंदरीत या पृथ्वी तलावर प्रत्येक व्यक्ती जन्मतः स्वतंत्र आहे. त्यांच्यावर बंधने लादून त्याचे हक्क, अधिकार डावलता येत नाही. परंतु आज जगात आणि भारतात अनेक राज्यात मानवी हक्का चे अपहरण घडून येते. हा एक चिंतनाचा विषय आहे. स्त्रीवर्ग आज सुरक्षित नाही. भाषीय, जातीय भेद प्रचंड वाढत आहेत. गरिबांची स्थिती कमकूवत होत आहे. सर्वत्र असूरक्षितताचे वातावरण

(18)

आहे. असे म्हणतात की, शिक्षणाने विचार प्रगत होतात. परंतू जाणीव जागृती मध्ये शिक्षण विभाग कमी दिसून येतो. जे शिक्षीत असतात तेच गरिबांचे शोषन करतात असे अनेक घटनामध्ये आढळून येते.

आज जगात विकसीत राष्ट्रे अविकसीत राष्ट्रात सांस्कृतीक, आर्थिक साम्राज्यवाद निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. चीन, अमेरीका ही बलाढय राष्ट्रे आज भारतीय असंतूष्ठ घटकांना एकत्र करून मानवी हक्क, अधिकार ची पायमल्ली करून भारताच्या ऐक्याला, विकासाला अडथळे निर्माण करीत आहेत. भारताच्या असंतोशी भागात, प्रदेशात, अस्थिरता कशी निर्माण होईल याचे प्रयत्न आज होत आहेत. त्यामधुन त्याभागत मानवी हक्काची शक्ती कमी होत आहे. बाहयशक्ती आपली विचारसारणी ची दहशद निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामधून मानवाधिकारचे आधिकार सीमीत होत आहेत. आर्थीक साम्राज्यवाद, व्यापारीकरण, जागतीकीकरण च्या तत्वातून उदिष्ठेपार पाडण्यासाठी ''हक्क व अधिकार'' ची संकल्पना चे अपहरण अनेक घटकांमध्ये दिसून येते. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर मानवी हक्क, अधिकार ची भाषा बोलणारे आपल्याच देशात नागरीकांना किती प्रमाणात हक्क, अधिकार देतात हा एक संशोधनाचा विषय आहे. म्हणून ''माणसाने माणासाशी माणूसकीनेच वागावे हीच खरी मानवी हक्कव अधिकार ची व्याख्या ठरेल यात शंका नाही.

## निष्कर्ष –

1) निसर्गदत्त प्रत्येक स्त्री–पुरूष आपले अधिकार घेउन निर्मळपणे जन्माला आलेत.
2) भारतीय समाजाने भेद, विषमता, लहान–मोठे, गरिब–श्रीमंत, श्रेष्ठ–कनिष्ठ, गोरे–काळे ही भाषा शिकवून व्यक्तीच्या जिवनात त्यांची अंमलबजावणी केली.
3) मानवी हक्क, अधिकार ला समाप्त करणारे घटक या पृथ्वीतलावर आहेत. म्हणून आज संघर्ष, हिंसा, हिंसाचार घडत आहे.
4) मानव हक्काला विरोध करणारे अनेक प्रभावी अदृश्यशक्ती आहेत. त्याला समाप्त करण्यासाठी प्रबळ प्रशासन यंत्रणा आज कमजोर दिसत आहे.
5) भारतात आणि जगात अशांतता दिसते. परंतू त्याचा नायनाट आवश्यक आहे. तरच मानवजात टिकेल आणि मानवी हक्क, अधिकार सुरक्षित राहील.

19

**संदर्भ ग्रंथ व टिपा :**


1) सामंत मंगला – स्त्री पर्व

प्रकाशक – सुगावा प्रकाशन, सदाशिवपेठ, पुणे – 2001

2) डॉ. मेहेत्रे स्मीता – भारतीय स्त्री व मानवाधिकार

प्रकाशक – श्री साईनाथ प्रकाशन, धरमपेठ, नागपूर – 2011

3) प्रा. पाटील व्ही. बी. – मानवी हक्क

प्रकाशक – के. सागर पब्लीकेशन्स, पूणे – 2009

4) डॉ. आगलावे प्रदीप – भारतीय समाज संरचना

प्रकाशक – श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

5) डॉ. देशपांडे, जैन संजय – मानवी हक्क व भारत

प्रकाशक – यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, जाने 2009


**संशोधन कर्ता**


**प्रा.डॉ. एन. आर. वर्मा**

इतिहास विभाग प्रमुख

श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महा.,

पुसद जि. यवतमाळ (महाराष्ट्र)

HISTORY
ISSN – 2250-0383
RNI-02988/13/01/2011-TC

(20)

# स्वातंत्रयोध्दा कै. गोधाजीराव मुखरे यांचे भारतीय स्वातंत्र चळवळीतील योगदान

**प्रा.डॉ. एन. आर. वर्मा**
इतिहास विभाग प्रमुख
श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महा.,
पुसद जि. यवतमाळ (महाराश्ट्र)
मोबाईल कं. 9420773203
ईमेल आय.डी. : narayanvarma67@gmail.com

भारतामध्ये इ.स. 1818 ते 1947 या काळात ब्रिटिश राजवटीत 563 देशी राज्ये आणि संस्थानिक यांचे राज्य होती. या राज्याचा आणि संस्थानिकांचा कारभार देशी राजे, महाराजे व संस्थानिक पाहत असत. दक्षिणचा सुभेदार मीर कमरूद्दीन चिन कुलीजखान निजाम उल मुल्क याने 31 जुलै 1724 रोजी दक्षिणेत स्वतंत्र राज्याची स्थापना केली. आसफिया घराण्यातील सातवा निझाम मीर उस्मानअली याच्या विरूध्द हा हैद्राबाद मुक्ती संग्राम घडून आला. हैद्राबाद राज्यात (संस्थानिकांत) पुर्वीच्या तलंगणातील आठ, मराठवाडयातील सात आणि कर्नाटकातील तीन जिल्हयाचा समावेश होत असे. या संस्थानिकात मराठी, तेलगू, कानडी, उर्दू भाषिक व धर्मपंथीय लोक राहत असत. उर्दू ही हैद्राबाद संस्थानिकाची राजभाषा होती तर इतर भाशा दुय्यम होत्या.

**हैद्राबाद संस्थांनचे भूक्षेत्रफळ, लोकसंख्या व भौगोलिक स्थान :–**

हैद्राबाद संस्थान दक्षिण भारताच्या मध्यभागी वसलेले राज्य होय. या राज्याचे भूक्षेत्रफळ 82,698 चौ.मैल असून, हे राज्य $15^0$, 10, $20^0$ 40, उत्तर अक्षांस व $74^0$, 40 व $81^0$ 35 पूर्व रेखांष वर वसलेले होते. संपूर्ण हिंदूस्थानात हैद्राबाद राज्य आकाराने दुसऱ्या कमांकाचे होते. इ.स. 1941 च्या शिरगणतीनुसार लोकसंख्या पुढील प्रमाणे.

| प्रदेशाचे नांव | भूक्षेत्रफळ | लोकसंख्या |
|---|---|---|
| मराठवाडा | 27591 चौ.मैल | 86,35,131 |
| तेलंगणा | 41502 चौ.मैल | 52,19,528 |
| कर्नाटक | 13605 चौ.मैल | 23,39,654 |

**हैद्राबाद मुक्तीसंग्राम म्हणजे काय?**

ब्रिटिश राजवटीने इ.स. 1947 मध्ये भारतीय स्वातंत्र्याचा कायदा पास करून भारताला 15 ऑगश्ट 1947 रोजी स्वातंत्र्य दिले. या कायद्यानुसार भारतातील देशी राज्य व संस्थानिक यांनी आपली संस्थाने भारतात अगर पाकिस्तान मध्ये विलीन करायचे की, स्वतंत्र रहायचे या बाबतीत स्वातंत्र्य दिले होते. आता ही संस्थानिक राज्य भारतात विलीन कशा पध्दतीने करून घ्यावी हा प्रश्न भारत सरकार पुढे निर्माण झाला असता भारताचे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभाई पटेल यांनी ''पोलादी पुरूष'' प्रमाणे भारतातील अनेक संस्थानिक भारतात विलीन करून घेतली. परंतु हैद्राबाद संस्थानचा संस्थानिक निजाम मीर उस्मान अली खान याने 11 जून 1947 रोजी आपले संस्थान स्वतंत्र राहणार असल्याचे जाहीर केले. त्यातून मोठा प्रेचप्रसंग निर्माण झाला. कारण हैद्राबाद संस्थानची 70 टक्के जनता हिंदू होती तर फक्त 11 टक्के मुसलमान होते. निझामाची राजवट हिंदू जनतेसाठी फारच त्रासदायक व अत्याचारी स्वरूपाची होती. तत्कालीन भारत सरकारला हैद्राबाद संस्थानिक भारतात विलीन केल्याशिवाय भारतीय स्वातंत्र्याला पुर्णत्व प्राप्त होणार नाही असे वाटत होते. त्यामूळेच भारताचे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी आपल्या ''ध्येय धोरणानुसार'' दि. 13 सप्टेंबर 1948 पासून 17 सप्टेंबर 1948 सायंकाळी 5 वाजेपर्यंत हैद्राबाद रेडिओवरून निझामाच्या भारणागतीची घोषणा करेपर्यंत (शुक्रवार) ची लष्करी कारवाई केली आणि हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन केले.

(21)

अशा प्रकारे हैद्राबाद संस्थान भारतात सामील झाले. हैद्राबाद संस्थानच्या जनतेला निझामच्या अन्यायापासून मुक्त केले म्हणून त्याल मुक्तीसंग्राम म्हटले जाते.

**कै. गोधाजीराव मुखरेचे कार्य –**

कै. गोधाजीराव मुखरे यांचा जन्म एका धनाढय कुटूंबात 1 जानेवारी 1915 रोजी कै. सखाराम अप्पा मुखरे यांच्या घरात पुसदला झाला. कै. सखाराम अप्पा मुखरे पुसद परिसराचे श्रीमंत जमीनदार होते. हजारो एकर जमीन त्यांच्या मालकीची होती. भारतीय स्वतंत्र्य लढयात गोधाजीराव मुखरे यांनी म. गांधी युगात पुसद परिसरात प्रचंड कार्य केले. पुसद तालूक्यात ब्रिटिश सत्तेविरूध्द जनआंदोलने उभे करण्यासाठी गोधाजीरावांनी तन, मन, धन व सर्व भाक्ती उभी केली. त्यामुळेच पुसद भारतीय स्वातंत्र्य लढयाचे एक महत्वाचे केंद्र बनले होते. गोधाजीरावांनी स्वातंत्र्य चळवळी पुसद परिसरात निर्माण केल्यामूळे पुसदच्या जनतेने त्यांना इ.स. 1939 मध्ये पुसद नगर पालिकेचे अध्यक्ष पदावर कार्य करण्याची संधी दिली. परंतु म. गांधीच्या "व्यक्तिगत सत्याग्रह" मोहीमेसाठी गोधाजीराव मुखरे यांनी पुसद नगर पालिका अध्यक्षपदाचा राजीनामा दिला व 1940 मध्ये ते "व्यक्तिगत सत्याग्रहात" सामिल झाले. त्यामध्ये कै. अनंतराव, आबासाहेब, कै. बन्सीलाल तोशणीवाल, कै. रघुनाथराव रांजणीकर, कै. नागनाथ परांजपे, कै. शमीराव लहानकर, कै. मोहन शर्मा, कै. जगदीश हैद्राबादी, कै. बाबुराव कुंटूरकर, कै. राजाराम देशमुख बारडकर असे एकूण 51 लोकांची नोंद आढळते. या नंतर गोधाजीराव मुखरे यांनी "उमरी दरोडा प्रकरणात" सहा तुकडया निर्माण करून प्रत्येक तुकडीकडे एक एक जबाबदारी देण्यात आली. वास्तविक पाहता रझाकारांचे अत्याचार सर्व निझाम संस्थान मध्ये वाढले हाते. उमरीत त्या मानाने जास्त अत्याचार रझाकार करीत असत. म्हणून बदला घेण्यासाठी "उमरी बँक" लूटण्याची योजना आखल्या गेली. उमरी हे गाव वऱ्हाडातील उमरखेड कॅम्प पासून 60 मैल दूर होते. या बँकेत 60–70 लाख जमले असावे असा अंदाज लूट करणाऱ्याचा होता. या उमरी दरोडा प्रकरणाचे नेतृत्व श्री. अनंत भालेराव यांच्याकडे होते. पण काही दिवसांनी सरकारला सुगावा लागल्याने सरकारने उमरी बँकेच्या सुरक्षिततेसाठी पोलीसांची संख्या वाढवली, त्याशिवाय निझाम सरकारने अरबी लोकांचे खाजगी पथक तैयार केले. अरब लोकांना निझाम संस्थानमध्ये "चाऊस" म्हणतात. निझाम सरकारने उमरी गावाची चारही बाजूने कोंडी केली. सर्वत्र वातावरण तंग असायचे. कित्येक व्यापाऱ्यांनी उमरी बँकेतून आपल्या रक्कमा काढून घेतल्या. शेवटी क्रांतिकारक लोकांनी ही अफवा होती असे निझाम सरकारला माहित व्हावे म्हणून उमरी बँक दरोडयाची योजना काहीकाळ स्थगित केली. त्यामुळे ही अफवाच होती हे निझाम सरकारच्या लक्षात आल्याने पहाऱ्यात ढिल पडू लागली. म्हणून बरेच सशस्त्र पोलीस दल काढून घेण्यात आले. वरवर वातावरण शांत होताच पुन्हा क्रांतीकारकांनी योजनेची अंमलबजावणीसाठी सर्वांना एकत्र करून योजना आखल्या. तो दिवस 30 जानेवारी 1948 चा होता. या दिवशी म. गांधीची हत्या झाल्यामुळे वातावरण शोकाकूल अवस्थेत हाते. शेवटी उमरी बँकेवर दरोडा टाकण्यात आला. त्यावेळी क्रांतिकारकांनी बँकेतील रक्कम बारदान्यात भरली आणि ती रक्कम पुसदचे कै. गोधाजीराव मुखरे यांच्या घरी नेण्यात आली. एका मॅजिस्टेट समोर ती रक्कम मोजली असता 20 लाख 65 हजार भरली. उमरी बँक दरोडयात एकूण 11 जण ठार झाले. ते सर्व निझाम सरकारचे पोलीस कॅशियर, अरब व रझाकार होते. या रक्कमेचा उपयोग स्वातंत्र्य लढयासाठी शस्त्रे खरेदी करणे, वृत्तपत्रासाठी जागा घेणे, भवन बांधणे, वाचनालये यासाठी खर्च करण्यात आली. निझाम सरकारला जशाच तसे उत्तर देणे हा बँक लूटी मागे उद्देश होता.

**निष्कर्ष :–**

कै. गोधाजीराव मुखरे एक स्वातंत्र्य योध्दा होते. त्यांनी भारतीय स्वातंत्र्य लढयात पुसदच्या परिसरात फार महत्वाचे कार्य केले. म. गांधीच्या सर्व चळवळीत त्यांनी भाग घेऊन तुरूंगवास भोगला. म्हणून पुसदच्या जनतेने त्यांना पुसद नगर पालिकेचे अध्यक्ष केले हाते.

भारतीय स्वातंत्र्य लढया सोबत कै. गोधाजीराव मुखरे यांनी हैद्राबाद मुक्तीसंग्रामात भाग घेऊन आपले कार्य दाखविले. निझाम सरकारच्या अन्यायी, अत्याचारी राजवट विरूध्द जी जनता हैद्राबाद संस्थान मधून पुसद कॅम्प मध्ये येत असे त्याला मदत व सहकार्य करण्यात येत असे. असे अनेक कॅम्प कै. गोधाजीराव मुखरे यांनी चालविले. निझाम सरकारला जशास तसे उत्तर देण्यासाठी कै. गोधाजीराव यांनी "उमरी बँक प्रकरणाला" मुर्तस्वरूप दिले. त्यांनी अनेकांना मदत केली. म्हणून कै. गोधाजीराव मुखरे यांना "पुसदचा वाघ" म्हटले जाते हे विसरता यत नाही. त्यांच्या स्मरणार्थ पुसद महापालिकेने त्यांचा पुतळा एका चौकात बसवून त्याला "मुखरे चौक" हे नामकरण केले आहे.

## संदर्भ ग्रंथ व टिपा :-

(22)

1) डॉ. देशमुख किरण – मुक्तिवेध – पृ.14, प्रथमावृत्ती 2001, प्रकाशक – निर्मल प्रकाशन, कृष्णाई, कैलासनगर, नांदेड.
2) डॉ. कठारे अनिल– समग्र संशोधन – पृष्ठ 177 (खंड पहिला), प्रथमावृत्ती 2011 प्रकाशक – चिन्मय प्रकाशन जिजामाता कॉलनी, पैठण गट, औरंगाबाद
3) डॉ. कठारे अनिल– समग्र संशोधन – पृष्ठ 178 (खंड पहिला), प्रथमावृत्ती 2011 प्रकाशक – चिन्मय प्रकाशन जिजामाता कॉलनी, पैठण गट, औरंगाबाद
4) डॉ. कठारे अनिल– समग्र सं ोधन – पृष्ठ 188 (खंड पहिला), प्रथमावृत्ती 2011 प्रकाशक – चिन्मय प्रकाशन जिजामाता कॉलनी, पैठण गट, औरंगाबाद
5) डॉ. देशमुख किरण – मुक्तिवेध – पृ. 72–73, प्रथमावृत्ती 2001, प्रकाशक – निर्मल प्रकाशन, कृष्णाई, कैलासनगर, नांदेड.
6) खापरेदादा – विदर्भाचे स्वातंत्र्य योध्दे बाबासाहेब मुखरे – पृ. 5, प्रथमावृत्ती 2008, प्रकाशन संजीवनी प्रकाशन, इचलकरंजी
7) खापरेदादा – विदर्भाचे स्वातंत्र्य योध्दे बाबासाहेब मुखरे – पृ. 18, प्रथमावृत्ती 2008, प्रकाशन संजीवनी प्रकाशन, इचलकरंजी
8) खापरेदादा – विदर्भाचे स्वातंत्र्य योध्दे बाबासाहेब मुखरे – पृ. 20, प्रथमावृत्ती 2008, प्रकाशन संजीवनी प्रकाशन, इचलकरंजी
9) खापरेदादा – विदर्भाचे स्वातंत्र्य योध्दे बाबासाहेब मुखरे – पृ. 23, प्रथमावृत्ती 2008, प्रकाशन संजीवनी प्रकाशन, इचलकरंजी
10) खापरेदादा – विदर्भाचे स्वातंत्र्य योध्दे बाबासाहेब मुखरे – पृ. 26, प्रथमावृत्ती 2008, प्रकाशन संजीवनी प्रकाशन, इचलकरंजी
11) डोईफोडे सुधाकर – प्रवर्तनाचे दिवस – प्रथमावृत्ती 1999 पृ. 86–87, प्रकाशक– निर्मल प्रकाशन, कृश्णाई, कैलासनगर, नांदेड.
12) डोईफोडे सुधाकर – प्रवर्तनाचे दिवस – प्रथमावृत्ती 1999 पृ. 91–92, प्रकाशक– निर्मल प्रकाशन, कृश्णाई, कैलासनगर, नांदेड.
13) डोईफोडे सुधाकर – प्रवर्तनाचे दिवस – प्रथमावृत्ती 1999 पृ. 93, प्रकाशक– निर्मल प्रकाशन, कृष्णाई, कैलासनगर, नांदेड.

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 312 (CCCXII)
ISSN : 2278-9308
August, 2021

# भारतीय राज्यघटना आणि महिला सबलीकरण ची ऐतिहासीक वाटचाल एक अध्ययन

23

**प्रा.डॉ. एन. आर. वर्मा**
इतिहास विभाग प्रमुख श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महा.,
पुसद जि. यवतमाळ (महाराष्ट्र)
मोबाईल कं. ९४२०७७३२०३ ,ईमेल आय.डी. : narayanvarma67@gmail.com

भारतीय इतिहास अभ्यासात स्त्रीवाद, स्त्री सबलीकरण, स्त्री सक्षमीकरण हा विषय समाविष्ठ झाल्यानंतर स्त्रीविकास, स्त्रीभुमिका ची सर्व व्यापक दृष्टीकोनातून चर्चा सुरू झाली. त्यामधुन भारताच्या इतिहासात स्त्रीवर्गाचे कर्तुत्व सर्वमान्य होउ लागले. कारण १९ व्या शतकात स्त्री दर्जा चारभींतीआड कैद होता. स्त्री जीवनाला असंख्य मर्यादा, बंधने होती. कारण भारतीय समाज बुरसटलेल्या अवस्थेत जगत होता, समाजात रूढी, परंपरा ची दखल होती.

परंतू २० व्या शतकात भारतीय समाज सुधाकर च्या माध्यमातून आणि ब्रिटिश काळातील इंग्रजी शिक्षण पध्दतीमूळे काही प्रमाणात भारतीय समाजाची प्रगती होउ लागल्यावर स्त्रीदर्जा बद्दल, स्त्री भुमिका बद्दल चर्चा सुरू झाली. २० व्या शतकात अनेक भारतीय समाज सुधारकांनी आपआपल्या पध्दतीने स्त्री चळवळी करून, स्त्री दर्जाची भुमिका मांडून, स्त्री वर्गाच्या हंक्क अधिकार साठी लढा देत स्त्री वर्गाला हक्क व अधिकार मिळवून दिले. त्यातून स्त्री शिक्षणाची वाटचाल आणि गती वाढू लागली. काही प्रमाणात भारतीय समाजात स्त्री दर्जा भुमिका बदलण्यास प्रारंभ झाला.

इ.स. १९२० नंतर भारतीय स्वातंत्र्यलढयात म. गांधी चा उदय झाल्यानंतर स्त्रीचळवळीत असंख्य स्त्रीवर्ग भाग घेउ लागला. त्यानंतर स्त्री भुमिका ची चर्चा जोरात सुरू झाली. कारण म. गांधीजीच्या सत्याग्रह चळवळीत असंख्य स्त्रियांनी भाग घेउन आपले कर्तव्य, कर्तुत्व आणि कर्म सिध्दांत दाखवून दिले.

तेव्हा भारतीय स्त्री वर्गाला हक्क, अधिकार देण्याची भुमिका भारतीय पुढाऱ्यांची निर्माण झाली. त्यासाठी इ.स. १९४१ मध्ये सर बेनेगलराव समिती ची स्थापना करण्यात आली. या समितीने संपूर्ण भारतात स्त्रीवर्गाची दखल घेउन, स्त्रियांच्या हंक, अधिकार, कर्तव्य, जाबाबदारी, जाणीव निर्माण करून कायदयाची संहिता तयार केली.

भारत १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. भारताच्या स्वतंत्र प्रशाशकीय कार्यास सुरूवात झाली. इ.स. १९५० मध्ये भारताची राज्य घटना निर्माण करण्यात आली. या राज्यघटनेत स्त्री–पुरूष समानता, स्त्रियांना हंक्क, अधिकार, दर्जा, शिक्षण, प्रशाशन, कामकाज, भुमिका ची नोंद करण्यात आली. भारतीय राज्य घटनेत सर्व व्यक्ती समान, स्वतंत्रत आहेत ची दखल घेण्यात आली. सर्वांना न्यायतत्वावर समानसंधी, समान अधिकार ची जाणीव करून देण्यात आली. भारतीय राज्यघटनेत कलम १४, १५ मध्ये स्त्री वर्गासाठी हंक्क, अधिकार देण्यात आले. अशा प्रकारे राज्यघटनेने स्त्री वर्गाची भुमिका मान्य केली.

भारताची पहिली सर्वत्रीक निवडणूक इ.स. १९५२ मध्ये झाली. निवडून आलेल्या नविन सरकारने हिंदू विधी संहिता चा अहवाल बाजूला करून त्यामधील मूद्दे, तरतूदी साठी स्वतंत्र कायदे करण्यता आले. त्या मधून हळूवारपणे स्त्रियांसाठी सुधारणा कायदे पास झाले. इ.स. १९५५–५६ नंतरच्या कायदयान्वये हिंदू विवाह कायदा, पालकत्व कायदा,, दत्तक कायदा, पोटगी



23

कायदा, हुंडा बळी कायदा, कूटूंबाच्या अन्यायीजाचा साठी कायदा, कंटूंबातील कायदा, असे अनेक कायदे करण्यात आले. या कायदया व्दारे स्त्रीवर्गाच्या जीवनावर फार मोठी क्रांती घडून आली. याव्दारे असंख्य स्त्रियांना सुरक्षितता लाभली. त्यामधून स्त्रीवर्गाचे शिक्षणाचे कार्यक्षेत्र वाढले. स्त्रीवर्गाचा आत्मा जागृत झाल्याने स्त्रीवर्ग आत्मभानच्या भरारीकडे वाटचाल करून लागला. इ.स. १९७० नंतर स्त्रीवर्गाने अनेक क्षेत्रात भरारी, उडान मारण्याचे कार्य केले. स्त्री वर्ग आता घरकाम करून बाहेर च्या क्षेत्रात आपले योगदान, कर्तबगारी दाखवू लागला. आपल्या कुटूंबाला आर्थिक हातभार लावू लागल्या. स्त्रीवर्ग काही प्रमाणात नोकरी ची संधी शोधू लागला. पण हे करीत असतांना असंख्य स्त्रियांना बरीच धावपळ, तारेवरची कसरत करावी लागत असे.

भारतीय स्त्रीवर्ग आता बाहेर पडल्यामूळे कुटूंबात मानसीक ओढाताण, कुजबूज सुरू झाली. भारतीय कुटूबसंस्था परंपरावादी, भावनीक, अंधश्रध्दाळू व अज्ञानी असल्यामूळे स्त्री वर्गाचे कर्तुत्व त्यांना अवघडल्यासारखे होत असे. स्त्रीवर्गाला बाहेर, नोकरीला, स्वावलंबी जीवनाला जाउ देणे भारतीय कुटूंब संस्थेला कलह, वादविवाद निर्माण करणारे ठरले. त्यामधून स्त्रीवर्ग स्वतंत्र होण्यासाठी, आपले कर्तूत्व दाखवीणेसाठी जागृत झाला. बदल घडतांना संघर्ष होत असतात. स्त्री वर्गाला आता शिक्षणामूळे मानसीक, भावनीक, समाधान पाहिजे होते. एक माणूस म्हणून स्वत:हाचे अस्थित्व साध्य करायचे हाते. समाजात मानसन्मान, स्वच्छंदता, स्वतंत्रता पाहिजे होती. या सर्व उदिष्ठासाठीच इ.स. १९७५ मध्ये स्त्री चळवळ, स्त्रीमुक्ती चळवळ चा उदय झाला.

इ.स. १९७५ हे वर्ष ''आंतरराष्ट्रीय महिला वर्ष'' संयूक्त राष्ट्र संघटनेने घोषीत केले. दि. ८ मार्च ''आंतरराष्ट्रीय महिला दिवस'' दरवर्षी साजरा करावा हे जाहीर करण्यात आले. यामधून स्त्री वर्ग नविन युगाकडे वाटचाल करून लागला. स्त्री शिक्षणाच्या स्फोटातून स्त्री वर्गाच्या जीवनात वैचारी क्रांती घडून आली. स्त्री वर्गा समोर असलेली आव्हाने, प्रश्न, समस्या सोडवीण्यासाठी सर्व बाजूने चर्चा घडू लागली. एकेकाळी धगधगत्या चितेवर आगीच्या ज्वालांनी होरपडून निघणारी स्त्री आज स्त्री शिक्षणाने सर्व क्षेत्रात आपल्या कर्तुत्वाचा, कर्तबगारीचा झेंडा निर्माण करीत असलेले चित्र समाजात दिसत होते. हाच खरा स्त्री शिक्षणाचा परिणाम होय.

इ.स. १९७५ नंतर स्त्रीवर्गाच्या जाणीव, जागृतीचे समाजात चित्र आहे. यानंतर स्त्री वर्गाकडून वैचारीक मंथन घडून क्षमतेत परिवर्तन घडू लागले. तर भारत सरकारकडून महिला आयोगाची स्थापना झाली. या आयोगाने समाजात स्त्रीवर्गाचे स्थान, दर्जा, घटनात्मक तरतूदी, शिक्षण, कायदा, सुधारणा, नोंकरदार स्त्रीचे प्रश्न, रोजगाराचे प्रश्न, स्त्रीवर्गाच्या अडचणी, वेतन, जन्म—मृत्यु दर, ची जाहीर चर्चा सुरू केली. त्यात आयोगाचे निष्कर्ष स्त्रीवर्गासाठी समाधानकारक नव्हते.

वास्तवीकपाहता भारत स्वातंत्र झाल्यावर स्त्रीचळवळी काही प्रमाणत होत्या परंतू १९७५ नंतर त्याला व्यापक स्वरूप आले. इ.स. १९७५ नंतर स्त्रीचळवळी च्या माध्यमातून विविध संघटनानी मोर्चे, आंदोलने, जनजागरन सभा, घेउन स्त्री वर्गाला मानसीक आधार दिला. इ.स. १९७५ मध्ये स्त्रीमुक्ती संघर्ष वर्गाला मानसीक आधार दिला. इ.स. १९७५ मध्ये स्त्रीमुक्ती संघर्ष परिषद, व्दारे स्त्रीवर्गासाठी राज्यव्यापी परिषद झाली. त्यामध्ये असंख्य स्त्रीवर्गाने भाग घेउन, विचार मंथने करून, पुढील कृती, धोरण ठरवीले. इ.स. १९८० मध्ये बलात्कार विरोधीमंच, इ.स. १९७५ मध्ये स्त्रीमुक्ती यात्रा काढून कृतीशील कार्य करण्यात आले. स्त्रियांनी याव्दारे हातातून समाजीक रचने विरूध्द कार्यक्रम तयार करण्यात आला. त्यामधून स्त्रीवर्ग आत्मभान च्या टप्यावर उभाराहून आत्मसन्मान मिळवीण्यासाठी संघर्षरत झाला.

इ.स. १९८० वर्षा नंतर भारतात राजकीय पक्षाच्या कार्यक्रमानुसार अनेक संघटना स्थापन झाल्या. त्यानंतर गावागावात महिला मंडळे स्थापन झाली. राजकीय पक्षाच्या ध्येयधोरणानुसार कृतीशील धोरण आखण्यात आले.

इ.स. १९७६ मध्ये श्रीमती प्रमिला दंडवते यांची ''महिला सक्षता समिती'' स्थापन झाली. त्याचे मुंबई, दिल्ली, आध्रप्रदेश, तामिलनाडू, उत्तरप्रदेश, मध्ये शाखा स्थापन होउन स्त्रीवर्गासाठी सुधारणाचे कार्य सुरू झाले.

इ.स. १९८२ मध्ये ''नारी समता मंच'' ची स्थापना झाली. त्यांनी स्त्री अत्याचार विरोधी केंद्र म्हणून कार्य केले. स्त्री वर्गाला नोकरीच्या ठीकाणी होत असलेले अन्याय, अत्याचार विरोधात जागृती, प्रबोधन, मार्गदर्शन करण्यात आले. नोकरदार स्त्रियांचा प्रश्न उचलला.

इ.स. १९८० नंतर ''अखील भारतीय जनवादी महिला संघटना'' व्दारे स्त्रीवर्गाच्या प्रश्न समस्यावर कार्य करण्यात आले. या संघटनेने संपूर्ण भारतात हुंडा बंदी, स्त्रि भ्रणहत्या, कौटूंबीक हिंसाचार, विरूध्द समाजात जणजागृती केली.

इ.स. १९८० मध्ये पुण्यात ''स्त्री आधार केंद्र'' स्थापन झाले. आमदार डॉ. निलम गो—हे यांच्या नेतृत्वात स्त्री वर्गाच्या विविध प्रश्नावर अनेक कार्यक्रम घेउन कौटूंबीक हिंसाचार विरोधात कार्य केले आणि स्त्री वर्गात जागृती घडवीली. वास्तवीक या संघटनेने ग्रामीण भागात, क्षेत्रात स्त्री वर्गाला संघटीत करून जनजागृती घडवून आनली चे चित्र समाजात आहे.

इ.स. १९९० नंतर राजकीय क्षेत्रात बरीच जागृती घडून आली. महिला बचत गटांची स्थापना होउ लागली. स्त्री वर्ग, त्याचे प्रश्न, समस्या मुळे संघर्ष घडून येउ लागले, आंदोलन होउ लागली, स्त्री प्रश्नातून अनेक ठिकाणी ''स्त्री अभ्यास केंद्राची'' स्थापना होउन कार्यपध्दतीत कृती परिवर्तन घडून येउ लागले. त्यामधून स्त्रीवर्गाची परिस्थीती सुधारण्यास मदत झाली. यामधून राजकीय हक्क अधिकार स्त्रीवर्गाला मिळावे ची चर्चा सुरू झाली.

कारण या काळात स्त्रीवादी लेखन कार्य घडून आले आणि नियत कालिके, ग्रंथे, पुस्तकाची निर्मीती झाली. स्त्री मासिकाने उदबोधनाचे कार्य करून स्त्री वर्गाच्या समस्या मांडून जनजागृती केली. माहेर, मनिनी, गृहलक्ष्मी, अनूराधा, वाहिनी या सरखे नियतकालीके निघाली. यामधुन स्त्री वर्गाचया प्रश्नाकडे लक्षवेधण्यात आले. तर कवितेच्या क्षेत्रात इंदिर संत, अनूराधा पोतदार, शांता शेळके, अरूणा ढेरे, अनूराधा पाटील, यांच्या स्त्री साहित्याव्दारे जनजागृती घडली. गौरी देशपांडे, आशा बगे, निर्मला देशपांडे, उर्मिला सिरूर, निलीमा भावे, वसूधा माने, वसूधा पाटील, कुसूमावती देशपांडे, दुर्गा भागवत, इरावती कर्वे, डॉ. सरोजीनी वैद्य, विजया राजाध्यक्ष, डॉ. उषा देशमूख यांच्या स्त्रीवादी वैचारीक लेखाव्दारे स्त्रीजीवनाचे प्रश्न मांडल्या गेले. या सर्व लेखन प्रवाहात स्त्रीमुक्ती चळवळ चे कार्य असायचे.. स्त्री वर्गाला स्वतंत्रपणे जगता यावे, एक माणूस म्हणून वागता यावे, गुलामगिरी ची बंधने नसावी, स्वतंत्रता आणि समानता हे अपरिहार्य आहे, या संबंधी लख होती. त्यामूळेच स्त्री चळवळीची उद्दिष्ठे, तत्वे यशस्वी झाली.

एकंदरीत स्त्री चळवळीचे कार्य सुरू असतांना एक विसंगती होती. स्त्री वर्गाला निर्णय घेणे, आर्थिक स्वातंत्र्याचे कार्य करणे, सोपे नव्हते. समाजात स्त्री वर्गाला सुरक्षितता नव्हती. करण स्त्री वर्ग जरी शिखण घेउन नोकरी करीत असला तरीही कुटूंबाच्या, संस्काराच्या, समाजाच्या परंपराचे ओझे होते. ही एक प्रकारची विषमतातच होती. समानतेच्या विचाराला मर्यादा होती.

म्हणूनच महिला आंदोलन पत्रिका ''बायजा'' मिळून साऱ्याजणी या त्रि लेखनवादी मासिकाव्दारे वैचारीक लेखन करून स्त्री मुक्ती चळवळ, स्त्रीवादी दृष्ठीकोन वाढवीण्याचे कार्य केले. या मासिकांनी स्त्री चळवळीव्दारे होणारे उपक्रम, चर्चा, आंदोलने, परिसंवाद, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांचा अहवाल प्रसिध्द करण्यावर भर दिला आणि स्त्री त्यामधून स्त्रीमुक्ती विषयी

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 312 (CCCXII) | ISSN : 2278-9308 August, 2021

प्रश्न हाताळले समाजमत कसे आहे, समाजात स्त्री मुक्ती विषयी गैरसमाज वाढू नये या हेतूने ''बायजा'' मासिकाने इ.स. १९९३ च्या दिवाळी अंकात चार महतवाचे लेख प्रसिध्द केले. या लेखात स्त्री चळवळी संदर्भात परामर्श घेतला आहे. एकंदरीत स्त्री चळवळीचे वाढते कार्यक्षेत्र स्त्री वर्गाचे प्रश्न आहेत. स्त्री वर्गाला जागृत करून अन्याय विरोध आवाज उठवून, मार्गदर्शन करून सर्व क्षेत्रातील वर्गातील स्त्री वर्गाला सक्षमकरणे हे उदिष्ठ आहे. स्त्री वर्गाला संघटीत करून आता अन्याय, राजकीय घडामोडी विषयी जागृतीकरून अदासीनता दुर करणे आणि समानताचा जयघोष करण्यासाठी ही संघटना, चळवळ कार्यरत आहे हे दिसून येते. त्यामधून स्त्री वर्गाला जाणीव जागृती करणे बदलत्या परिस्थीतीत भानावर आनने, निर्भीड माणूस बनवीणे शक्य होणार आहे.

**निष्कर्ष :—**

एकंदरीत भारतीय राज्य घटनेमुळे आणि स्त्री सबलीकरण कायदयामूळेच स्त्री मुक्ती चळवळ ने स्त्रीवादी विचाराचा प्रसार करून, स्त्रीवादी समस्या मांडून, आवाज उठवून लोकांना, समाजाला जागृत करण्याचे कार्य केले. इ.स. १९७५ ते २००० या २५ वर्षाच्या काळात नियतकालिके, मासिके यांनी स्त्री प्रश्नाबद्दलन समाजाचे लक्ष वेधले. वास्तवीक पाहता स्त्रीवादी लेखन कार्य पुरूष प्रधानते विरूध्द नव्हते. उलट पुरूषांचे सहकार्य स्त्रियांना अपेक्षीत होते. स्त्रीमुक्ती कार्यक्रम चा विरोध समाज व्यवस्थेला होता. कारण समाजात बरेच दोष होते. व्यवस्थेच्या विरोधात राहून परिवर्तन घडवून आनने हा मुख्य हेतू होता. जो गैरसमज आहे तो दूर होणे आवश्यक आहे.

इ.स. १९९० पर्यत स्त्री चळवळी चे कार्य वाढलेले दिसून येते. कारण इ.स. १९९३ मध्ये ७३आणि ७४ वी घटना दुरूस्ती झाली. त्यानुसार पंचायत राज व्यवस्थेत स्त्री वर्गाला ३३ टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या. कारण जोपर्यत स्त्री वर्गाला सर्व क्षेत्रात, विकास प्रक्रियेत सहभागी करून घेतले जाणार नाही तोपर्यत राष्ट्राची प्रगती होणार नाही हा दृष्टीकोण सर्वत्र निर्माण झाला होता. या कायदयामूळे निर्णय प्रक्रयेत स्थानीक स्वराज्य संस्थेत स्त्री वर्गाला राखीव जागा मिळाल्याने स्त्री सक्षमीकरणाला बळकटी आली, अनेक स्त्रियांनी पंचायतराज व्यवस्थेत नेतृत्व नेतृत्व केले आणि आपली कर्तबगारी सिध्द केली. हे सर्व भारतीय राज्य घटनेमुळे शक्य झाले.

आज २१ व्या शतकात स्त्री चळवळीने शहरीभागात उत्कृष्ठ कार्य करून त्याचा पाया आता ग्रामीण क्षेत्र, दलितक्षेत्राकडे, कष्टकरी, परिचारिका, कामगार स्त्री वर्गाकडे वळवीला. त्यानंतर गर्भजल तपासनी, स्त्रीलिंग गर्भ असेल तर गर्भपात करण्याची स्त्री वर्गावर होणारी सक्ती विरूध्द चळवळीची दिशा निर्माण केली. त्यामूळे सरकारला कायदा करावा लागला. आज स्त्री चळवळ स्त्री वर्गाला बळ देउन, संघटीत करून, अन्याय सहन करणार नाही ही प्रतिमा निर्माण करीत आहे. त्यासाठी स्त्री आधार केंद्रा मार्फत खचून गेलेल्या स्त्री वर्गाला मदत केली जाते. समाजात स्त्री प्रश्नाबाबत पारंपारीक भावना नष्ठ करून समानता घडवून आणण्यासाठी विचार परिवर्तन, मत परिवर्तन करण्याचे कार्य केले जात आहे. त्यामूळेच आजच्या काळात स्त्री प्रधान चित्रण समाजात पहावयास मिळते, स्त्री विषयक विचारांनी प्राधान्य मिळत आहे. म्हणून आजची स्त्री स्वत:हाची ओळख निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहे.

**संदर्भ ग्रंथ :—**

१) डॉ. कोठेकर शांता—आधूनीक भारताचा इतिहास—साईनाथ प्रकाशन, नागपूर, आवृत्ती सहावी, २०१४.
२)डॉ. कठारे अनील — भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास, एज्यूकेशन बूक सप्लायर्स, औरंगाबाद, २०१३.
३)डॉ. भागवत विघूत — स्त्री प्रश्नाची वाटचाल, प्रतिभा प्रकाशन, पूणे, प्रथमावृत्ती, २००४.
४)डॉ. कुलकर्णी अंजली — स्त्री प्रश्न : एक आवर्त, नंदिनी पब्लीसींग हाउस, पूणे, प्रथमावृत्ती २०१३.
५)संपादक मंडळ — किर्लोस्कर — अंक १००१ — जाने/फेब्र. २००६.

ISSN: 0974-3065

# "भारतीय स्वातंत्र्य लढयात विदर्भातील स्त्रीवादी नेतृत्वाचे आणि स्त्री चळवळीचे योगदान एक अभ्यास''

27

प्रा.डॉ. एन. आर. वर्मा
इतिहास विभाग प्रमुख
श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महा.,
पुसद जि. यवतमाळ (महाराष्ट्र)
मोबाईल कं. ९४२०७७३२०३
narayanvarma67@gmail.com

आधूनिक भारताच्या इतिहासात इतिहास लेखन पध्दतीत अनेक प्रकारचे विचार प्रवाह निर्माण झाले. भारतीय इतिहासाचे निपक्ष विश्लेषण केले असता जाणवते की, भारतीय समाजाने स्त्रीवर्गाला त्यांच्या कार्याचे, त्याच्या कर्तुत्वाचे, त्यांच्या योगदानाचे योग्य प्रकारे विश्लेषण केले नाही. त्यामूळे इतिहास पुर्न लेखन लेखकांनी आता स्त्रीवर्गाला योग्य न्याय देण्यासाठी इतिहासाची पूर्नर लिखीत मांडणी करून स्त्रीवादी नेतृत्वाचा, कर्तुत्वाचा विचार प्रवाह मांडला पाहिजे. कारण भारतीय समाजाच्या गुलामगिरीत आणि मानवी संवदेना हरवून गेलेली स्त्रीवर्गाला आता न्याय देण्याची गरज आहे. स्त्रीवर्गाचे कर्तुत्वही एक भारतीय स्त्री चळवळ नसून ती आता वैश्वीक चळवळ बनली आहे. स्त्रीवाद चळवळीने स्त्रियांना एक माणूस, एक व्यक्ती, एक नागरीक म्हणून जागण्याचा हंक्क व अधिकार दिला आहे.

प्राचीन काळा पासून तर १९ व्या शतकापर्यंत स्त्रीवादी चळवळीचा इतिहास स्त्रियांसाठी संवेदनाशुन्य होता. स्त्रीवर्गाला आत्मभान म्हणजे काय हे माहीतच नव्हते. शेवटी १९ व्या शतकातील समाज सुधारकांच्या चळवळीतून आणि स्त्री शिक्षणातून स्त्रीवर्ग लिहू लागला, वाचू लागला आणि बोलू लागला. त्यावेळी स्त्री वर्गाचे जीवन पती, पतीचे जीवन व कुटूंब पर्यत मर्यादीत होते. यालाच स्त्री धर्म हे गोंडस नाव देउन स्त्री वर्गाला भारतीय समाज, संस्कृती, पंरपराने बंदीस्त केलेला इतिहास आपना सर्वांना माहीतच आहे.

२० व्या शतकात भारतीय स्वातंत्रलढयाला योग्य गती प्राप्त झाली. हा काळ राजकीय जागृतीचा होता. भारतावर आणि विदर्भावर इंग्रज सरकारचे राज्य होते. इ.स. १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे प्रथम अधिवेशन मुंबई ला भरले त्यामध्ये विदर्भातील एकही प्रतिनीधी हजर नव्हता. तरी पण कॉंग्रेस स्थापनेचे पडसाद विदर्भात पडले. तेंव्हा हळूवारपणे राजकीय जनजागृती होण्यास प्रारंभ झाला हाता. कारण अमरावती येथील काही स्वातंत्र्यवादी पुढाऱ्यानी अमरावतीला ''वऱ्हाड सार्वजनीक सभा'' ची स्थापना केली. या सभेच्या माध्यमातून जनतेचे प्रश्न, समस्या इंग्रज सरकारकडे मांडण्याचे कार्य होत असे. विदर्भातील स्वातंत्र्यवादी दादासाहेब खपर्डे, सरमोरोपंत जोशी, बॅरिस्टर रंगनाथ मुधोळकर यांनी पुढाकार घेउन भारतीय स्वातंत्र्याची चळवळ सुरू केली. त्यावेळी विदर्भातील पुढाऱ्याचा अखील भारतीय

ISSN: 0974-3065

(28)

कॉग्रेस वर चांगला प्रभाव होता. इ.स. १८८१ मध्ये कॉग्रेसचे अधिवेशन नागपूर ला बोलावण्यात आले. त्यामूळे भारतीय व्यासपीठावरून विदर्भातील जनतेला आपले प्रश्न, समस्या मांडण्याची संधी मिळाली. या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष नागपूरचे बॅरिस्टर सी. नारायण स्वामी नायडू हे होते. या अधिवेशनाला लो. टिळक प्रथम विदर्भात आले. त्यामूळे विदर्भातील स्वातंत्र्यवादी पुढाऱ्याचा प्रथमच लो. टिळकांशी संबंध प्रस्थापीत झाला. इ.स. १८९४ मध्ये अमरावतीचे दादासाहेब खापर्डे, मधोळकर आणि अकोल्याचे दिगंबर यांनी ''वऱ्हाड प्रांतीक कॉगेस कमेटी'' ची स्थापना केली. या वेळी लो. टिळक यांचे 'केसरी' वर्तमानपत्र मोठया प्रमाणात विदर्भात वाचल्या जात असे. केसरी पत्राने विदर्भात प्रचंड राजकीय जन जागृती निर्माण केलेली आढळते. तेंव्हा दादासाहेब खापर्डे विदर्भातील जहाल गटाचे लो. टिळकांचे अनूयायी दिसून आले. इ.स. १९१२ मध्ये वऱ्हाड साठी स्वतंत्र विधान सभा निर्माण करण्यात आली. विदर्भात लो. टिळकाच्या कार्याला स्त्रीवर्गानी मोठया प्रमाणात पाठींबा दर्शवीला होता. त्यामध्ये अकोला येथील श्रीमती दुर्गाबाई जोशी या प्रमूख होत्या. त्यांचा उल्लेख वऱ्हाडची वाघीण म्हणून केला जातो. म. गांधी युगात वऱ्हाड मध्ये वीर वामनराव जोशी श्री. बापूसाहेब सहस्त्रबुध्दे, श्री. दादासाहेब पंडीत, श्री. आबासाहेब कुळकर्णी सोबत दुर्गाबाई जोशी यांनी वऱ्हाडमध्ये इंग्रजी सत्तेविरूध्द स्वांतत्र्याची चळवळ मोठया प्रमाणात उदयास आनली. श्रीमती दुर्गाबाई जोशी यांनी सर्वावर मात करून स्त्रीवादी गट तयार करून यमुनाबाई ताकवाले, सौ. मामी पांडे, सरस्वती बाईमेहरे, ताराबेन मश्रूवाला, राधाबाई ओक याच्या सोबत स्वातंतत्र्यवादी कार्य करून भारतीय स्वातंत्र्य लढयात उत्साहाने भाग घेतला. स्त्रीवर्गाचे प्रतिनीधी म्हणून श्रीमती दुर्गाबाई जोशी वऱ्हाड भागात प्रचंड कार्य करीत. इ.स. १९३० च्या जंगल सत्याग्रहात, सविनय कायदेभंग चळवळीत वहीहांडा येथे मीठाचा सत्याग्रह केला. त्याच्या प्रेरणेतून अमरावतीत सौ. पार्वतीबाई पटवर्धन, यवतमाळ येथे सौ. आनंदीबाई दामले यांनी मीठाचा सत्याग्रह केला. श्रीमती दुर्गाबाइ जोशी यांच्या स्वातंत्र्यवादी कार्यामूळे इ.स. १९३२ मध्ये ९ महिण्याची शिक्षा झाली. अकोला येथील चंद्रभागाबई वडोदकर यांच्या नेतृत्वात इ.स. १९२१ मध्ये दारूबंदी साठी सत्याग्रह झाला. तेव्हा चंद्रभागाबाई वडोदकर यांना ०३ दिवस तुरूंगात जावे लागले. वर्धा येथील जमनालाल बजाज यांच्या पत्नी सौ. जानकी देवी बजाज यांनी स्वातंत्रवादी चळवळीला वाहून घेतले होते. त्यांनी आपल्या भाषनाव्दारे स्त्रीवर्गात मोठा प्रभाव पाडला. जानकीदेवी बजाज यांनी चरखा, खादी चा प्रचार प्रसार केला आणि स्त्रीवर्गाचा सहभाग वाढवीण्याचे कार्य केले.

म. गांधीच्या असंख्य चळवळीत सुशिक्षीत स्त्री वर्गाने भाग घेउन पुरूषांच्या खांदयाला हातभार लावण्याचे कार्य केले. परदेशी कापडाची होळी असो किंवा सुतकताई असो स्त्रीवर्गाने स्वातंत्र्य चळवळीत बरेच कार्य केले. इ.स. १९३० च्या दांडीयात्रेत, पिकेटींग सत्याग्रहात, कायदेभंग चळवळीत बऱ्याच स्त्रीवर्गाने भाग घेतला. म.गांधी यांनी स्त्रीदास्य विमोचनाच्या चळवळीची सांगड राजकीय आंदोलनाशी घातलेली दिसून येते. जंगल सत्याग्रहात विदर्भातील अनेक स्त्री वर्गाने सत्याग्रह करून इंग्रजी सत्ते विरूध्द स्वातंत्रलढा पुकारला होता त्यामध्ये प्रामूख्याने अनूसयाबाई काळे

ISSN: 0974-3065

हया युध्दमंडळाच्या अध्यक्षा होत्या. त्याच्या सोबत विद्यावती देवडीया, चंद्रभागाबाई पटवर्धन, सुशीलाबाई गाडगीड, गोपाबाई मालतीबाई थत्ते, जानकीबाई बजाज, गीता साने, अंबीका मेहरे, सौ. जिजाबाई देशपांडे, पार्वतीबाई पटवर्धन, सौ. पार्वतीबाई पत्की, रंगबाई मिडवाईफ, सौ. कोकीळाबाई प्रधान, सौ. चंदुबाई बनसोड, गोपाबाई अग्रवाल, सौ. लक्ष्मीबाई दांडेकर प्रमूख होत्या.

इ.स. १९३० मध्ये ''वऱ्हाड प्रांतीक यूध्द मंडळ'' स्थापन झाले. त्या समितीवर श्रीमती दुर्गाबाई जोशी, ताराबेन मश्रुवाला यांनी कार्य कले. यावेळी वऱ्हाड प्रांतात मिळाचा सत्याग्रह, कायदेभंग चळवळ, जंगल सत्याग्रह हे तीन प्रकारचे सत्याग्रह चालत होते. यावेळी सत्याग्रहाचे मूख्य उद्देश, कार्यपध्दती स्त्री वर्गात सांगण्याचे कार्य वरील स्त्रीवर्गाने विशेष करून केलेले दिसून येते. महाराष्ट्राचे प्रसिध्द समाज सुधारक कै. गोपाल गणेश आगरकर यांच्या विधवा पत्नी श्रीमती यशोदाबाई आगरकर हया ६१ वर्षाच्या असतांनाही म. गांधीच्या मिठाच्या सत्याग्रहात भाग घेउन राष्ट्रध्वज फडकवीण्याचे कार्य त्यांनी केले. वृध्दपकाळमूळे इंज सरकारने त्यांना अटक केली नाही. अमरावतीच्या पटवर्धन दाम्पत्यांनी आणि यवतमाळच्या दामल दाम्पत्यांनी आपआपल्या भागात सत्याग्रह मोठया प्रमाणात चालवीण्याचे कार्य केले.

अकोल्याच्या सौ. प्रमिलाताई ओक, सौ. राधाबाई ओक, सौ. चाफेकर या तीन भगिनीनी उत्साहत कार्य करून स्वातंत्र्य चळवळीला हातभार लावला. अमरावतीच्या मथूबाई लिमये, सौ. राधाबाई गोखले, कु. अंकुताई साठे, श्रीमती यमूताई टांकरखेडकर, यांनी स्वराज्य कार्यात प्रचार करून भाग घेतला. यवतमाळमध्ये सौ. आनंदीबाई दामले, सौ. लक्ष्मीबाई सोमण, श्रीमती रंगूबाई, श्रीमती लक्ष्मीबाई आपटे, श्रीमती अन्नपूर्णा बाळ, श्रीमती माई टकले, सौ. द्रोपदीबाई चव्हाण यांनी भाग घेउन विशेषकार्य स्वराज्यासाठी केले.

इ.स. १९३२ मध्ये कायदेभंग चळवळी जोरात चालू असतांना वाशिम मध्ये सौ. शुभगबाई काशिकर, गोदूताई साने यांनी वाशिम मधून पुढाकार घेउन कायदयाचा भंग करून स्वराज्य कार्यात, भारतीय स्वातंत्र लढयात विशेष पुढाकार घेतला. म्हणून इंग्रज सरकारने त्यांना ६—६ महिण्याची तुरूंगवासाची शिक्षा दिली. यावेळी मंगरूळपीर च्या सौ. उमाबाई खपली, सो. सुंदराबाई देशमूख यांनी सुध्दा स्वाज्यासाठी कार्य केले. त्यांना ३—३ महिणे शिक्षा झाली. अचलपूराच्या श्रीमती लक्ष्मीबाई दांडेकर यांच्या कार्याने अचलपूरला राजकीय जनजागृती घडली.

अमरावतीच्या पार्वतीबाई पटवर्धन यांनी दारूबंदी, कायदेभंग चळवळीत भाग घेउन खेडयापाडया पर्यंत ही चळवळ जागृत केली.

बुलढाण्यातील ताराबाई कानिटकर, इंदिराताई गडे, इंदूमती देशपांडे शालीनीताई देशपांडे, कमलाताई रेंगे यांनी राष्ट्रीय कार्यात आपला सहभाग नोंदवून लढयात भाग घेतला. खामगांव येथील सरजाबाई देशपांडे, पार्वतीबाई पारसनीस यांनी खामगांव परिसरात स्वातंत्रवादी चळवळी केल्या. खेडयापाडयात जीजी देशपांडे, रूख्मीबाई कोरडे यांनी दारूबंदी, परकीय मालावर बहिष्कार सारखे कार्य करून स्वातंत्रलढयाला हातभार लावण्याचे कार्य केले. नागपूरातही सौ. अनूसयाबाई काळे

ISSN: 0974-3065


यांच्या नेतृत्वात 'भगिनी मंडळ' स्थापन झाले. याव्दारे त्यांनी दारू बंदी, परकीय मालावर बहिष्कार, परदेशी मालाची होळी, स्वदेशीचा स्वीकार या सारखे कार्य करून आपल्या कार्याचा ठसा उमटवीला सौ. अनूसयाबाई काळे युध्द मंडळ च्या अध्यक्ष असल्याने त्यांनी कमलाबाई होस्टेप, विद्यावती देवडीया, वत्सला कर्णीक, विमलाताई अभ्यंकर, गोपूताई जोगलेकर, सरस्वती तिकेकर, लिलाताई ढवळे, गंगाबाई चौबे,चतूराबाई कोटकर यांना स्वराज्य कार्यात पुढे आनून भारतीय स्वातंत्रलढयात भाग घेण्यास प्रेरणा दिली. आर्णी, हिंगणघाट येथिल कृष्णाताई आणि चंम्पूताई बन्सोड यांनी बहिष्कार स्वदेशी चा प्रचार केला. चंद्रपूर येथील पुरूषासोबत स्त्रीवर्गाचा सूध्दा मोठा हात भार लावला. गोपीकाबाई कन्नमवार, गोपीकाबाई फुलझेले, प्रतिमा यासीफ, यांच्या नेतृत्वात यांच्या नेतृत्वात बहिष्कार, स्वदेशी चळवळ, मीठाचा सत्याग्रह, झेंडा सत्याग्रह विदेशी कापडाची होळी सारखे स्वराज्यासाठी कार्य करण्यात आले. भंडारा, गोंदिया भागात आनंदी जोगळेकर, लक्ष्मीबाई जव्हेरी यांनी कार्य करून तुरूंगवास पत्कारला.

भारतीय स्वातंत्र्य लढयात आष्टी आणि चिमूर स्वतंत्रलढा फार गाजला. विदर्भातील आष्टी आणि चिमूर लढयात सर्व देशवासीयाचे लक्ष लागले. आष्टी जि. वर्धा या गावी राष्टसंत तुकडोजी महाराज यांच्या स्वराज्यवादी, स्वातंत्रवादी भजन, कीर्तणाने आणि आरती मंडळ, आखाडे मंडळ, वाचनालये या काय्रतून प्रचंड जन जागृती घडून आली. म. गांधीजीच्या करा किंवा मरा या संदेशाचे पत्रक आष्टी भागात घडकले दि. १६ ऑगस्ट १९४२ या दिवशी चलो आष्टी चा नारा देण्यात आला. आष्टीला जाण्यासाठी अनेक सत्याग्रही तयार झाले. विश्व विजयी तिरंगा प्यारा झेंडा उंचा रहे हमारा हे गीत प्रत्येकाच्या तोंडात होते. आष्टीच्या गांधी चौकात दोन स्वातंत्र वादी सैनिक राष्ट्रीय गीत म्हणत होते. ३५०—४०० सत्याग्रही जयघोष करीत आष्टी पोलीस स्टेशनकडे निघाल. त्यावेळी आष्टीचा ठाणेदार सबइन्सपेक्टर रामनाथ मिश्रा होता. त्याला बातमी मिळाली की पोलीस स्टेशनवर मोर्चा येणार आहे. त्याने सुध्दा सत्याग्रही सोबत काय करायचे ची तयारी केली होती. आष्टी पोलीस स्टेशनवर तिरंगा फडकवीण्याचा प्रयत्न सत्याग्रही करू लागले. त्याला ठाणेदार रामनाथ मिश्राचा विरोध होता. शेवटी पोलीस स्टेशन मधून गोळी बार झाला. जमाव भयभीत झाल्याने पांगतांना पोलीस स्टेशवर गोटयाने उत्तर देण्यात आले. सर्वत्र पोलीस स्टेशवर गोटमार सुरू झाली. जमाव पोलीस स्टेशन मध्ये घूसला आणि पोलीस स्टेशन पेटवून दिले. त्यामूळे इंग्रज सरकार बिथरले. त्यांनी आष्टी गावात सैन्य आनले. सैन्याच्या १७ गाडया भरून आल्या. त्यांनी सत्याग्रहीवर अनेक प्रकारचे अमानूष अत्याचार केले. त्यामूळे अनेक कुंटूबाची वाताहात झाली. अनेकाच्या नशिबी हाल अपेष्ठा झाल्यात कोर्टकचेरी झाली अनेकांना फासावर लटकविण्यता आले. त्यासाठी इ.स. १९४३ मध्ये सौ. अनूसयाबाई काळे यांच्या अध्यक्षतेखाली ''फाशी निवारण समिती'' स्थापन झाली. या आष्टी भिषन संकटात अहिल्याबाई नागापूरे कासाबाई लोहारीण, विठाबाई शिंदे, कौसल्याबई, शेवंताबाई या स्त्री वर्गाने भाग घेतला होता.

ISSN: 0974-3065

(31)

तसेच चिमूर जि. चंद्रपूर यागावी सूध्दा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रेरणेतून भजनगीतातून प्रचंड सत्याग्रह झाला. चिमूर क्रांती नावाने प्रसिध्द गावात रक्ताचे पाट वाहल्या गेले. चिमूर च्या जनतेवर, सत्याग्रहीवर इंग्रज सरकारने अनेक प्रकारचे पाशवी अत्याचार केले. चिमूर हत्याकांडची चौकशी करण्याची मागणी पुढे आली असता सौ. विमलाबाई देशपांडे, कु. विमलाबाई अभ्यंकर या भगिनींनी स्वत:हा चिमूर परिसरात जाउन बळी पडलेल्या, अत्याचार, अमानूष मारहान झालेल्या सत्याग्रही ची भेट घेउन, स्त्रीवर्गावरील अत्याचाराची चौकशी ची मागणी केली. चिमूर स्वातंत्र संग्राम मधील सत्याग्रहींना फाशी झाली. तेव्हा सौ. अनूसयाबाई काळे यांनी फाशी निवारण समिती स्थापन करून न्याय देण्याचा प्रयत्न केला. सौ. अनूसयाबाई काळे या स्वत:हा आष्टी, चिमूर हत्यांकांड आणि फाशी रद्द करण्यासाठी म. गांधी याना भेटल्या परंतू त्यात त्यांना यश आले नाही.

इ.स. १९३० मध्ये यावली जि. अमरावती येथे सूध्दा प्रचंड सत्याग्रह करण्यात आला. म. गांधीजीचे विचार खेडयापाडया पर्यंत पोहचले असल्याने खेडयात प्रचंड राजकीय जनजागृती झाली. इ.स. १९३० मध्ये यावली मध्ये कायदेभंग चळवळ करण्यात आली. सत्याग्रहीनी यावलीत जंगल सत्याग्रह केला. या सत्याग्रहींना शेवटी पकडून सहा—सहा महिण्याची शिक्षा देण्यात आली.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या लष्करात कॅप्टन लक्ष्मी यांच्या नेतृत्वात स्त्री वर्गाची फलटण होती. इ.स. १९४२ च्या म. गांधीजीच्या चलो जावो आंदोलनात अनेक स्त्रियांनी, विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढून आसमंत दणानून सोडले होते. या भारतीय स्वातंत्र लढयात स्त्री वर्गाने क्रांतीकारकांना, सत्याग्रहींना लपवून ठेंवणे, स्त्री वर्गाचा पोशाख देणे, निरोप पोहचवीणे, बातम्या प्रसारीत करणे, चे कार्य केलेले दिसून येते. शेवटी भारतीय स्वातंत्र्य लढयात असंख्य स्त्रियांची आपले जीवन अर्पण केलेले आढळून येते. स्त्रीवर्गाने आपले कर्तुत्व सिध्द करून, आंदोलनात भाग घेवुन भारत मातेच्या स्वातंत्र्यासाठी हातभार लावला हेच सिध्द होते.

सारांश :—

भारतीय स्वातंत्र लढयात इ.स. १९२० हे वर्ष इतिहासाला कलाटणी देणारे वर्ष ठरले. कारण त्यापूर्वीचा काळ हा लो. टिळकांच्या जहाल विचार सारणीचा आणि भारतीय स्वातंत्र्याच्या लढयातील पाया भरणीचा हा काळ होता. इ.स. १९२० नंतर भारतीय स्वातंत्रेचा लढा हा विस्तारू लागला. त्यामूळे २० व्या शतकात स्त्रीवादी चळवळ विस्तारू लागल्याचे चित्र दिसून येते. म. गांधी नी स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेण्याचे आव्हान स्त्रीवर्गाला केल्यामुळे असंख्य स्त्री वर्ग या चळवळीत आपआपली जबाबदारी घेउन कार्य कर्तुत्व करू लागले. अशा प्रकारे स्त्री वर्गाच्या रूपाने स्वातंत्रवादी चळवळीला एक कणखर स्वरूप प्राप्त झाले. त्यामधून स्त्री वर्गाचे चळवळीतील कार्य प्रखरतेने दिसले.

कारण १९ व्या शतकापर्यंत जी स्त्री घरातून बाहेर पडत नव्हती ती स्त्री एकदम स्वातंत्र्यासाठी घराबाहेर पडून कर्तुत्व गाजवू लागली चे चित्र भारताच्या

ISSN: 0974-3065

(32)

इतिहासात पहावयास मिळते. हा काळ स्त्री वर्गाच्या उत्थांनाचा, स्वकर्तुत्वाचा, स्व अविष्काराचा होता. स्त्री वर्गात आता प्रखरतेने स्वातंत्रेची बिजे पेरल्या जाउ लागली. स्त्री वर्गासाठी हया चळवळी स्त्रियांचे एक व्यासपीठ तयार होउ लागले. इ.स. १९२१ ते भारत स्वतंत्र होईपर्यंत भारतात स्वातंत्र्यासाठी ज्या चळवळी झाल्यात त्यामध्ये स्त्री वर्गाचा फार मोठा वाटा, योगदान आहे. हे मान्य करावेच लागेल. त्यातून स्त्री वर्गाचे कार्य, कर्तुत्व भारतीय इतिहासाला दिसून आले. हा संशोधन लेख स्त्री वर्गाचे कर्तुत्व भारताच्या इतिहास पुर्नरलेखीत करण्याचा प्रयत्न होय. कारण भारताच्या इतिहासाने स्त्री वर्गाच्या कर्तुत्वाची, कार्याची पाहिजे तशी दखल घेतलेली दिसत नाही. म्हणून आधूनिक भारताच्या इतिहासात नवा विचार प्रवाह मांडून स्त्रीवादी कर्तुत्व मांडण्याचा हा एक प्रयत्न होय. कारण भारताच्या स्वातंत्र्यासाठी एक स्त्री वर्ग काय काय करू शकते हेच या संशोधनाचे फलीत होय. २० व्या शतकातील राजकीय जनजागृतीच्या काळात स्त्रीवादी चळवळी चा विचार प्रवाह निर्माण झाला. विदर्भातील स्त्रीवादी कर्तुत्वाने, नेतृत्वाने भारतीय स्वातंत्र लढयात घेतलेली भुमिका, भारतीय इतिहासाने आता मान्य करावी आणि आता तरी योग्य दखल घेउन भारताच्या इतिहासाने स्त्री वर्गाला न्याय दयावा हाच संशोनाचा खरा आराखडा होय.

## संदर्भग्रंथ व टिपा


१) बियाणी ब्रिजलाल — माझेजीवन दर्शन —
प्रकाशक, दै. मातृभूमी, अकोला, वर्ष १९६६—६७ खंड पहिला

२) कारंजकर भि.दे. — अमरावती शहराचा इतिहास —
प्रकाशक, श्री. दा. मूळे प्रशाशक अमरावती, नागर पालिका वर्ष १९७८

३) संपादक डॉ. भगत एस.बी. — निवडक शोध निबंध — खंड सहावा (२००७—०८)
प्रकाशक, प्राचार्य रमेश बोभाटे — इतिहास परिषद अध्यक्ष, २००८

४) संपादक चिकटे भूपेश — निवडक शोध निबंध — खंड सातवा (२००८—०९)
प्रकाशक, डॉ. अरूणा राउत — इतिहास परिषद अध्यक्ष, २००९

५) धर्मधीकारी तारा — स्वातंत्र्य लढयातील स्त्री —
प्रकाशक, ऑगस्ट कांती महोत्सव समिती, मुंबई, १९९२

६) संपादक देशमुख पी.एन. — ऐतिहासिक लेख संग्रह, खंड २
प्रकाशक, गु.आ. कळस्कर, १९९६

७) कडवे रघुनाथ — १९४२ चा आष्टी स्वातंत्र संग्राम —
प्रकाशक, संस्कार प्रकाशन, नागपूर, १९८६

८) संपादक मंडळ — संशोधक
प्रकाशक, कार्याध्यक्ष इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धूळे — २०१५

**B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal**
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 321(CCCXXI)
ISSN : 2278-9308
October, 2021

33

# भारतावर ब्रिटिश आक्रमणाचे राजकीय जीवनावर झालेले परिणाम एक ऐतिहासिक चिंतंनशील अध्ययन

**प्रा.डॉ. एन. आर. वर्मा**
इतिहास विभाग प्रमुख
श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महा.,पुसद जि. यवतमाळ (महाराष्ट्र)
मोबाईल क्रं. ९४२०७७३२०३,ईमेल आय.डी. : narayanvarma67@gmail.com

इंग्रजानी भारतावर इ.स. १७५७ पासून इ.स. १९४७ पर्यंत राज्य केले. परंतु खऱ्याअर्थाने इ.स. १८१८ मध्ये पेशवाई च्या समाप्तीनंतर ब्रिटीश राज्यकर्त्यांनी आपल्याहाती सत्ता घेउन साम्राज्यवाद आणि गुलामगिरी भारतीय जनतेवर लादली. गव्हर्नर जनरल वॉरन हेस्ट्रीज, लार्ड कॉर्नवालीस, लार्ड वेलस्ली, लार्ड डलहौसी यांनी पध्दतशीर नियोजन बंध्द रितीने भारतीय राजे, संस्थानीक, जनता ची मुस्काटदाबी करून ''फोडा आणि राज्य करा'' या धोरणाची अंमलबजावणी करून कटूतीनीचा पुरेपूर वापर करून, त्यात्या राज्यातील विरोधकांना जवळ करून, त्यांना जे पाहिजे ते देण्याचे आश्वासने, आमीष देउन भारतीय राजे, संस्थानीक, शासक यांना एकमेका विरूध्द लढण्यास, यूध्दासाठी पोशक वातावरण निर्माण करून दिले. उद्देश हाच की एकमेकाविरूध्द लढतील एक गारद होईल दुसरा लष्करी दृटया कमजोर होईल त्याला मदत करून दोघांनाही संपवीणे हा इंग्रज आक्रमणाचा डाव असायचा. याला भारतीय राजे, शासक, संस्थानीक बळी पडलें. शिंदे, होळकर, पेशवा परस्पर वैरभाव जाणून बूजून कटूनीतीव्दारे निर्माण करण्यात आला. निझाम, टिपू, यांना पध्दतशिर एक ऐकाला वेगवेगळे ठेवून एक एकाला इंग्रज आक्रमकांनी संपवीले आणि सर्वात शेवटी दुसरा बाजीराव पेशवा ला शरण येण्यास भाग पाडून शनिवार वाडयावर युनीयन जॅक डौलात फडकवीला. हेच इंग्रजी आक्रमकांचे खरे धोरण होते. त्याला भारतीय संस्थानीक बळी पडले. संस्थानीकांना संपवीणे हेच राजकीय परिणामचाचा खरा भाग होय.

दुसरा राजकीय परिणाम कायमधारा पध्दत, तैनाती फौज पध्दत होय. याव्दारे शेतीचा ऱ्हास घडवून आनने आणि जमीनदार वर्गाला आपले से करणे हा इंग्रज आक्रमकांचा डाव यशस्वी झाला.कायधारा पध्दतने राजकीय दृटया जमीनदार वर्ग इंग्रजाकडे गेला. तो इंग्रज समर्थक बनला. तर तैनाती फौज व्दारे प्रत्येक राजे, संस्थानीकाना लष्करीदृष्टया कमजोर करून त्याचे राज्य इंग्रजी साम्राज्याला जोडणे हा खरा हेतू होता.त्या आमीषाला राजे, संस्थानीक बळी पडले आणि आपले राज्य इंग्रज आक्रमकांना दिले.

तिसरा राजकीय परिणाम म्हणजे भारतीयांना शिक्षण देतांना मेकॉले सिध्दांत वापरण्यात आला. कारण मेकॉले म्हणतो की, '' रक्त व रंगाने ते भारतीय असतील पण विचार आणि प्रवृत्तीने ते इंग्रज असतील'' असे इंग्रजी शिक्षण भारतीयांना दिले पाहिजे.त्यातून इंग्रजी माल भारतीय बाजार पेठेत खपेल.इंग्रजी माल चा विस्तार होईल. देसी (भारतीय) बाजारपेठा व अर्थव्यवस्थाचे खच्चीकरण होईल.भारत दारिद्र होईल. भारतीय संपत्तीची लूट करणे या उद्देशाने इंग्रजी शिक्षण भारतीयांना देण्यात आले. भारतीयांच्या सवयी, आवड निवड बदलण्याचे कार्य इंग्रज अक्रमकांनी केले.त्यामूळे भारतीय उद्योग धंदे, कुटीर उद्योग, अर्थव्यवस्थाचा ऱ्हास आपोआपच घडून आला.

चौथा परिणाम इ.स. १८५७ चा उठाव होय. हा उठाव की स्वराज्य, स्वातंत्र्याची सुरूवात की बंड अनेक 'इतिहासकानी आपआपले मत व्यक्त केले. परंतू या उठावाने भारतीयाचा जरी पराभव झाला पण राजकीय परिणाम फार मोठे झाले. भारतीय जनतेत स्वपराक्रम, स्वकर्तुत्वाची, स्वदेशप्रेमाची, स्वमातृभूमीची ओढ निर्माण झाली. या उठावात जनता सहभागी नव्हती. पण जनतेच्या मनात या उठावाचे मोठे परिणाम केले. भारतीय जनता इंग्रजा विरूध्द गेलेली दिसून येते.

जरी इंग्रजांना या उठावात विजय मिळाला तरी पण कोठे तरी इंग्रजांना सूध्दा कळले, म्हणूनच इ.स. १८५८ मध्ये राणीच्या जाहीरनाम्यात भारतीय जनते बद्दल फार कळवळा दाखवीण्यात आला. भारतावर कंपनीची नव्हे तर राणीची सत्ता आहे हे दर्शवीण्यात आले. भारतीय जनतेच्या मागणीची समस्या ची राणीला पूर्णकल्पना आहे तसा प्रयोग करण्यता आला. जरी भारतीय जनतेच्या तोंडाला पाने पुसल्या गेली. संस्थानीकांना आश्वासने देण्यात आली. यावरून जनतेच्या मनात ब्रिटिश आक्रमका विरूध्द असंतोष, खदखद आहे हे इंग्रजांनी ओळखले हाच फारमोठा पाचवा परिणाम होय.

म्हणून इंग्रजांनी संवैधानीक विकास चा मार्ग स्विकारला. इ.स. १८५७ च्या उठावा पासून इंग्रज आक्रमाकांना एक धडा बसला, की भारतात आता कोणत्याही कारणास्तव फारमोठा असंतोष निर्माण होउ दयायचा नाही. म्हणून इंग्रज आक्रमकांनी असंतोष समाप्त करण्यासाठी इ.स. १८६१, इ.स. १८९२, इ.स. १९०९, इ.स. १९१९, १९३५ असे सुधारणावादी कायदे केले.

सहावा परिणाम इंग्रजांनी सावधगिरी बाळगत संस्थानीकांना इंग्रजभक्त बनवीले. मुसलमाना इंग्रजभक्त केले. भारतात हिंदू विरूध्द मुसलमान फूट पाडून तोडा, फोड आणि राज्य करा या धोरणाचा अवलंब केला. सर्व सामान्य जनतेत असंतोष निर्माण होणार नाही याची काळजी घेतली. म्हणून सामाजीक, धार्मिक क्षेत्रात हस्तक्षेप इंग्रजांनी केला नाही. भारतात लोककल्याण करण्याचे आश्वासने देण्यात आली. भेदभाव नितीचा अवलंब होणार नाही, गुणवत्ता, पात्रता चा विचार केला जाईल असे आश्वासन राणी च्या जाहीरनाम्यात दिल्या गेलीत. या असंतोषातून स्वदेश प्रेमातून, स्वमातृभूमी प्रेमातून भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस ची स्थापना डिसेंबर १८८५ साली ॲलन हयुम या इंग्रज गृहस्थाने केली.

कारण इंग्रजांचे लष्करी धोरण भेदभावाचे होते. भारतीय सैनिकाने कितीही पराक्रम केला, नाव लौकीक केले तरी इंग्रज आक्रमकांनी त्या भारतीय सैनिकाचा सन्मान, सत्कार, जास्त पगार, उच्च पद दिले नाही. उलट तो सैनिक लोकप्रिय झाला तर त्याला नियोजीत पध्दत प्रमाणे पध्दतशीर खोटया कारणास्तव अधोगती केल्या जात असे.म्हणून सैनिकात सुध्दा स्वभारतीय तत्वाची, राष्ट्रप्रेमाची, मातृभूमीची ओढ निर्माण होउ लागली.या सर्व समीकरणामूळे जनता, सैनिक यांच्यात एकीची भावना निर्माण होत आहे हे दिसल्यामूळे इंग्रज गृहस्थ ॲलन हयूम यांनी इ.स. १८८५ मध्ये लार्ड डफरीन च्या काळात भारतीय राष्टीय कॉंग्रेस ची स्थापना केली. उद्देश हाच की असंतोष वाढला तर तो असंतोष व्यक्त करण्यासाठी कॉंग्रेसचे व्यासपीठ असावे.म्हणजे कॉंग्रेसची स्थापना हा सातवा मोठा परिणाम होय.यामध्ये दादाभाई नौरोजी, व्यमेशचंद्र बॅनर्जी, फिरोजशहा मेहता, गोपाळ कृष्ण गोखले यांनी मवाळ पध्दतीने भारतीय असंतोष, स्वची जाणीव इंग्रज पर्यत पोहचवीण्याचे कार्य केले.

सातवा परिणाम असा की, इंग्लंड मध्ये औद्योगीक क्रांती झाल्यामूळे भारतातून राजकीय धोरनातून कच्चामाल इंग्लंडला जात असे. आणि पक्का माल तयार करून भारतीय बाजारपेठेत जास्त किंमतीत विकल्या जात असे. त्यातून भारतातून संपत्तीचा ओघ इंग्लंडला वाहून लागला. परिणामतहा भारताची आर्थिक पिळवणूक होउन भारत दारिद्री बनला. जेव्हा यीच झळ भारतीय अर्थव्यवस्थेला बसली तेव्हा भारतीय तरूण वर्गात इंग्रजाच्या धोरणा विरूध्द राष्ट्रीयत्वाची भावना प्रचंड प्रमाणात निर्माण होवु लागली.

इंग्रजांनी वरवर दाखवीण्यासाठी भारतीयावर विश्वास आहे हे दर्शवीले परंतू तोफखाना युरोपीयन व्यक्तीकडे ठेवला.भारतीय सैन्य संख्या कमी करण्यता आली. एकंदरीत विश्वासातून अविश्वास इंग्रजाचा सुरू झाला. महत्वाच्या जागा युरोपीयन व्यक्तीला देण्यता येत असे. यातून भारतीया सैनिकामध्ये असंतोष वाढत गेला. म्हणजे भारतीय जनतेत, सैनिक वर्गात, भारतीय पुढारी वर्गात असंतोष निर्माण करण्याचे कार्य ब्रिटिश आक्रमकांनी केलेले दिसून येते.

इ.स. १८८५ मध्ये कॉंग्रेस स्थापने पासून मवाळ गटाचे वर्चस्व असल्याने त्यांनी ब्रिटिश सरकारशी मिळते जुळते घेउन विनंती, अर्ज स्वरूपात भारतीय जनतेच्या मागण्या मागीतल्या. परंतू जहाल गटाला हे मान्य नव्हते.कारण ब्रिटिश आक्रमकांनी सर्व प्रकारचे भारतीय जनतेचा छळ चालवून आर्थिक शोषन सुरू केले.सुशिक्षीत तरूण वर्ग शिकून सुध्दा नोकरीसाठी पात्र ठरत नव्हता. त्यामुळे जहाल गटाला ब्रिटिश आक्रमणकारीच्या न्यायबुध्दीवर, न्यायतत्वावर विश्वास राहिला नाही.

**B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal**
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 321(CCCXXI)
ISSN : 2278-9308
October, 2021

तरूण वर्गात सुध्दा आक्रमक भाषा बोलल्या जाउ लागली हेच ब्रिटिश आक्रमणाचे परिणाम होत. तरून वर्ग सुडाने पेटून उठाला. त्यांना वंशीकभेद भाव मान्य नव्हता. आपल्या मातृभुमीच्या रक्षणासाठी जहाल वर्ग पेटून उठला. कायदयाने काहीच मिळणार नाही ही खात्री भारतीय तरूण वर्गाची झाली. म्हणून त्यांच्यात राष्ट्रवाद वाढत गेला.

त्यामध्ये आगीत तेल ओतण्याचे कार्य लार्ड कर्झन योने केले. इ.स. १९०५ मध्ये त्याने मुसलमानांना खुश करण्यासाठी बंगालची फाळणी केली. तेव्हा कॉग्रेससह अनेक पुढाऱ्यांनी राष्ट्रीय शोक दिवस पाळला. ब्रिटिश आक्रमकांनी भारतीयांना एकत्र येण्यासाठी फार मोठया संधी दिल्यात त्यामुळे भारतीय तरूण जनता एकत्र येवुन त्यांच्यात स्वची जाणीव होवुन राष्ट्रवाद वाढू लागला. संपूर्ण बंगाल मध्ये वंदेमातरम ची जागृती होवु लागली.भारतीयांना अपमानीत करण्यासाठी बंगालची फाळणी करण्यात आली असा आरोप सुरेन्द्रनाथ बॅनर्जी यांनी केला. आता मवाळ सुध्दा जहाल भुमिका घेवु लागले. शेवटी राष्ट्रवाद वाढत असल्याने, जनतेत असंतोष वाढल्याने शेवटी ब्रिटिश सरकारने इ.स. १९११ मध्ये बंगालची फाळणी रद्द केली.यातून ब्रिटिश आक्रमण करीनी भारतातील जनतेला एक होण्याची संधी दिली. त्यातून स्वराज्य, स्वांतत्र्याची ज्योत किंवा मशाल धगधगत राहिली हे दिसून येते.

अशाप्रकारे भारता मध्ये इंग्रजी सत्तेविरूध्द आक्रमक राष्ट्रवाद वाढू लागला. त्यावेळी लो. टिळक यांनी जहाल गटाचे नेतृत्व स्वीकारून चाफेकर बंधू ने रॅडचा जोखून केला त्याचे समर्थन केले. वाईट ला वाईट का म्हणून नये ही लो. टिळक यांची विचार सारणी होती. लो. टिळकांनी आपल्या जहालशैली व्दारे होमरूल आंदोलन संपूर्ण भारतात चालवून प्रचंड जन जागृती केली. परंतू टिळक जास्त काळ जगूशकले नाही. जर जगले असतेपर भारताचा इतिहास बदलला असता. लो. टिळकांनी तरूण वर्गात स्वराज्य, सुराज्य, स्वातंत्रासाठी एकजूट व्हा असा परिणाम घडवून आनला. वाढलेला राष्ट्रवाद ब्रिटिश सरकार च्या वाईट, स्वार्थी, कावेबाज धोरणाचा परिणाम होय असे दिसून येते.

शेवटी क्रांतीकारक सुध्दा इंग्रजा विरूध्द एक झाले. त्यांनी जसास तसे उत्तर देवुन ब्रिटिश आक्रमकांना हैरान करण्याचे कार्य केले. या क्रांतीकारकांनी प्रत्यक्ष कृतीकरून ब्रिटिश सरकारला हादरवीण्याचे कार्य केले. वासूदेव बळवंत फडके यांनी क्रांतीकारक कार्याची सुरूवात केली आणि रामोशी संघटना उभारून ब्रिटिश आक्रमकांना जोरदार टक्कर दिली. शस्त्राचे उत्तर शस्त्राने दयावे ही त्यांची विचार सारणी होती. दरोडे टाकून पैसा जमाकरून सैन्य, शस्त्र जमा करण्याचे कार्य त्यांनी केले. तर स्वातंत्रवीर वी.दा. सावरकरांनी अभिनव भारत या संघटनेव्दारे इंग्रजाच्या धोरणाला शस्त्राने उत्तर दिले. क्रांतीकारकांनी चितगांव कट रचून काकोरी रेल्वेगाडी लूटून जसास तसे उत्तर देण्याचे महान कार्य केले. लाला लजपतरॉय यांनी ब्रिटिश आक्रमकांना योग्य प्रकारे उत्तर दिले. भगतसिंग यांनी ब्रिटिश सत्तेला जोरदार आक्रमकपणे उत्तर देवुन हैरान करण्याचे कार्य केले. भगतसिंह व बटूकेश्वर दत्तयांनी कायदेमंडळाच्या सभागृहात बॉम्ब स्फोट करून ब्रिटिश सरकारला हादरवीण्याचे कार्य केले. चंद्रशेखर आझादने सुध्दा क्रांतीची मशाल धगधगत ठवेली. कारण क्रांती कार्याची धुरा त्यांच्यावर येवुन पडली होती. या सर्वांनी ब्रिटिश अधिकाऱ्याची हत्या करून लूटमार करून ब्रिटिश लष्कर पोलीस यांच्याशी दोन हात केले. म्हणजे ब्रिटिश आक्रमकांनी क्रांती कारकाच्या कार्याला प्रोत्साहन दिल्याचा परिणाम जानवतो. कारण क्रांतीकारकाच्या कार्याने भारतीय तरूण वर्गात देशप्रेम, देशभक्ती, राष्ट्रीयत्व मोठया प्रमाणात निर्माण झाले. क्रांतीकारकाच्या बलिदानामूळे देशासाठी राष्ट्रासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा तरूण वर्गात निर्माण झालेली आपनास पाहण्यास मिळते. त्यामुळे तुरूंगात जाण्याची भिती राहिली नाही. तुरूंग मंदिरा प्रमाणे तरूण वर्गाला वाटत होते. म्हणजेच ब्रिटिश आक्रमणाचे परिणाम तरूण वर्गावर क्रांतीवर्गावर इतके पडले की ते हसत हसत फासीवर जाण्यासाठी सुध्दा घाबरत नसत. यामधून प्रत्येक भारतीयामध्ये इंग्रजांना हाकलून दयावे ही भावना प्रबळ होत गेली हाच खरा भारतीय राष्ट्रवाद निर्माण झाला असे दिसून येते.

म्हणूनच म. गांधीच्या असहकार चळवळीला, सविनय कायदेभंग चळवळीला, वैयक्तीक सत्याग्रहाला, भारत छोडो आंदोलनाला प्रचंड प्रतिसाद मिळत गेला. हाच खरा राष्ट्रवाद होय.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675, Issue NO, 321(CCCXXI)
ISSN : 2278-9308
October, 2021

या राष्ट्रवादाला घाबरून इंग्रजांनी भारतीयांना काहीतरी देवुन असंतोष कमी करण्याचा प्रयत्न केला. इ.स. १९०९ चा कायदा, इ.स. १९१९ चा कायदा, इ.स. १९३५ चा कायदा हे सांगतो की इंग्रज सरकार भारतीय असंतोषाला प्रचंड घाबरले होते. म्हणून त्यांनी सैवंधानीक कायदे केले. राष्ट्रवाद, राष्ट्रभकती, देशप्रेम हेच ब्रिटिश आक्रमकांचे खरे राजकीय जीवनावर परिणाम होय. यामध्ये नागरीकांना आपले हक्क अधिकार जरी गमवावे लागले तरी पण भारतीय स्वातंत्र्याच्या लढयात खांदयाला खांदा लावून सर्व भारतीय ब्रिटिश आक्रमणकारी विरूध्द लढून दि. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश स्वातंत्र करून घेतला. हा सर्वात मोठा राजकीय परिणाम होय.

**निष्कर्ष :**

१. ब्रिटिश आक्रमणाचे राजे संस्थानीकावर परिणाम झाला.
२. भारतीय राजकीय जीवनावर परिणाम होवुन भारतीयांची मुस्काटदाबी, गुलामगिरी प्रचंड प्रमाणात वाढली.
३. भारतात राजकीय परिणमामळे अर्थिक दारिद्रयता भारतावर आली. भारताची अर्थव्यवस्था दळमळीत झाली.
४. तरूण वर्गाला नोकरी मिळत नव्हती. सुशिक्षीत वर्ग बेकार झाला त्यातून ते ब्रिटिश विरोधी बनले.
५. भारतीय संपत्तीचे अपहरण झाले. भारताची संपत्ती इंग्लंडला गेली.
६. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना झाली.
७. मवाळ गाटाचा उदय झाला. त्यामूळे प्रचंड असांतेष इंग्रजा विरूध्द वाढला.
८. जहालगट चा उदय झाला, लो. टिळक यांचे नेतृत्व देशाला लाभले. त्यांनी प्रचंड राष्ट्रवाद, देशजागृती करून इंग्रजा विरूध्द भारतात लढण्याचे वातावरण निर्माण केले.
९. परकीय शक्तींना भारतातून हाकलून देणे आवश्यक आहे. याची जाणीव भारतीय जनता, विशेषतहा तरूण वग्रत निर्माण झाली त्यामून असंतोषाला खतपाणी मिळाले.
१०.संवैधानीक कायदे करण्यासाठी ब्रिटिश आक्रमणकारी पुढे आले नाही तर त्यांनी भारतीयाच्या फायदयासाठी कायदे केले नसते.
११.म. गांधीजीच्या चळवळी, आंदोलनाला भरघोस पाठींबा मिळाला.
१२.क्रांतीकारकाच्या ब्रिटिश आक्रमणकारी विरूध्द कारवाया वाढल्याने राष्ट्रभक्ती, देशप्रेम, राष्ट्रप्रेम लोकांत जागृत झाले. तुरूंगात जाण्यीच भिती नाहीसी झाली. तुरूंग मंदिरे वाटू लागली.
१३.भारत १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र झाला.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१. दिक्षित नी. सी. – ब्रिटिशकालीन भारताचा इतिहास – प्रकाशक – पिंपळापूरे ॲन्ड कं. पाब्लीशर्स, नागपूर, २०१८
२.दिक्षित नी.सी. आधूनीक भारत व महाराष्ट्र प्रकाशक – पिंपळापूरे ॲन्ड कं. पाब्लीशर्स, नागपूर, २०१२
३.डॅ. वैद्य सुमन, डॉ. कोठेकर शांता – आधूनीक भारताचा इतिहास प्रकाशक – साईनाथ प्रकाशन – नागपूर, १९९४
४.नगोरी एस.एल., नागोरी जितेश – भारतीय स्वतंत्रता आंदोलन के क्रान्तीकारी – प्रकाशक – पोईन्टर पब्लीशर्स, जयपूर, १९९७.

**B.Aadhar** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 326(CCCXXVI)
ISSN : 2278-9308
October, 2021

37

# सामाजिक चळवळीत भारतीय स्त्रीवर्गाचे योगदान? एक ऐतीहासिक अध्ययन

प्रा.डॉ. एन. आर. वर्मा
इतिहास विभाग प्रमुख श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महा., पुसद
जि. यवतमाळ (महाराष्ट्र)
मोबाईल क्रं. ९४२०७७३२०३, ईमेल आय.डी. : narayanvarma67@gmail.com

१९ व्या शतकात राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि वैचारीक बदलाचे परिणाम मानवाच्या सर्व क्षेत्रात कमी—जास्त प्रमाणात जाणवू लागले. तर २० व्या शतकात सामाजिक, आर्थीक, सांस्कृतीक धार्मिक क्षेत्रात बरेच बदल, स्थित्यांत्तरे घडून आली. ब्रिटीश राजवटी च्या आगमनाने भारतात इंग्रजी शिक्षणाला सुरूवात झाली. त्या ज्ञानातून बुध्दीजीवी, शिक्षित वर्गाने समाज प्रबोधनला सुरूवात केली. त्यातून प्रबोधनाची, समाज सुधारणेची मूहूर्तमेठ रोवल्या गेली. समाज सुधारकांनी भारतात मोठया प्रमाणात समाजसुधारणा घडवून आणण्यास सुरूवात केली. त्यामुळे १९ व्या आणि २० व्या शतकात भारतात स्त्रीवर्गाला शिक्षण आणि समान संधी मिळाली. त्यामधून स्त्रीवर्गाला शिक्षण मिळाले पाहिजे हा उदारमतवादी विचारधारा चे तत्व ची सुरूवात झाली. कारण त्या काळात शिकणे आणि शिकवीणे पुरूष वर्गाची मक्तेदारी होती. म्हणून समाज सुधारकांनी स्त्री वर्गाच्या वाईट दर्जाला पुरूषवर्ग, समाज जबाबदार आहे असे मत मांडून स्त्री सुधारणाच्या चळवळी ला स्त्री समाज सुधारकांनी आपआपल्या विचारातून हक्क, अधिकार, व्यासपीठावरून, भाषण व लेखनीव्दारे स्त्री वर्गात आशेचा, सुधारणेचा, स्वातंत्रेचा पाया रचला. कारण भारतीय समाजात अनेक दोष होते. स्त्रीवर्गाचे दुःख, गुलामी जीवन दाखवीणारा कोणीच नव्हता. स्त्री जवीन कुंठा अवस्थेत, निराशवादी जीवन जगत असे.

सर्वप्रथम ताराबाई शिंदे यांनी ''स्त्री पुरूष तुलना'' या पुस्तकाव्दारे स्त्री वर्गावर होत असलेले अत्याचार विरूध्द आवज उठवीला. एक व्यक्ती म्हणून स्त्री वर्गाकडे समाजाने पहावे हे मत मांडण्यात आले. या पुस्तकात स्त्री पुरूषांच्या आयुष्यातील अनेक घडामोडी मांडून सखोल चिंतन व निरीक्षण करण्यात आले. ताराबाई शिंदे यांनी अनेक मार्मीक प्रश्न पुरूष वर्गाला विचारून स्त्रियांच्या परावलंत्वेला जबाबदार कोण? समाजाने स्त्री वर्गाची दखल घेवुन आता तरी स्त्रियांना न्याय देण्याची भाषा वापरली. या पुस्तकात स्त्री वर्गाची कड घेवुन रूढी, परंपरा, पुरूषी मानसीकता यावर हल्ला चढवीण्यात आला.

तर पंडिता रमाबाईंनी ''स्त्री धर्मनीती'' या पुस्तकात स्त्रियांच्या दुःखाचे कारण त्यांची परावलंबीत्व हे आहे हे स्पष्ट केले. आतातरी गप्प न राहता, स्वस्थ न बसता काही तरी करावे हा उपदेश केला. स्त्रियांनी पुरूषांच्या बरोबरीत यायचे असेल तर झपाटून कामाला लागा तरच त्यांची प्रगती शक्य आहे हे स्पष्ट केले. ''स्त्रीधर्म निती'' व्दारे पंडिता रमाबाईंनी स्त्री प्रगतीचे तत्वज्ञान मांडले. स्त्रीवर्गा जागृत करून स्त्री ज्ञानी व्हावी हा आशावाद निर्माण केला.

सौ. सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीविषयक प्रश्न व समस्या मांडून अन्यायाशी कसे झगडावे याचे उदाहरण स्वतः प्रगट केले. कारण तत्कालीन समाजात स्त्रीशिक्षण समाजाला मान्य नव्हते. स्वतः सौ. सावित्रीबाई फुले शिक्षित होवुन शिक्षिका झाल्या. मुलींना शिकवीत असतांना समाजाची निंदा, चेंष्ठा सहन करीत असत. म. फुले व सौ. सावित्रीबाई फुले यांनी घरातच 'बाल हत्या प्रतिबंधक गृह सुरू करून समाजासमोर आदर्श निर्माण केला. स्त्री जीवनावर होत असलेला अन्याया विरूध्द सौ. सावित्रीबाई फुले यांनी आवाज उठवून महाराष्ट्रात स्त्रीशिक्षणाचा आदर्शवाद



37

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 326(CCCXXVI)
ISSN : 2278-9308
October, 2021

घडवून आणला. त्यामुळे महाराष्ट्रातील स्त्री समाज शिक्षणासाठी जागृत झाला. स्त्री शिक्षणामुळे होणारे बौध्दीक परिवर्तन स्त्री वर्गाला दिसू लागले यात शंका नाही. त्यामुळे केशवपन, सतीप्रथा यावर टिका होउ लागली. समाज प्रबोधनाकडे वाटचाल करू लागला.

२० व्या शतकात सुरूवातीला न्या. रानडे च्या मृत्युनंतर श्रीमती रमाबाई रानडे यांनी सुधारणेचे पाउल टाकले. पति मृत्यूनंतर श्रीमती रमाबाई रानडे यांनी केशवपन विधी केला नाही. समाज काय म्हणतो याची पर्वा केली नाही. आपल्या आयुष्याची २३ वर्षे श्रीमती रमाबाईंनी समाज सुधारणेसाठी खर्ची घातली. स्त्रियांनी शिकावे यासाठी त्यांनी 'फिमेल हायस्कूल' चालविले. भाषनाच्या माध्यमातून त्या स्त्रीशिक्षणावर भर देउन स्त्री शिक्षणाची जागृती करीत असत. त्यांनी 'सेवासदन' ची निर्मीती करून स्त्रियांना शिक्षण दिले. स्त्रियांना मतदानाचा हक्क व अधिकार मिळावा म्हणुनही प्रयत्न केले. कारण त्याकाळी स्त्रियांचे जीवन पती व कुटूंबापुरते मर्यादीत होते. स्त्रीवर्ग जागृतीसाठी श्रीमती रमाबाईंनी फार हातभार लावलेला दिसून येतो. त्यामुळेच इ.स. १९०७ सुरत कॉंग्रेस अधिवेशनानंतर स्त्रियांच्या परिषदेचे अध्यक्षपद त्यांनी भुषवीले होते.

स्त्री शिक्षणासाठी पं. रमाबाई यांनी 'आर्य महिला समाज' ची स्थापना केली. समाजातील रूढी, परंपरा व कुप्रथा लोकांच्या नरजेस आणून देण्योच कार्य केले. इ.स. १८८२ मध्ये 'हंटर आयोगा' समोर स्त्री शिक्षणासंदर्भात मुद्दे उपस्थित करून स्त्री शिक्षणाच्या शिफारसी इंग्रज सरकारने लागू करण्यासाठी हातभार लावला. विधवा स्त्रियांना त्याकाळी शिक्षण मिळत नव्हते. म्हणुन पंडिता रमाबाई यांनी मुंबईला ११ मार्च१९८९ रोजी ''शारदा सदन'' स्थापन करून विधवांना शिक्षणाची व राहण्याची सोय करून दिली. त्यामूळेच समाजाने नाकारलेल्या विधवा स्त्रियांना त्याकाळी शिक्षण घेण्याची संधी मिळाली. नाहीतर विधवांचा त्याकाळी कोणीच वाली नव्हता. पं. रमाबाईच्या रूपाने विधवा स्त्रियांना त्यांच्या हक्कांचे स्थान मिळाले इ.स. १८९१ मध्ये 'संमतीवय' ची चळवळ पुण्यात मोठया प्रमाणात वाढली. पं. रमाबाईंनी संमतीवयाच्या कायदयाला पूर्ण पाठींबा दिला आणि आपले मत मांडून समाजाला जागृत केले. इ.स. १८८९ च्या सामाजिक परिषदेत 'केशवपन' सबंधीमते मांडून चर्चा घडवून आणली. विधवा स्त्रियांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण करण्यासाठी पं. रबाईंनी फार मोठे मोलाचे कार्य केले यामध्ये शकांच नाही. शारदा सदन विधवांच्या आशेचे प्रवेशव्दारे होते. नाहीतर विधवांना जीवन जगणे असहयकरून सोडले होते. त्याकाळी विधवा स्त्री 'एक बेवारस वस्तू' प्रमाणे जगत होती. विधवा स्त्रियांच्या जीवनात आशेचाि करण निर्माण करून जीवनाचे मोल घडवीण्यासाठी, पं. रमाबाईंनी आपले योगदान दिले. त्यामुळेच विधवा स्त्रिया जगल्या शिक्षण घेवुन स्वालंबी बनल्या.

श्रीमती यशोदाबाई आगरकरांनी समाजात प्रचंड अंधश्रध्दा असतांना, केशवपनाची चाल असतांनाही पती गोपाळ गणेश आगरकरांच्या मृत्यूनंतर 'केशवपन' करण्यास स्पष्ट नकार दिला. कारण त्यांचे मत गोपाळ गणेश आगरकरांनी हयात असतांनाच खंबीर करून ठेवले होते. गोपाळ गणेश आगरकर रूढी, परंपरेविरूध्द झगडतो आहे हे त्यांनी प्रत्यक्ष पाहिले होते. आपल्या पतिच्या कार्यात सहभागी व्हावे त्यांनाही वाटले म्हणून पति मृत्यूनंतर श्रीमती यशोदाबाई आगरकरांनी जात धर्म याकडे लक्ष न देता अडलेल्या बाळंतण बाईची बाळंतपणे सुखरूपपणे केली. पतिने दाखवीलेल्या सुधारणेच्या पावलावर पाउल टाकले.

सौ. आनंदीबाई कर्वे यांनीसुध्दा आपले पति महर्षी धोंडोकेशव कर्वे यांच्या कार्याला वाहून घेतले. महर्षी कर्वे यांनी स्त्री शिक्षण, पुनर्विवाह, विधवा शिक्षण यासाठी चळवळ उभारून स्त्रीवर्गाला आपल्या पायावर उभे केले असता सौ. आनंदीबाई कर्वे त्यांच्या कार्याला सहकार्य करीत असे. स्वतः सौ. आनंदीबाई सुईण होत्या त्यांनी अनेक स्त्रियांचे बाळंतपणे केलीत. सौ.

आनंदीबाई कर्वे ''माझे पुराण'' या पुस्तकात आपल्या भावना व्यक्त करतात की, माझे दुसरे लग्न झाले असता स्त्रिया मला कुंकू लावत नसत, माझी ओटी भरत नसत. पण सुईण ची विद्या प्राप्त केल्यानंतर लोकांची बाळंतपणाची कार्य केली असता आता लोक मला कुंकू लावत, समारंभाला बोलावीतात हे स्पष्ट केले. कारण सौ. आनंदीबाईंनी पुर्नविवाह केला होता. समाजाला तो पुर्नविाह मान्य नव्हता. समाजाने महर्षी कर्वे व सौ. आनंदीबाई कर्वे यांना समाजातून 'बहिष्कृत' केले होते. तरी ही सौ. आनंदीबाई कर्वे समाज सुधारणा करीत राहिल्या, आपले पति महर्षी कर्वे यांना कामात मदत करीत असत. सौ. आनंदीबाईंनी आपल्या घराला 'धर्मशाळा' चे स्वरूप दिले होते. स्त्री शिक्षणावर आपला पति प्रचंड खर्च करतो. घरखर्चासाठी पैसे ठेवीत नाही. ही खंत त्यांनी व्यक्त केली.

स्वातंत्र्योत्तर काळात समाजातील सर्वच थरात जागृतीचे, स्वातंत्र्याचे वार वाहत होते. स्वातंत्र्य मिळाले तरी दारिद्रय, बेकारी, अशिक्षितपणा या गोष्टी सावरण्यासाठी समाजकार्यकर्त्यांपुढे भरपूर काम होते. इ.स. १९५० च्या राज्यघटने मुळे स्त्री–पुरूष समानता मान्य झाल्यावर त्या समानतेच्या भुमिकेवर शिक्षणाचाही विचार होउ लागला. १९५६ मध्ये शक्तीदल नावाची संस्था पुर्णिमा बेन पक्कासा यांनी स्थापन केली. ग्रामीण व शहरी सित्रयांना इतर सामान्य ज्ञानाबरोबर लष्करी शिक्षण देण्याची योजना त्यात होती. घोडयावर बसणे, बंदूक मारणे, परेड इ. बाबतीत स्त्रियांना तरबेज करणे आणि स्वतंत्र भारताच्या उत्तम नागरिक बनून आत्मरक्षण करण्याचे सामर्थ्य प्राप्त व्हावे हाच त्यामागे उद्देश होता.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राज्यघटनेने व भारतीय संसदेने वेळोवेळी कायदे करून स्त्रियांना अनेक बाबतीत संरक्षण दिलेले आहे. परंतु ते संरक्षण कागदोपत्री होते. प्रत्यक्ष व्यवहारात स्त्रीने स्वत: आत्मसंरक्षणासाठी स्वत:ला कणखर बनविणे झाले. इ.स. १९६१ मध्ये संसदेने हुंडा प्रतिबंधक कायदा मंजूर केला. पण प्रत्यक्षात त्याचे आचरण व्यावहारिक जगात होत नव्हते. कारण प्रत्येक पुरूष, मग तो मजुरी करणारा मजुर असो की मंत्री, आपल्या घरात पती असतो त्याचा अहंकार त्या घरात जोपासना वृत्तीबद्दल त्याच्याशी कुइचाही संवाद करावयाचा नाही आणि केलाच तर त्या घरातल्या पतीचे स्थान दुखावले जाते, अहंकार दुखावला जातो. मग घरातल्या त्या स्त्रीची अवस्था पत्यातील राणीच्या किंमतीची होते. पुरूषाच्या अहंकारामुळे स्त्रीला बऱ्याचवेळा मारपीट ही होत असते. मग ती शिक्षित असो वा नसो. हा अनुभव समाजातील प्रत्येक स्तरात स्त्रीला येत गेला. स्त्री सामाजिक संदर्भातून बदलत गेली. पण पुरूष मात्र बदलला नाही. त्यामुळे स्त्रियांच्या काही समस्या कायद्याने मुक्त झाल्या तरी नव्या समस्या निर्माण होउ लागल्या. लिंगभेदावर आधारित शोषणही कमी झाले नाही.

स्वातंत्र्योत्तर काळातील वाढती बेकारी, दारिद्रय यामुळे कुटूंबाचा आर्थिक भार एकटया पुरूषाला उचलणे शक्य होईना त्यामुळे शिक्षित स्त्रियाही नोकरी–व्यवसाय करण्यासाठी घराबाहेर पडल्या चूल–मूल आणि नोकरी–व्यवसाय या दुहेरी कामात व्यस्त झाल्या. डॉक्टर–वकील–प्राध्यापक–ऑफिसर इ. वरिष्ठ पदेही त्यांना प्राप्त झाली परंतु पुरूष मात्र मुलांच्या संगोपनात तिला मदतीचा हात देत नव्हाता. तरीपण नोकऱ्यामध्ये स्त्रियांचे प्रमाण वाढत गेले रूढींचा परिणाम कमी होउ लागला. स्त्रीविकास होण्यास अनुकूल वातावरण निर्माण झाले अशी भावना तयार झाली. परंतु १९७२ साली समानतेच्या दिशेने हा अहवाल तयार झाला. तेव्हा या भावनेला हादरा बसला, कारण जीवनाच्या सर्व क्षेत्रात शिक्षण, रोजगार, आरोग्य, राजकारण यात स्त्रियांची प्रगती खुंटली आहे. वा त्यांची पिछेहाट होत आहे असा निष्कर्ष त्यात काढलेला होता. त्यामुळे समाजात सर्वत्र खळबळ माजली.

पंचवार्षिक योजनांअतर्गत विकास प्रक्रियेतून स्त्रियांचे प्रश्न बाजूला पडून, स्त्रियांना अधिकच दारिद्रय अन् दुय्यमता मिळत गेली. यंत्रसामुग्रीमुळे शेती क्षेत्रातील रोजगाराची घट स्त्रियांच्या वाटयाला आल्याचे लक्षात आले. वाढत्या लोकसंख्येचे खापर स्त्रियांच्याच माथी फोडून कुटूंब नियोजन—नसबंदीचे लक्ष्य गाटण्यासाठी स्त्रियांवरच दडपशाही लादल्याचे लक्षात आले. तशातच १९६० नंतर जगभर उभ्या राहिलेल्या स्त्रीमुक्ती आंदोलनाचे पडसाद आपल्या देशातही उमटत गेले. या पार्श्वभुमिवर विविध स्तरावर संघर्ष देण्याची निवड आपल्या देशातही स्त्रियांना भासू लागली आणि त्यातुनच स्त्रियांच्या चळवळी उदयाला आल्या. भारतीय महिला फेडरेशन, समाजवादी महला सभा अशा स्त्रियांच्या संघटना स्त्री अन्यायाविरूध्द चळवळ उभ करू लागल्या. स्त्री सुधारणेसाठी कायदे झाले तरी स्त्री जीवनात म्हणावे तसे लौकीकार्थाने परिवर्तन झाले नाही. शासकिय योजनांमधून स्त्रियांना कामे मिळावीत, शासकीय नोकऱ्यांमध्ये राखीव जागा मिळाव्यात या मागण्या अखिल भारतीय महिला फेडरेशन ने केल्या. अविवाहित मुलींना नोकरी देणे आणि विवाहानंतर त्यांना काढून टाकणे या धोरणाविरूध्द फार्मस्सुटिकल एम्प्यलॉईज फेडरेशने मोहीम उभारली. समान वेतन कायदा १९७५ ला होउनही त्याची अंमलबजावणी होत नसल्याने नारीमुक्ती संघटनेने लढा सुरू केला.

१९७५ च्या आंतराष्ट्रीय महिला वर्षात पदार्पण केलेल्या स्त्रियांच्या हाती १९७४ वा भारतातील स्त्रियांची स्थिती हा अहवाल आलेला होता. त्यात असे म्हटले होते की, पुरूषवर्गाच्या तुलनेत स्त्रिवर्गाची घटत जाणारी संख्या व कमी होत जाणारी आयुमर्यादा, प्रसुती काळातील स्त्रियांचे वाढते मृत्यू स्त्रियांच्या कामातला कमी होणारा सहभाग, स्त्रियांमधील निरक्षरता यांच्या आकडेवारीतून आजवरच्या विकासाचा भारतीय स्त्रीवर झालेले परिणाम हे विपरीत कसे आहेत ते निरीक्षणात मांडले होते त्यातूनच संयुक्त राष्ट्रसभेने १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणन घोषीत परिषदेच्या निमित्ताने स्त्रीमुक्ती संघटना जन्माला आली. स्त्री मुक्तीची ललकारी हे गाण्याचे पुस्तक प्रसिध्द करण्यात आले ज्योती म्हापसेकर लिखित मुलगी झाली हो या पथनाटयाचे प्रयोग सादर होउ लागले. १९७५ हे वर्ष आणि त्यानंतरचे दशक आंतरराष्ट्रीय महिला दशक म्हणून घोषित करण्यात आले होते. त्यानंतर महिला दक्षता समिती स्त्री आत्याच्यार महिला मंच स्त्री, स्त्री आधार केंद्र, मोलकरीन संघटना, स्त्री मुक्ती संघटना अशा अनेक स्त्रिविषयक चळवळी निर्माण झाल्यात. त्यानंतर भारत सरकार मध्ये मनुष्य बळ विकास मंत्रालयात महिला व बालविकास हे खाते नव्याने सुरू झाले. त्या खात्यामार्फत स्त्रीयांसाठी विविध योजना आणि विकास महामंडळे स्थापन होउन कार्यान्वीत झाल्यात. त्यामुळे स्त्रि समाजात जागृतीला प्रारंभ झाला आणि आज २१ व्या शतकात स्त्री स्वातंत्र्यांची, समानतेची वाटचाल भारतात सर्व क्षेत्रात चालु आहे. हेच स्त्रीवर्गाचे योगदान होय.

**निष्कर्ष :**

एकंदरीत १९ व्या शतकात स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोन बऱ्याच प्रमाणात परंपरागत होता. भारतीय स्त्री वर्गावर चारित्र्याचे शिंतोडे उडविण्यात येत असे. स्त्रीने स्वावलंबी होउ नये असे माननारा सुध्दा वर्ग होता, आपल्या पुरूष प्रधान संस्कृतीने स्त्रीवर्गाची अहवेलना केली. त्यामुळे स्त्री सुधारकांनी कायदेशिर मार्गाने मदत मिळविण्यास सुरूवात केली. इ.स. १९५० ते १९७५ या काळात स्त्रियांना व्यक्ती स्वातंत्र्याची चाहुल लागली त्यातुन स्त्री चळवळीशी संबंधी अनेक स्त्रियांनी स्त्रीवादी विचार मांडण्यासाठी आपले –व्यासपीठ निर्माण केले. त्यातुन स्त्रीवादी चळवळीची व्याख्या निर्माण केली. या स्त्रिवादी संघटना राजकीय विचार धोराविरूध्द नसुन पुरूष प्रधान व्यवस्थे विरूध्द आहे हे स्पष्ट झालेले दिसुन येते. स्त्री सक्षमीकरण हा शब्द त्यामध्येनिर्माण करण्यात आला. त्यातुन स्त्रियांना अनेक क्षेत्रात आरक्षण मिळावे अशी मागणी या स्त्रीवादी

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675, Issue NO, 326(CCCXXVI)
ISSN : 2278-9308
October, 2021

41

चळवळीने चालु ठेवली. त्यामधुन इ.स. १९९३ मध्ये पंचायत राज व्यवस्था निर्माण झाली. या पंचात राज कायद्यानुसार स्त्रियांनासुध्दा आरक्षण मिळाले हे आरक्षण स्थानिक स्वराज संस्थामध्ये मिळाले आहे. एकंदरीत पुरूष प्रधान संस्कृतीने स्त्रीवर्गाला सत्येच्या परिघा बाहेर ठेवण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. पण तो प्रयत्न स्त्री समाज सुधारकांनी संघर्ष करून आपले हक्क अधिकार मिळविण्याचा अटोकाट प्रयत्न केला. हीच खरी सामाजिक चळवळीची कार्याची पावती होय.

**संदर्भ ग्रंथ व टिपा :**

१.रानडे प्रतिभा — स्त्री प्रश्नाची चर्चा — प्रकाशक — पदमगंधा प्रकारान, पुणे २००५
२.रानडे रमाबाई — आमच्या आयूष्यातील काही आठवणी — प्रकाशक — समन्वयक प्रकाशण कोल्हापूर, २०१२
३.वैद्य सरोजीनी — श्रीमती काशिबाई — कानिटकर आत्मचरित्र आणि चरित्रे — पापूलर प्रकाशन, १९८०, मुंबई
४.डॉ. कर्वे स्वाती — स्त्री विकासाचे नवे क्षितीज — प्रकशक — प्रतिमा प्रकाशन पुर्णे — २००८
५.डॉ. वैद्य सुमन, डॉ. कोठेकर शांता — स्वातंत्र भारताचा इतिहास (१९४७ ते १९८६) प्रकाशक — साईनाथ प्रकाशन नागपुर — २००४
६.डॉ. पाटील भिना — खांदेशातील समाज प्रबोधनाची चळवळ (१९०० ते १९५०) प्रकाशक — भुषण पाटील पाचोरा (जळगांव) २००५
७.महाराष्ट्र शासन अभ्यास मंडळ — महाराष्ट्राचा इतिहास — प्रकाशक — महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे — २०१२
८.डॉ. पगार एकनाथ — प्रबोधन परंपरा व वृत्तपत्र सृष्टी — प्रकाशक — यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, २००६
९.संपादक मंडळ — स्वातंत्र्य उत्तर वाडमयीन प्रवाह — प्रकाशक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, २००६
१०. संपादक — शिक्षण संक्रमण (मासिक मार्च २०१२)
११. संपादक — मिळुन साऱ्याजनी (मासीक मार्च २०१२)
१२. डहाके वसंत आबाजी — मराठी साहित्य इतिहास व संस्कृती प्रकाशक — पापूलर प्रकाशन, मुंबई २००५

# "स्वामी विवेकानंद आणि त्यांची राष्ट्रवादी संकल्पना"

संशोधक
प्रा. डॉ. एन. आर. वर्मा
इतिहास विभाग प्रमुख, श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महा., पुसद जि. यवतमाळ (महाराष्ट्र)

आधुनिक भारताच्या इतिहासात अनेकविचार प्रवाह आढळून येतात. या विचार प्रवाहात अनेक विचारवंतांनी आपले सिंध्दांत तत्वे मांडून जनजागृती घडविण्याचे कार्य केले. १९ व्या शतकात ब्रिटिश राजवटीत मॅकॉले शिक्षण पध्दतीने भारतात शिक्षणाची क्रांती झाली. इंग्रजी शिक्षण, इंग्रजी साहित्याने भारतातील बुध्दीजीवी तरूण वर्गावर मोठी छाप पडली. त्यामधून स्वातंत्रवाद, समाजवाद, विश्वबंधूत्व वाद, बुध्दी प्रमाण्यवाद, समाजवाद, सुधारणावाद, सांस्कृतिकवाद अशा संकल्पना उदयास आल्या. या बुध्दीजीवी तरूण वर्गात काही मवाळ विचाराचे, काही जहाल विचाराचे विचारवंत होते.

त्यामध्ये स्वामी विवेकानंद उर्फ नरेंन्द्रनाथ दत्त हे प्रखर देशभक्त, राष्ट्रवादी विचाराचे, मानसेवा हीच ईश्वरसेवा मानणारे होते. त्यांना सत्य म्हणजे काय हेच शोधायचे होते. त्यासाठी त्यांनी सर्व प्रथांच्या, धर्माच्या प्रमुखाकडे विचारणा सुध्दा केली. पण खरे उत्तर त्यांना मिळत नव्हते. शेवटी त्यांनी आपल्या लेखनीव्दारे, भाषणाव्दारे जगाला सत्य सांगण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी आध्यात्मिक गुढवाद न पाहता भारतातील राजकीय, सामाजिक, आर्थिक तत्व, विचारांची चिरफाड करून त्यावर उपाय सुचविण्याचे कार्य केले. यासाठी त्यांनी हिंदू धर्माचे विचार, दृष्ट्रीकोन, भारता बाहेर प्रचार, प्रसार करून इतरांना पटवून देण्याचे महान कार्य केले. त्यांनी इतरांना पटवून देण्याचे जे विचार मांडले ते राष्ट्रवादी विचार होत. या राष्ट्रवादी विचाराचा भारताच्या स्वातंत्र लढयाच्या आंदोलनावर फार मोठा परिणाम झाला. त्यांनी ब्रिटिश राजवटीला सरळ आव्हान न देता आपल्या देशभक्ती, राष्ट्रभक्ती विचाराने आपले तत्वे मांडून खरा राष्ट्रवाद मांडला.

वास्तविक पाहता राष्ट्रवाद आणि सार्वभौमत्व या संकल्पना एकमेकाशी मिळतीजुळती आहेत. राष्ट्रवाद संकल्पना राष्ट्रामधील नागरिकांची राष्ट्राविषयी असलेले आपुलकीची भावना होय. राष्ट्रवाद म्हणजे स्वराष्ट्रप्रेम, एकतेची जाणीव आणि एकतेला बाधा निर्माण करणारे

43

घटका विरूध्द आहे. 19 व्या शतकात इंग्रज राजवटीविरूध्द लोकांमध्ये रोश होता. त्यामुळे लोकांत असंतोषाची भावना होती.

स्वामी विवेकानंद यांचा राष्ट्रवाद धर्मिक कधीच नव्हता.. स्वामी विवेकानंद यांनी राष्ट्रवादाचा वेध घेतांना भारतीय संस्कृती, संस्कृतीची जीवनपध्दत, तिचे नैतिक अधिष्ठान चा वापर केला. त्यांनी आदर्शवाद मांडून सर्वसामान्य, तळागाळातील, जनकल्याणसाठी कार्य केले. सध्या भारतात सर्वत्र धर्माधपणा निर्म ण झालेला दिसून येतो. लोक जाती पाती, भाषा, संप्रदाय ची कटवट्‌णा निर्माण झाली आहे. स्वामी विवेकानंद यांनी मांडले की, दीनदुबळे, गरीब, दारिद्री लोक पोटाची भूक भागविण्यासाठी धर्मात्तरास तयार होतात. यासाठी भारतीय समाजातील दोष दूर केले पाहिजे. म्हणूनच त्यांनी इ.स. 1893 मध्ये शिकागो सर्व धर्म परिषदेत भारतीय संस्कृती, हिंदू धर्म, यांच विचार मांडून हिंदू धर्माचे महत्व जगासमोर मांडले. त्यांच्यामते हिंदू धर्म सर्वधर्माची जननी आहे. या धर्माने वैंश्विक ऐक्याची शिकवण दिली. हिंदू धर्म हा एकच धर्म असा आहे की, अनादिकालापासून चालत आला असून आजही जनतेच्या आचरणात आहे. अशा रितीने हिंदू धर्माचे तत्वज्ञान आपल्या सिंध्दांताने मांडून राष्ट्रवाद ची संकल्पना मांडली. त्यांनी हिंदू लोक मानवतातून मानवाच्या ईश्वराकडे जात असतात हा विचार मांडला. त्यांनी सारे विश्व एक आहे हा विचार मांडून सत्य विविध स्वरूपात प्रतिबींबीत होते हे स्पष्ट केले. त्यांनी प्राचीन इतिहासाचा दाखला दिला की, भारतात प्राचीनकाळ, वैदिक संस्कृती काळ पासूनच राष्ट्रवाद ची संकल्पना आहे.

स्वामी विवेकानंद यांनी ब्रिटिष राजवट विरूध्द कोणतेही आव्हानात्मक विचार सरळ न मांडता आपल्या कार्यसिध्दी विचारातून राष्ट्रवाद ची संकल्पना मांडली. भुतकाळातील घटना, घडामोडी राष्ट्रवादचा पाया रचतात. कोणत्याही राष्ट्राची महानता त्यांच्या भुतकाळातील महानतेवर असते. म्हणून त्यांनी स्पष्ट केले की, भारताला सर्व क्षेत्रात शक्तीशाली, बलशाही, बनायचे असेल तर सर्वधर्मात एकता हवी. धर्मात एकता असेल तर लोक एकत्र राहतात. त्याशिवाय त्याग आणि सेवा हा भाव आवश्यक आहे. स्वामी विवेकानंद म्हणतात की, आम्हाला भारताचे हरवलेले व्यक्तीत्व परत आनायचे असेल तर जनतेचा उध्दार, विकास करणे आवश्यक आहे. त्यासाठी संकुचीत वृत्ती, स्वार्थ, संप्रदायीपणा, उग्रवाद, याला समाप्त करणे आवश्यक आहे. त्यांच्यामते मानवजातीत राष्ट्र, राष्ट्रवादचे दर्शन घडत असते.

स्वामी विवेकानंद आदर्शवादी राष्ट्रवादी, देशभक्त असून हिंदू धर्म अभिमानी होते. त्यांनी आपल्या शिकवणूकीत लोकांना आवाहन केले की, स्वतःहाला सर्व प्रथम भारतीय आहोत हे समजले पाहिजे. त्यासाठी



वैयक्तिक स्वार्थ, संकुचीतपणा दूर करून जातीपातीचे बंधन भेद समाप्त केले पाहिजे. आपण सर्व एक आहोत ही भावना बाळगली पाहिजे, संप्रदायभाव समाप्त केला पाहिजे. पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण ची दृष्टी गाडली पाहिजे. कारण प्राचीन काळापासून वैदिक संस्कृती, वेद मध्ये जातीव्यवस्था नव्हती. परंतू वर्ण व्यवस्था होती. वर्ण व्यवस्था व्यवसाय प्रवृत्ती आहे. म्हणून लोकांना शिक्षित केले पाहिजे, शिक्षण दिले पाहिजे. तरच भारतात राष्ट्रीय ऐक्य, राष्ट्रवादीविचार वाढतील.

एकंदरीत स्वामी विवेकानंद यांची राष्ट्रवादी संकल्पना आंतरराष्ट्रावादी, विश्वबंधूत्व वादी होती. कारण त्याच्यामते भारताचा इतिहास पाश्चात्य इतिहासकरांनी लिहला. म्हणून त्यांनी त्यांचा दृष्ट्रीकोन मांडून भारताला कमी लेखले, भारताच्या गौरवशाली परंपराची अवहेलना कली. म्हणूनच प्राचीन भारत मध्ये राष्ट्रवाद ही भावना दिसत नाही.

स्वामी विवेकानंद यांनी भारताच्या शक्तीशाली, बलशाली धोरणावर भर दिला. त्यासाठी लोकांनी त्याग करून राष्ट्राची सेवा करावी हे स्पष्ट केले. कारण 19 व्या शतकात ब्रिटिश राजवटीत भारताची निंदा बऱ्याच प्रमाणात करण्यात आली, लेखनाव्दारे, साहित्याव्दारे ती निंदा मोठया प्रमाणात वाढविण्यात आली. यावर भारतीय विव्दानांनी त्यांच्या विचार सरणीनुसार कोणतीच कृती केली नाही. कारण ब्रिटिश राजवटीतील काही भारतीय विव्दवान पाश्चात्याचे अनुकरण करण्यात मग्न होते.

शेवटी राष्ट्रवाद या संकल्पनेतून स्वामी विवेकानंद यांनी भारतीय जनतेला जागृत करून, एकतेचा संदेश देउन, राष्ट्रात नवचैतन्य निर्माण करण्याचे आवाहन केलेले दिसून येते. त्यांची राष्ट्रवाद ही संकल्पना धर्मवादी, जातीयवादी, संप्रदाय वादी नसून विश्वधर्म निर्माण करणारी आहे हे वरील तत्वसिध्दांता वरून दिसून येते. कारण त्यांना साधा, सोपा, लोकांना रूचणारा, संवेदनाशील, माणसाच्या गरजा भागवणारा धर्म निर्माण करायचा होता. त्यांना वेदांच्या वैश्विक, मानवतावादी बाजूवर भर देउन हिंदू विचारसारणीत नवा उत्साह निर्माण करायचा होता. कारण भारताला पुन्हा जगासमोर ताठ मानेने उभे करणसाठी सामान्य माणसे राष्ट्राचा कणा आहेत ते कष्ट करतात, घाम गाळतातात तेंव्हा आपल्याला अन्न मिळते. त्या बद्दल सहानूभूती बाळगा, त्यांच्या दुःखात सहभागी व्हा या विचारसरणी प्रतिक होते हाच त्यांचा खरा राष्ट्रवाद होता.

(५५)

सारांश –

स्वामी विवेकानंद उर्फ नरेन्द्रनाथ दत्त यांनी भारतीय संस्कृती, परंपरा, धर्म भारता बाहेर पोहचविण्याचे कार्य केले. भारतीय समाजात अनेक दोष आहेत हे स्पष्ट करून त्याचा विचार व्हावा, मानवसेवा हीच ईश्वर सेवा हे ते म्हणत असत. त्यांच्या विचाराने आणि शिकवणूकीने भारतीय स्वातंत्र लढयावर फार परिणाम झाला. त्यांनी राष्ट्रवाद संकल्पना मांडतांना हिंदू धर्माचे तत्वज्ञान जगासमोर मांडले. सारे विश्व एक आहे ही त्यांची भावना होती.

भारतात प्राचीन काळापासून राष्ट्रवाद आहे. राष्ट्रवादी भावना भारतीयांपासून कधीच दूर गेली नाही. कोणत्याही राष्ट्राची निर्मिती त्यांच्या भुतकालीन पायावरच हात असते हे त्यांनी स्पष्ट केले. भारताला बलशाली होण्यासाठी धर्मात एकता, समाजात एकात्मता असणे आवश्यक आहे. आम्हाला भारताचे हरवलेले व्यक्तिमत्व परत मिळवायचे आहे हा त्यांचा संकल्प होता. त्यांचा राष्ट्रवाद संप्रदायीक, उग्रवादी नसून मानव जातीचे कल्याण करणारा होता. ते एक प्रखर देशभक्त, राष्ट्रभक्त होते. त्यांनी जातीव्यवस्था, वर्ण व्यवस्था समजावून सांगीतली. भारताचा इतिहास पाश्चात्य इतिहास कारांनी लिहिल्यामुळे भारताची गौरवशाली परंपरा ला त्यांनी कमी लखले हे त्यांनी स्पष्ट केले. एकदरीत त्यांची राष्ट्रवादी संकल्पना आंतराष्ट्रवादी, विश्वबंधूत्व निर्माण करणारी होती हेच प्रखरतेने दिसून येते.

## संदर्भ ग्रंथ सूची :


१- डॉ. साबळे आर.डी. – भारतीय राजकीय विचार, 2003, प्रकाशक – हिमालया पब्लिशींग हाउस, गिरगांव, मुंबई

२- अनुवाद मोर्डेकर माधव – आधुनिक भारताचे प्रेषीत स्वामी विवेकानंद, २००७, प्रकाशक – मेहता पब्लिशींग हाउस, सदाशिवपेठ, पूणे

३- गाडगीड अमरेन्द्र ल. – वंन्दे मातरम, १९९३, प्रकाशक – गोकूळ मासिक प्रकाशनासाठी, सदाशिवपेठ, पूणे

४- डोळे ना.य. – भारतीय राजकीय विचारवंत, १९९९, प्रकाशक – विद्या बुक्स, औरंगाबाद


***

# भारतीय स्वातंत्र चळवळीत क्रांतीकारक व्यक्ती आणि त्यांचे विचार यांचे ऐतिहासिक अध्ययन''

**प्रा.डॉ. एन. आर. वर्मा**
श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महा., पुसद जि. यवतमाळ
मोबाईल क्रं. ९४२०७७३२०३
ईमेल आय.डी. : narayanvarma67@gmail.com

ब्रिटीश राजवटीने भारतावर इ.स. १७५७ पासून इ.स. १९४७ पर्यंत राज्य केले. परंतु खऱ्याअर्थाने इ.स. १८१८ मध्ये पेशवाई च्या समाप्तीनंतर ब्रिटीश राज्यकर्त्यांनी आपल्याहाती सत्ता घेउन साम्राज्यवाद आणि गुलामगिरी भारतीय जनतेवर लादली. गव्हर्नर जनरल वॉरन हेस्ट्रीज, लार्ड कॉर्नवालीस, लार्ड वेलस्ली, लार्ड डलहौसी यांनी पध्दतशीर नियोजन बंध्द रितीने भारतीय राजे, संस्थानीक, जनता ची मुस्काटदाबी करून ''फोडा आणि राज्य करा'' या धोरणाची अंमलबजावणी करून कटूतीनीचा पुरेपूर वापर करून, त्यात्या राज्यातील विरोधकांना जवळ करून, त्यांना जे पाहिजे ते देण्याचे आश्वासने, आमीष देउन भारतीय राजे, संस्थानीक, शासक यांना एकमेका विरूध्द लढण्यास, यूध्दासाठी पोशक वातावरण निर्माण करून दिले. उद्देश हाच की एकमेकाविरूध्द लढतील एक गारद होईल दुसरा लष्करी दृटया कमजोर होईल त्याला मदत करून दोघांनाही संपवीणे हा इंग्रज आक्रमणाचा डाव असायचा. याला भारतीय राजे, शासक, संस्थानीक बळी पडलें. शिंदे, होळकर, पेशवा परस्पर वैरभाव जाणून बूजून कटूनीतीव्दारे निर्माण करण्यात आला. निझाम, टिपू, यांना पध्दतशिर एक ऐकाला वेगवेगळे ठेवून एक एकाला इंग्रज आक्रमकांनी संपवीले आणि सर्वात शेवटी दुसरा बाजीराव पेशवा ला शरण येण्यास भाग पाडून शनिवार वाडयावर युनीयन जॅक डौलात फडकवीला. हेच इंग्रजी आक्रमकांचे खरे धोरण होते. त्याला भारतीय संस्थानीक बळी पडले. संस्थानीकांना संपवीणे हेच राजकीय परिणामचाचा खरा भाग होय.

ब्रिटीश राजवटीत इंग्रजांनी कायमधारा पध्दत, तैनाती फौज पध्दत होय. याव्दारे शेतीचा ऱ्हास घडवून आनने आणि जमीनदार

वर्गाला आपले से करणे हा इंग्रज आक्रमकांचा डाव यशस्वी झाला. कायधारा पध्दतने राजकीय दृटया जमीनदार वर्ग इंग्रजाकडे गेला. तो इंग्रज समर्थक बनला. तर तैनाती फौज व्दारे प्रत्येक राजे, संस्थानीकाना लष्करीदृष्टया कमजोर करून त्याचे राज्य इंग्रजी साम्राज्याला जोडणे हा खरा हेतू होता. त्या आमीषाला राजे, संस्थानीक बळी पडले आणि आपले राज्य इंग्रज आक्रमकांना दिले.

ब्रिटीश राजवटीत इंग्रजांनी भारतीयांना शिक्षण देतांना मेकॉले सिध्दांत वापरण्यात आला. कारण मेकॉले म्हणतो की, '' रक्त व रंगाने ते भारतीय असतील पण विचार आणि प्रवृत्तीने ते इंग्रज असतील'' असे इंग्रजी शिक्षण भारतीयांना दिले पाहिजे. त्यातून इंग्रजी माल भारतीय बाजार पेठेत खपेल. इंग्रजी माल चा विस्तार होईल. देसी (भारतीय) बाजारपेठा व अर्थव्यवस्थाचे खच्चीकरण होईल. भारत दारिद्र होईल. भारतीय संपत्तीची लूट करणे या उद्देशाने इंग्रजी शिक्षण भारतीयांना देण्यात आले. भारतीयांच्या सवयी, आवड निवड बदलण्याचे कार्य इंग्रज अक्रमकांनी केले. त्यामूळे भारतीय उद्योग धंदे, कुटीर उद्योग, अर्थव्यवस्थाचा ऱ्हास आपोआपच घडून आला.

शेवटी इंग्रज राजवटीच्या अन्यायी धोरणामुळे इ.स. १८५७ चा उठाव होय. हा उठाव की स्वराज्य, स्वातंत्र्याची सुरूवात की बंड अनेक 'इतिहासकानी आपआपले मत व्यक्त केले. परंतू या उठावाने भारतीयाचा जरी पराभव झाला पण राजकीय परिणाम फार मोठे झाले. भारतीय जनतेत स्वपराक्रम, स्वकर्तुत्वाची, स्वदेशप्रेमाची, स्वमातृभूमीची ओढ निर्माण झाली. या उठावात जनता सहभागी नव्हती. पण जनतेच्या मनात या उठावाचे मोठे परिणाम केले. भारतीय जनता इंग्रजा विरूध्द गेलेली दिसून येते.

जरी इंग्रजांना या उठावात विजय मिळाला तरी पण कोठे तरी इंग्रजांना सूध्दा कळले, म्हणूनच इ.स. १८५८ मध्ये राणीच्या जाहीरनाम्यात भारतीय जनते बद्दल फार कळवळा दाखवीण्यात आला. भारतावर कंपनीची नव्हे तर राणीची सत्ता आहे हे दर्शवीण्यात आले. भारतीय जनतेच्या मागणीची समस्या ची राणीला पूर्णकल्पना आहे तसा प्रयोग करण्यता आला. जरी भारतीय जनतेच्या तोंडाला पाने पुसल्या गेली. संस्थानीकांना





आश्वासने देण्यात आली. यावरून जनतेच्या मनात ब्रिटिश आक्रमका विरूध्द असंतोष, खदखद आहे हे इंग्रजांनी ओळखले हाच फारमोठा पाचवा परिणाम होय.

म्हणून इंग्रजांनी संवैधानीक विकास चा मार्ग स्विकारला. इ. स. १८५७ च्या उठावा पासून इंग्रज आक्रमाकांना एक धडा बसला, की भारतात आता कोणत्याही कारणास्तव फारमोठा असंतोष निर्माण होउ दयायचा नाही. म्हणून इंग्रज आक्रमकांनी असंतोष समाप्त करण्यासाठी इ.स. १८६१, इ.स.· १८९२, इ.स. १९०९, इ.स. १९१९, १९३५ असे सुधारणावादी कायदे केले.

शेवटी इंग्रजांनी सावधगिरी बाळगत संस्थानीकांना इंग्रजभक्त बनवीले. मुसलमाना इंग्रजभक्त केले. भारतात हिंदू विरूध्द मुसलमान फूट पाडून तोडा, फोड आणि राज्य करा या धोरणाचा अवलंब केला. सर्व सामान्य जनतेत असंतोष निर्माण होणार नाही याची काळजी घेतली. म्हणून सामाजीक, धार्मिक क्षेत्रात हस्तक्षेप इंग्रजांनी केला नाही. भारतात लोककल्याण करण्याचे आश्वासने देण्यात आली. भेदभाव नितीचा अवलंब होणार नाही, गुणवत्ता, पात्रता चा विचार केला जाईल असे आश्वासन राणी च्या जाहीरनाम्यात दिल्या गेलीत. या असंतोषातून स्वदेश प्रेमातून, स्वमातृभूमी प्रेमातून भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस ची स्थापना डिसेंबर १८८५ साली ॲलन हयुम या इंग्रज गृहस्थाने केली.

ब्रिटीश राजवटीत इंग्रजांचे लष्करी धोरण भेदभावाचे होते. भारतीय सैनिकाने कितीही पराक्रम केला, नाव लौकीक केले तरी इंग्रज आक्रमकांनी त्या भारतीय सैनिकाचा सन्मान, सत्कार, जास्त पगार, उच्च पद दिले नाही. उलट तो सैनिक लोकप्रिय झाला तर त्याला नियोजीत पध्दत प्रमाणे पध्दतशीर खोटया कारणास्तव अधोगती केल्या जात असे. म्हणून सैनिकात सुध्दा स्वभारतीय तत्वाची, राष्ट्रप्रेमाची, मातृभूमीची ओढ निर्माण होउ लागली. या सर्व समीकरणामूळे जनता, सैनिक यांच्यात एकीची भावना निर्माण होत आहे हे दिसल्यामूळे इंग्रज गृहस्थ ॲलन हयूम यांनी इ.स. १८८५ मध्ये लार्ड डफरीन च्या काळात भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस ची स्थापना केली. उद्देशहाच की असंतोष वाढला तर तो असंतोष व्यक्त करण्यासाठी कॉंग्रेसचे व्यासपीठ असावे. म्हणजे कॉंग्रेसची

स्थापना हा मोठा परिणाम होय. यामध्ये दादाभाई नौरोजी, व्यमेशचंद्र बॅनर्जी, फिरोजशहा मेहता, गोपाळ कृष्ण गोखले यांनी मवाळ पध्दतीने भारतीय असंतोष, स्वची जाणीव इंग्रज पर्यत पोहचवीण्याचे कार्य केले.

कारण इंग्लंड मध्ये औद्योगीक क्रांती झाल्यामूळे भारतातून राजकीय धोरनातून कच्चामाल इंग्लंडला जात असे. आणि पक्का माल तयार करून भारतीय बाजारपेठेत जास्त किंमतीत विकल्या जात असे. त्यातून भारतातून संपत्तीचा ओघ इंग्लंडला वाहून लागला. परिणामतहा भारताची आर्थिक पिळवणूक होउन भारत दारिद्री बनला. जेव्हा यीच झळ भारतीय अर्थव्यवस्थेला बसली तेव्हा भारतीय तरूण वर्गात इंग्रजाच्या धोरणा विरूध्द राष्ट्रीयत्वाची भावना प्रचंड प्रमाणात निर्माण होवु लागली.

ब्रिटीश राजवटीत इंग्रजांनी वरवर दाखवीण्यासाठी भारतीयावर विश्वास आहे हे दर्शवीले परंतू तोफखाना युरोपीयन व्यक्तीकडे ठेवला. भारतीय सैन्य संख्या कमी करण्यता आली. एकंदरीत विश्वासातून अविश्वास इंग्रजाचा सुरू झाला. महत्वाच्या जागा युरोपीयन व्यक्तीला देण्यता येत असे. यातून भारतीया सैनिकामध्ये असंतोष वाढत गेला. म्हणजे भारतीय जनतेत, सैनिक वर्गात, भारतीय पुढारी वर्गात असंतोष निर्माण करण्याचे कार्य ब्रिटिश आक्रमकांनी केलेले दिसून येते.

इ.स. १८८५ मध्ये कॉंग्रेस स्थापने पासून मवाळ गटाचे वर्चस्व असल्याने त्यांनी ब्रिटिश सरकारशी मिळते जुळते घेउन विनंती, अर्ज स्वरूपात भारतीय जनतेच्या मागण्या मागीतल्या. परंतू जहाल गटाला हे मान्य नव्हते. कारण ब्रिटिश आक्रमकांनी सर्व प्रकारचे भारतीय जनतेचा छळ चालवून आर्थिक शोषन सुरू केले. सुशिक्षीत तरूण वर्ग शिकून सुध्दा नोकरीसाठी पात्र ठरत नव्हता. त्यामुळे जहाल गटाला ब्रिटिश आक्रमणकारीच्या न्यायबुध्दीवर, न्यायतत्वावर विश्वास राहिला नाही. तरूण वर्गात सुध्दा आक्रमक भाषा बोलल्या जाउ लागली हेच ब्रिटिश आक्रमणाचे परिणाम होत. तरून वर्ग सुडाने पेटून उठाला. त्यांना वंशीकभेद भाव मान्य नव्हता. आपल्या मातृभुमीच्या रक्षणासाठी जहाल वर्ग पेटून उठला.





कायदयाने काहीच मिळणार नाही ही खात्री भारतीय तरूण वर्गाची झाली. म्हणून त्यांच्यात राष्ट्रवाद वाढत गेला.

ब्रिटीश राजवटीत आगीत तेल ओतण्याचे कार्य लार्ड कर्झन याने केले. इ.स. १९०५ मध्ये त्याने मुसलमानांना खुश करण्यासाठी बंगालची फाळणी केली. तेव्हा कॉंग्रेससह अनेक पुढाऱ्यांनी राष्ट्रीय शोक दिवस पाळला. ब्रिटिश आक्रमकांनी भारतीयांना एकत्र येण्यासाठी फार मोठया संधी दिल्यात त्यामुळे भारतीय तरूण जनता एकत्र येवुन त्यांच्यात स्वची जाणीव होवुन राष्ट्रवाद वाढू लागला. संपूर्ण बंगाल मध्ये वंदेमातरम ची जागृती होवु लागली. भारतीयांना अपमानीत करण्यासाठी बंगालची फाळणी करण्यात आली असा आरोप सुरेन्द्रनाथ बॅनर्जी यांनी केला. आता मवाळ सुध्दा जहाल भुमिका घेवु लागले. शेवटी राष्ट्रवाद वाढत असल्याने, जनतेत असंतोष वाढल्याने शेवटी ब्रिटिश सरकारने इ.स. १९११ मध्ये बंगालची फाळणी रद्द केली. यातून ब्रिटिश आक्रमण करीनी भारतातील जनतेला एक होण्याची संधी दिली. त्यातून स्वराज्य, स्वांतत्र्याची ज्योत किंवा मशाल धगधगत राहिली हे दिसून येते.

अशाप्रकारे भारता मध्ये इंग्रजी सत्तेविरूध्द आक्रमक राष्ट्रवाद वाढू लागला. त्यावेळी लो. टिळक यांनी जहाल गटाचे नेतृत्व स्वीकाररून चाफेकर बंधू ने रॅंडचा जोखून केला त्याचे समर्थन केले. वाईट ला वाईट का म्हणून नये ही लो. टिळक यांची विचार सारणी होती. लो. टिळकांनी आपल्या जहालशैली व्दारे होमरूल आंदोलन संपूर्ण भारतात चालवून प्रचंड जन जागृती केली. परंतू टिळक जास्त काळ जगूशकले नाही. जर जगले असतेपर भारताचा इतिहास बदलला असता. लो. टिळकांनी तरूण वर्गात स्वराज्य, सुराज्य, स्वातंत्रासाठी एकजूट व्हा असा परिणाम घडवून आनला. वाढलेला क्रातीकारी राष्ट्रवाद ब्रिटिश सरकार च्या वाईट, स्वार्थी, कावेबाज धोरणाचा परिणाम होय असे दिसून येते.

ब्रिटीश राजवटीत क्रांतीकारक सुध्दा इंग्रजा विरूध्द एक झाले. त्यांनी जसास तसे उत्तर देवुन ब्रिटिश आक्रमकांना हैरान करण्याचे कार्य केले. या क्रांतीकारकांनी प्रत्यक्ष कृतीकरून ब्रिटिश सरकारला हादरवीण्याचे कार्य केले. वासूदेव बळवंत फडके यांनी

क्रांतीकारक कार्याची सुरूवात केली आणि रामोशी संघटना उभारून ब्रिटिश आक्रमकांना जोरदार टक्कर दिली. शस्त्राचे उत्तर शस्त्राने दयावे ही त्यांची विचार सारणी होती. दरोडे टाकून पैसा जमाकरून सैन्य, शस्त्र जमा करण्याचे कार्य त्यांनी केले. तर स्वातंत्रवीर वी. दा. सावरकरांनी अभिनव भारत या संघटनेव्दारे इंग्रजाच्या धोरणाला शस्त्राने उत्तर दिले. क्रांतीकारकांनी चितगांव कट रचून काकोरी रेल्वेगाडी लूटून जसास तसे उत्तर देण्याचे महान कार्य केले. लाला लजपतरॉय यांनी ब्रिटिश आक्रमकांना योग्य प्रकारे उत्तर दिले. भगतसिंग यांनी ब्रिटिश सत्तेला जोरदार आक्रमकपणे उत्तर देवुन हैरान करण्याचे कार्य केले. भगतसिंह व बटूकेश्वर दत्तयांनी कायदेमंडळाच्या सभागृहात बॉम्ब स्फोट करून ब्रिटिश सरकारला हादरवीण्याचे कार्य केले. चंद्रशेखर आझादने सुध्दा क्रांतीची मशाल धगधगत ठवेली. कारण क्रांती कार्याची धुरा त्यांच्यावर येवुन पडली हेती. या सर्वांनी ब्रिटिश अधिकाऱ्याची हत्या करून लूटमार करून ब्रिटिश लष्कर पोलीस यांच्याशी दोन हात केले. म्हणजे ब्रिटिश आक्रमकांनी क्रांती कारकाच्या कार्याला प्रोत्साहन दिल्याचा परिणाम जानवतो. कारण क्रांतीकारकाच्या कार्याने भारतीय तरूण वर्गात देशप्रेम, देशभक्ती, राष्ट्रीयत्व मोठया प्रमाणात निर्माण झाले. क्रांतीकारकाच्या बलिदानामूळे देशासाठी राष्ट्रासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा तरूण वर्गात निर्माण झालेली आपनास पाहण्यास मिळते. त्यामुळे तुरूंगात जाण्याची भिती राहिली नाही. तुरूंग मंदिरा प्रमाणे तरूण वर्गाला वाटत होते. म्हणजेच ब्रिटिश आक्रमणाचे परिणाम तरूण वर्गावर क्रांतीवर्गावर इतके पडले की ते हसत हसत फासीवर जाण्यासाठी सुध्दा घाबरत नसत. यामधून प्रत्येक भारतीयामध्ये इंग्रजांना हाकलून दयावे ही भावना प्रबळ होत गेली हाच खरा क्रांतीकारी विचाराचा भारतीय राष्ट्रवाद निर्माण झाला असे दिसून येते.

म्हणूनच म. गांधीच्या असहकार चळवळीला, सविनय कायदेभंग चळवळीला, वैयक्तीक सत्याग्रहाला, भारत छोडो आंदोलनाला प्रचंड प्रतिसाद मिळत गेला. हाच खरा क्रांतीकारी विचाराचा राष्ट्रवाद होय.





या क्रांतीकारी विचाराच्या निर्णयाला घाबरूण इंग्रजांनी भारतीयांना काहीतरी देवुन असंतोष कमी करण्याचा प्रयत्न केला. इ.स. १९०९ चा कायदा, इ.स. १९१९ चा कायदा, इ.स. १९३५ चा कायदा हे सांगतो की इंग्रज सरकार भारतीय असंतोषाला प्रचंड घाबरले होते. म्हणून त्यांनी सैवंधानीक कायदे केले. राष्ट्रवाद, राष्ट्रभकती, देशप्रेम हेच क्रांतीकारी विचाराचे परिणाम होय. यामध्ये नागरीकांना आपले हक्क अधिकार जरी गमवावे लागले तरी पण भारतीय स्वातंत्र्याच्या लढयात खांदयाला खांदा लावून सर्व भारतीय ब्रिटिश आक्रमणकारी विरूध्द लढून दि. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश स्वातंत्र करून घेतला. अशा प्रकारे क्रातिकारक व्यक्ती आणि विचारामुळे भारताला स्वतंत्र मिळाले असे दिसुन येते.

**निष्कर्ष :**

१. ब्रिटिश राजवटीत राजे संस्थानीकावर परिणाम झाला.

२. भारतीय राजकीय जीवनावर परिणाम होवुन भारतीयांची मुस्काटदाबी, गुलामगिरी प्रचंड प्रमाणात वाढली.

३. भारतात राजकीय परिणमामळे अर्थिक दारिद्रयता भारतावर आली. भारताची अर्थव्यवस्था दळमळीत झाली.

४. तरूण वर्गाला नोकरी मिळत नव्हती. सुशिक्षीत वर्ग बेकार झाला त्यातून ते ब्रिटिश विरोधी बनले.

५. भारतीय संपत्तीचे अपहरण झाले. भारताची संपत्ती इंग्लंडला गेली.

६. भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसची स्थापना झाली.

७. मवाळ गाटाचा उदय झाला. त्यामूळे प्रचंड असांतेष इंग्रजा विरूध्द वाढला.

८. जहालगट चा उदय झाला, लो. टिळक यांचे नेतृत्व देशाला लाभले. त्यांनी प्रचंड राष्ट्रवाद, देशजागृती करून इंग्रजा विरूध्द भारतात लढण्याचे वातावरण निर्माण केले.

९. परकीय शक्तींना भारतातून हाकलून देणे आवश्यक आहे. याची जाणीव भारतीय जनता, विशेषतहा तरूण वग्रत निर्माण झाली त्यामून असंतोषाला खतपाणी मिळाले.

१०.संवैधानीक कायदे करण्यासाठी ब्रिटिश आक्रमणकारी पुढे आले नाही तर त्यांनी भारतीयाच्या फायदयासाठी कायदे केले नसते.

११.म. गांधीजीच्या चळवळी, आंदोलनाला भरघोस पाठींबा मिळाला.
१२.क्रांतीकारकाच्या ब्रिटिश आक्रमणकारी विरूध्द कारवाया वाढल्याने राष्ट्रभक्ती, देशप्रेम, राष्ट्रप्रेम लोकांत जागृत झाले. तुरूंगात जाण्याीच भिती नाहीसी झाली. तुरूंग मंदिरे वाटू लागली.
१३.भारत १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र झाला. हाच क्रातिकारी व्यक्ती आणि विचाराचा विजय होय.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१. दिक्षित नी. सी. — ब्रिटिशकालीन भारताचा इतिहास — प्रकाशक — पिंपळापूरे ॲन्ड कं. पाब्लीशर्स, नागपूर, २०१८
२. दिक्षित नी.सी. आधूनीक भारत व महाराष्ट्र प्रकाशक — पिंपळापूरे ॲन्ड कं. पाब्लीशर्स, नागपूर, २०१२
३. डॅ. वैद्य सुमन, डॉ. कोठेकर शांता — आधूनीक भारताचा इतिहास प्रकाशक — साईनाथ प्रकाशन — नागपूर, १९९४
४. नगोरी एस.एल., नागोरी जितेश — भारतीय स्वतंत्रता आंदोलन के क्रान्तीकारी — प्रकाशक — पोईन्टर पब्लीशर्स, जयपूर, १९९७.

# भारतीय स्वातंत्र्यलढा आणि भारतीय स्त्री वर्गाचे योगदान एक ऐतिहासिक अध्ययन

(50)

प्रा. डॉ. एन. आर. वर्मा
इतिहास विभागप्रमुख
श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय
पुसद, जि. यवतमाळ.

आधूनीक भारताच्या इतिहासात स्वांतत्रलढयात अनेक क्रांतीकारक, शेतकरी, कामगार, सत्याग्रही वर्गाचे अमूल्ययोगदान आहे. त्यासोबत म. गांधीजीच्या आवाहनानुसार स्त्री वर्गानी आपले कार्य, कुर्तव्य, जबाबदारी बजावून अमूल्य योगदान दिले. त्यामुळे अनेक क्रांतीकरक,सत्याग्रही आपले कार्य अधिक जोराने करू शकले.

इ.स. १८१८ मध्ये इंग्रजांनी पेशव्याचा पराभव करून भारत आले राज्य, साम्राज्य, राजवट निर्माण केली. भारतात राजवट निर्माण करतांना इंग्रजांनी शोषन, गुलामगिरी, संपत्तीचा ऱ्हास, माणूसकीचीमूल्ये तोडून फोडा आणि राज्यकरा धोरणाचा अमल केला.

शेवेंटी इंग्रजाच्या जाचाला, त्रासाला कंटाळून इ.स. १८८५ साली भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना झाली. सुरूवातीला ही स्वातंत्र्याची चळवळ मवाळ होती. परंतू लो. टिळक यांच्या कार्यातून जहाल होत गेली. भारतात हळूवार पध्दतीने भारतीय स्त्रीवर्ग, पुरूष वर्गाला स्वातंत्र्याचे महत्व जाणवू लागले. भारतीय जनतेच्या इच्छा, आकांक्षा इंग्रज राजवट पूर्ण करू शकत नव्हते. त्यामधुन क्रांतीकरक, पासून सत्याग्रही पध्दतीने हा स्वातंत्र्याचालढा उभारण्यात आला. त्यामध्ये अनेकाचे बलिदान झाले. त्या शौर्याला सलाम, म्हणून त्या स्त्रीवर्गाचे योगदान मांडणे हे आजच्या इतिहास पूर्न लेखन पध्दतीत आवश्यक आहे. विशेष संदर्भ म्हणून विदर्भाचा विचार करणे आवश्यक आहे. विदर्भात ही स्वातंत्र्याची चळवळ हळुवार पणे सुरू झाली. अमरावतीच्या सत्याग्रही पुढाऱ्यांनी वऱ्हाड सार्वजनीक सभा स्थापन करून स्वातंत्र्याची चळवळीला हळुवार आकार दिला.

२० व्या शतकात भारतीय स्वातंत्रलढयाला योग्य गती प्राप्त झाली. हा काळ राजकीय जागृतीचा होता. भारतावर आणि विदर्भावर इंग्रज सरकारचे राज्य होते. इ.स. १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे प्रथम अधिवेशन मुंबई ला भरले त्यामध्ये विदर्भातील एकही प्रतिनीधी हजर नव्हता. तरी पण कॉंग्रेस स्थापनेचे पडसाद विदर्भात पडले. तेंव्हा हळूवारपणे राजकीय जनजागृती होण्यास प्रारंभ झाला हाता. कारण अमरावती येथील काही स्वातंत्र्यवादी पुढाऱ्यानी अमरावतीला ''वऱ्हाड सार्वजनीक सभा'' ची स्थापना केली. या सभेच्या माध्यमातून जनतेचे प्रश्न, समस्या इंग्रज सरकारकडे मांडण्याचे कार्य होत असे. विदर्भातील स्वातंत्र्यवादी दादासाहेब खपर्डे, सरमोरोपंत जोशी, बॅरिस्टर रंगनाथ मुधोळकर यांनी पुढाकार घेउन भारतीय स्वातंत्र्याची चळवळ सुरू केली. त्यावेळी विदर्भातील पुढाऱ्याचा अखील भारतीय कॉंग्रेस वर चांगला प्रभाव होता. इ.स. १८८१ मध्ये कॉंग्रेसचे अधिवेशन नागपूर ला बोलावण्यात आले. त्यामूळे भारतीय व्यासपीठावरून विदर्भातील जनतेला आपले प्रश्न, समस्या मांडण्याची संधी मिळाली. या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष नागपूरचे बॅरिस्टर सी. नारायण स्वामी नायडू हे होते. या अधिवेशनाला लो. टिळक प्रथम विदर्भात आले. त्यामूळे विदर्भातील स्वातंत्र्यवादी पुढाऱ्याचा प्रथमच लो. टिळकांशी संबंध प्रस्थापीत झाला. इ.स. १८९४ मध्ये अमरावतीचे दादासाहेब खापर्डे, मधोळकर आणि अकोल्याचे दिगंबर यांनी ''वऱ्हाड प्रांतीक कॉंगेस कमेटी'' ची स्थापना केली. या वेळी लो. टिळक यांचे 'केसरी' वर्तमानपत्र मोठया प्रमाणात



विदर्भात वाचल्या जात असे. केसरी पत्राने विदर्भात प्रचंड राजकीय जन जागृती निर्माण केलेली आढळते. तेंव्हा दादासाहेब खापर्डे विदर्भातील जहाल गटाचे लो. टिळकांचे अनूयायी दिसून आले. इ.स. १९१२ मध्ये वऱ्हाड साठी स्वतंत्र विधान सभा निर्माण करण्यात आली. विदर्भात लो. टिळकाच्या कार्याला स्त्रीवर्गानी मोठया प्रमाणात पाठींबा दर्शवीला होता. त्यामध्ये अकोला येथील श्रीमती दुर्गाबाई जोशी या प्रमूख होत्या. त्यांचा उल्लेख वऱ्हाडची वाघीण म्हणून केला जातो. म. गांधी युगात वऱ्हाड मध्ये वीर वामनराव जोशी श्री. बापूसाहेब सहस्त्रबुध्दे, श्री. दादासाहेब पंडीत, श्री. आबासाहेब कुळकर्णी सोबत दुर्गाबाई जोशी यांनी वऱ्हाडमध्ये इंग्रजी सत्तेविरूध्द स्वांतत्र्याची चळवळ मोठया प्रमाणात उदयास आनली. श्रीमती दुर्गाबाई जोशी यांनी सर्वावर मात करून स्त्रीवादी गट तयार करून यमुनाबाई ताकवाले, सौ. मामी पांडे, सरस्वती बाईमेहरे, ताराबेन मश्रूवाला, राधाबाई ओक याच्या सोबत स्वातंतत्र्यवादी कार्य करून भारतीय स्वातंत्र्य लढयात उत्साहाने भाग घेतला. स्त्रीवर्गाचे प्रतिनीधी म्हणून श्रीमती दुर्गाबाई जोशी वऱ्हाड भागात प्रचंड कार्य करीत. इ.स. १९३० च्या जंगल सत्याग्रहात, सविनय कायदेभंग चळवळीत वहीहांडा येथे मीठाचा सत्याग्रह केला. त्याच्या प्रेरणेतून अमरावतीत सौ. पार्वतीबाई पटवर्धन, यवतमाळ येथे सौ. आनंदीबाई दामले यांनी मीठाचा सत्याग्रह केला. श्रीमती दुर्गाबाइ जोशी यांच्या स्वातंत्र्यवादी कार्यामूळे इ.स. १९३२ मध्ये ९ महिण्याची शिक्षा झाली. अकोला येथील चंद्रभागाबई वडोदकर यांच्या नेतृत्वात इ.स. १९२१ मध्ये दारूबंदी साठी सत्याग्रह झाला. तेव्हा चंद्रभागाबाई वडोदकर यांना ०३ दिवस तुरूंगात जावे लागले. वर्धा येथील जमनालाल बजाज यांच्या पत्नी सौ. जानकी देवी बजाज यांनी स्वातंत्रवादी चळवळीला वाहून घेतले होते. त्यांनी आपल्या भाषनाव्दारे स्त्रीवर्गात मोठा प्रभाव पाडला. जानकीदेवी बजाज यांनी चरखा, खादी चा प्रचार प्रसार केला आणि स्त्रीवर्गाचा सहभाग वाढवीण्याचे कार्य केले.

म. गांधीच्या असंख्य चळवळीत सुशिक्षीत स्त्री वर्गाने भाग घेउन पुरूषांच्या खांदयाला हातभार लावण्याचे कार्य केले. परदेशी कापडाची होळी असो किंवा सुतकताई असो स्त्रीवर्गाने स्वातंत्र्य चळवळीत बरेच कार्य केले. इ.स. १९३० च्या दांडीयात्रेत, पिकेटींग सत्याग्रहात, कायदेभंग चळवळीत बऱ्याच स्त्रीवर्गाने भाग घेतला. म.गांधी यांनी स्त्रीदास्य विमोचनाच्या चळवळीची सांगड राजकीय- आंदोलनाशी घातलेली दिसून येते. जंगल सत्याग्रहात विदर्भातील अनेक स्त्री वर्गाने सत्याग्रह करून इंग्रजी सत्ते विरूध्द स्वातंत्रलढा पुकारला होता त्यामध्ये प्रामूख्याने अनूसयाबाई काळे हया युध्दमंडळाच्या अध्यक्षा होत्या. त्याच्या सोबत विद्यावती देवडीया, चंद्रभागाबाई पटवर्धन, सुशीलाबाई गाडगीड, गोपाबाई मालतीबाई थत्ते, जानकीबाई बजाज, गीता साने, अंबीका मेहरे, सौ. जिजाबाई देशपांडे, पार्वतीबाई पटवर्धन, सौ. पार्वतीबाई पत्की, रंगबाई मिडवाईफ, सौ. कोकीळाबाई प्रधान, सौ. चंदुबाई बनसोड, गोपाबाई अग्रवाल, सौ. लक्ष्मीबाई दांडेकर प्रमूख होत्या.

इ.स. १९३० मध्ये ''वऱ्हाड प्रांतीक यूध्द मंडळ'' स्थापन झाले. त्या समितीवर श्रीमती दुर्गाबाई जोशी, ताराबेन मश्रुवाला यांनी कार्य कले. यावेळी वऱ्हाड प्रांतात मिळाचा सत्याग्रह, कायदेभंग चळवळ, जंगल सत्याग्रह हे तीन प्रकारचे सत्याग्रह चालत होते. यावेळी सत्याग्रहाचे मूख्य उद्देश, कार्यपध्दती स्त्री वर्गात सांगण्याचे कार्य वरील स्त्रीवर्गाने विशेष करून केलेले दिसून येते. महाराष्ट्राचे प्रसिध्द समाज सुधारक कै. गोपाल गणेश आगरकर यांच्या विधवा पत्नी श्रीमती यशोदाबाई आगरकर हया ६१ वर्षाच्या असतांनाही म. गांधीच्या मिठाच्या सत्याग्रहात भाग घेउन राष्ट्रध्वज फडकवीण्याचे कार्य त्यांनी केले. वृध्दपकाळमूळे इंज सरकारने त्यांना अटक केली नाही. अमरावतीच्या पटवर्धन दाम्पत्यांनी आणि यवतमाळच्या दामल दाम्पत्यांनी आपआपल्या भागात सत्याग्रह मोठया प्रमाणात चालवीण्याचे कार्य केले.

अकोल्याच्या सौ. प्रमिलाताई ओक, सौ. राधाबाई ओक, सौ. चाफेकर या तीन भगिनीनी उत्साहत कार्य करून स्वातंत्र्य चळवळीला हातभार लावला. अमरावतीच्या मथूबाई लिमये, सौ. राधाबाई गोखले, कु. अंकुताई साठे, श्रीमती यमूताई टाकरखेडकर, यांनी स्वराज्य कार्यात प्रचार करून भाग घेतला. यवतमाळमध्ये सौ. आनंदीबाई दामले, सौ. लक्ष्मीबाई सोमण, श्रीमती रंगूबाई,

श्रीमती लक्ष्मीबाई आपटे, श्रीमती अन्नपूर्णा बाळ, श्रीमती माई टकले, सौ. द्रोपदीबाई चव्हाण यांनी भाग घेउन विशेषकार्य स्वराज्यासाठी केले.

इ.स. १९३२ मध्ये कायदेभंग चळवळी जोरात चालू असतांना वाशिम मध्ये सौ. शुभगबाई काशिकर, गोदूताई साने यांनी वाशिम मधून पुढाकार घेउन कायदयाचा भंग करून स्वराज्य कार्यात, भारतीय स्वातंत्र लढयात विशेष पुढाकार घेतला. म्हणून इंग्रज सरकारने त्यांना ६–६ महिण्याची तुरूंगवासाची शिक्षा दिली. यावेळी मंगरूळपीर च्या सौ. उमाबाई खपली, सो. सुंदराबाई देशमूख यांनी सुध्दा स्वाज्यासाठी कार्य केले. त्यांना ३–३ महिणे शिक्षा झाली. अचलपूराच्या श्रीमती लक्ष्मीबाई दांडेकर यांच्या कार्याने अचलपूरला राजकीय जनजागृती घडली.

अमरावतीच्या पार्वतीबाई पटवर्धन यांनी दारूबंदी, कायदेभंग चळवळीत भाग घेउन खेडयापाडया पर्यंत ही चळवळ जागृत केली.

बुलढाण्यातील ताराबाई कानिटकर, इंदिराताई गडे, इंदूमती देशपांडे शालीनीताई देशपांडे, कमलाताई रेंगे यांनी राष्ट्रीय कार्यात आपला सहभाग नोंदवून लढयात भाग घेतला. खामगांव येथील सरजाबाई देशपांडे, पार्वतीबाई पारसनीस यांनी खामगांव परिसरात स्वातंत्रवादी चळवळी केल्या. खेडयापाडयात जीजी देशपांडे, रूख्मीबाई कोरडे यांनी दारूबंदी, परकीय मालावर बहिष्कार सारखे कार्य करून स्वातंत्रलढयाला हातभार लावण्याचे कार्य केले. नागपूरातही सौ. अनूसयाबाई काळे यांच्या नेतृत्वात 'भगिनी मंडळ' स्थापन झाले. याव्दारे त्यांनी दारू बंदी, परकीय मालावर बहिष्कार, परदेशी मालाची होळी, स्वदेशीचा स्वीकार या सारखे कार्य करून आपल्या कार्याचा ठसा उमटवीला सौ. अनूसयाबाई काळे युध्द मंडळ च्या अध्यक्ष असल्याने त्यांनी कमलाबाई होस्टेप, विद्यावती देवडीया, वत्सला कर्णीक, विमलाताई अभ्यंकर, गोपूताई जोगलेकर, सरस्वती !तिकेकर, लिलाताई ढवळे, गंगाबाई चौबे,चतूराबाई कोटकर यांना स्वराज्य कार्यात पुढे आनून भारतीय स्वातंत्रलढयात भाग घेण्यास प्रेरणा दिली. आर्णी, हिंगणघाट येथिल कृष्णाताई आणि चंम्पूताई बन्सोड यांनी बहिष्कार स्वदेशी चा प्रचार केला. चंद्रपूर येथील पुरूषासोबत स्त्रीवर्गाचा सूध्दा मोठा हात भार लावला. गोपीकाबाई कन्नमवार, गोपीकाबाई फुलझेले, प्रतिमा यासीफ, यांच्या नेतृत्वात यांच्या नेतृत्वात बहिष्कार, स्वदेशी चळवळ, मीठाचा सत्याग्रह, झेंडा सत्याग्रह विदेशी कापडाची होळी सारखे स्वराज्यासाठी कार्य करण्यात आले. भंडारा, गोंदिया भागात आनंदी जोगळेकर, लक्ष्मीबाई जव्हेरी यांनी कार्य करून तुरूंगवास पत्कारला.

भारतीय स्वातंत्र्य लढयात आष्टी आणि चिमूर स्वतंत्रलढा फार गाजला. विदर्भातील आष्टी आणि चिमूर लढयात सर्व देशवासीयाचे लक्ष लागले. आष्टी जि. वर्धा या गावी राष्टसंत तुकडोजी महाराज यांच्या स्वराज्यवादी, स्वातंत्रवादी भजन, कीर्तणाने आणि आरती मंडळ, आखाडे मंडळ, वाचनालये या काय्रतून प्रचंड जन जागृती घडून आली. म. गांधीजीच्या करा किंवा मरा या संदेशाचे पत्रक आष्टी भागात घडकले दि. १६ ऑगस्ट १९४२ या दिवशी चलो आष्टी चा नारा देण्यात आला. आष्टीला जाण्यासाठी अनेक सत्याग्रही तयार झाले. विश्व विजयी तिरंगा प्यारा झेंडा उंचा रहे हमारा हे गीत प्रत्येकाच्या तोंडात होते. आष्टीच्या गांधी चौकात दोन स्वातंत्र वादी सैनिक राष्ट्रीय गीत म्हणत होते. ३५०–४०० सत्याग्रही जयघोष करीत आष्टी पोलीस स्टेशनकडे निघाल. त्यावेळी आष्टीचा ठाणेदार सबइन्सपेक्टर रामनाथ मिश्रा होता. त्याला बातमी मिळाली की पोलीस स्टेशनवर मोर्चा येणार आहे. त्याने सुध्दा सत्याग्रही सोबत काय करायचे ची तयारी केली होती. आष्टी पोलीस स्टेशनवर तिरंगा फडकवीण्याचा प्रयत्न सत्याग्रही करू लागले. त्याला ठाणेदार रामनाथ मिश्राचा विरोध होता. शेवटी पोलीस स्टेशन मधून गोळी वार झाला. जमाव भयभीत झाल्याने पांगतांना पोलीस स्टेशवर गोटयाने उत्तर देण्यात आले. सर्वत्र पोलीस स्टेशवर गोटमार सुरू झाली. जमाव पोलीस स्टेशन मध्ये घूसला आणि पोलीस स्टेशन पेटवून दिले. त्यामूळे इंग्रज सरकार बिथरले. त्यांनी आष्टी गावात सैन्य आनले. सैन्याच्या १७ गाडया भरून आल्या. त्यांनी सत्याग्रहीवर अनेक



प्रकारचे अमानूष अत्याचार केले. त्यामूळे अनेक कुंटूबाची वाताहात झाली. अनेकाच्या नशिबी हाल अपेष्ठा झाल्यात कोर्टकचेरी झाली अनेकांना फासावर लटकविण्यता आले. त्यासाठी इ.स. १९४३ मध्ये सौ. अनूसयाबाई काळे यांच्या अध्यक्षतेखाली ''फाशी निवारण समिती'' स्थापन झाली. या आष्टी भिषन संकटात अहिल्याबाई नागापूरे कासाबाई लोहारीण, विठाबाई शिंदे, कौसल्याबई, शेवंताबाई या स्त्री वर्गाने भाग घेतला होता.

तसेच चिमूर जि. चंद्रपूर यागावी सूध्दा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रेरणेतून भजनगीतातून प्रचंड सत्याग्रह झाला. चिमूर क्रांती नावाने प्रसिध्द गावात रक्ताचे पाट वाहल्या गेले. चिमूर च्या जनतेवर, सत्याग्रहीवर इंग्रज सरकारने अनेक प्रकारचे पाशवी अत्याचार केले. चिमूर हत्याकांडची चौकशी करण्याची मागणी पुढे आली असता सौ. विमलाबाई देशपांडे, कु. विमलाबाई अभ्यंकर या भगिनींनी स्वत:हा चिमूर परिसरात जाउन बळी पडलेल्या, अत्याचार, अमानूष मारहान झालेल्या सत्याग्रही ची भेट घेउन, स्त्रीवर्गावरील अत्याचाराची चौकशी ची मागणी केली. चिमूर स्वातंत्र संग्राम मधील सत्याग्रहींना फाशी झाली. तेव्हा सौ. अनूसयाबाई काळे यांनी फाशी निवारण समिती स्थापन करून न्याय देण्याचा प्रयत्न केला. सौ. अनूसयाबाई काळे या स्वत:हा आष्टी, चिमूर हत्यांकांड आणि फाशी रद्द करण्यासाठी म. गांधीं याना भेटल्या पंरतू त्यात त्यांना यश आले नाही.

इ.स. १९३० मध्ये यावली जि. अमरावती येथे सूध्दा प्रचंड सत्याग्रह करण्यात आला. म. गांधीजीचे विचार खेडयापाडया पर्यंत पोहचले असल्याने खेडयात प्रचंउ राजकीय जनजागृती झाली. इ.स. १९३० मध्ये यावली मध्ये कायदेभंग चळवळ करण्यात आली. सत्याग्रहीनी यावलीत जंगल सत्याग्रह केला. या सत्याग्रहींना शेवटी पकडून सहा–सहा महिण्याची शिक्षा देण्यात आली.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या लष्करात कॅप्टन लक्ष्मी यांच्या नेतृत्वात स्त्री वर्गाची फलटण होती. इ.स. १९४२ च्या म. गांधीजीच्या चलो जावो आंदोलनात अनेक स्त्रीयांनी, विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढून आसमंत दणानून सोडले होते. या भारतीय स्वातंत्र लढयात स्त्री वर्गाने क्रांतीकारकांना, सत्याग्रहींना लपवून ठेंवणे, स्त्री वर्गाचा पोशाख देणे, निरोप पोहचवीणे, बातम्या प्रसारीत करणे, चे कार्य केलेले दिसून येते. शेवटी भारतीय स्वातंत्र्य लढयात असंख्य स्त्रियांची आपले जीवन अर्पण केलेले आढळून येते. स्त्रीवर्गाने आपले कर्तुत्व सिध्द करून, आंदोलनात भाग घेवुन भारत मातेच्या स्वातंत्र्यासाठी हातभार लावला हेच सिध्द होते.

## सारांश

भारतीय स्वातंत्र लढयात इ.स. १९२० हे वर्ष इतिहासाला कलाटणी देणारे वर्ष ठरले. कारण त्यापूर्वीचा काळ हा लो. टिळकांच्या जहाल विचार सारणीचा आणि भारतीय स्वातंत्र्याच्या लढयातील पाया भरणीचा हा काळ होता. इ.स. १९२० नंतर भारतीय स्वातंत्रेचा लढा हा विस्तारू लागला. त्यामूळे २० व्या शतकात स्त्रीवादी चळवळ विस्तारू लागल्याचे चित्र दिसून येते. म. गांधी नी स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेण्याचे आव्हान स्त्रीवर्गाला केल्यामुळे असंख्य स्त्री वर्ग या चळवळीत आपआपली जबाबदारी घेउन कार्य कर्तुत्व करू लागले. अशा प्रकारे स्त्री वर्गाच्या रूपाने स्वातंत्रवादी चळवळीला एक कणखर स्वरूप प्राप्त झाले. त्यामधून स्त्री वर्गाचे चळवळीतील कार्य प्रखरतेने दिसले.

कारण १९ व्या शतकापर्यंत जी स्त्री घरातून बाहेर पडत नव्हती ती स्त्री एकदम स्वातंत्र्यासाठी घराबाहेर पडून कर्तुत्व गाजवू लागली चे चित्र भारताच्या इतिहासात पहावयास मिळते. हा काळ स्त्री वर्गाच्या उत्थांनाचा, स्वकर्तुत्वाचा, स्व अविष्काराचा होता. स्त्री वर्गात आता प्रखरतेने स्वातंत्रेची बिजे पेरल्या जाउ लागली. स्त्री वर्गासाठी हया चळवळी स्त्रियांचे एक व्यासपीठ तयार होउ लागले. इ.स. १९२१ ते भारत स्वतंत्र होईपर्यंत भारतात स्वातंत्र्यासाठी ज्या चळवळी झाल्यात त्यामध्ये स्त्री वर्गाचा फार मोठा वाटा, योगदान आहे. हे मान्य करावेच लागेल. त्यातून स्त्री वर्गाचे कार्य, कर्तुत्व भारतीय

57

52

इतिहासाला दिसून आले. हा संशोधन लेख स्त्री वर्गाचे कर्तुत्व भारताच्या इतिहास पुर्नरलेखीत करण्याचा प्रयत्न होय. कारण भारताच्या इतिहासाने स्त्री वर्गाच्या कर्तुत्वाची, कार्याची पाहिजे तशी दखल घेतलेली दिसत नाही. म्हणून आधूनिक भारताच्या इतिहासात नवा विचार प्रवाह मांडून स्त्रीवादी कर्तुत्व मांडण्याचा हा एक प्रयत्न होय. कारण भारताच्या स्वातंत्र्यासाठी एक स्त्री वर्ग काय काय करू शकते हेच या संशोधनाचे फलीत होय. २० व्या शतकातील राजकीय जनजागृतीच्या काळात स्त्रीवादी चळवळी चा विचार प्रवाह निर्माण झाला. विदर्भातील स्त्रीवादी कर्तुत्वाने, नेतृत्वाने भारतीय स्वातंत्र लढयात घेतलेली भुमिका, भारतीय इतिहासाने आता मान्य करावी आणि आता तरी योग्य दखल घेउन भारताच्या इतिहासाने स्त्री वर्गाला न्याय दयावा हाच संशोनाचा खरा आराखडा होय.

## संदर्भ ग्रंथसूची


१. बियाणी ब्रिजलाल, माझेजीवन दर्शन, प्रकाशक, दै. मातृभूमी, अकोला, वर्ष १९६६–६७ खंड पहिला

२. कारंजकर भि.दे., अमरावती शहराचा इतिहास, प्रकाशक, श्री. दा. मूळे प्रशाशक अमरावती, नागर पालिका वर्ष १९७८

३. संपादक डॉ. भगत एस.बी., निवडक शोध निबंध, खंड सहावा (२००७–०८), प्रकाशक, प्राचार्य रमेश बोभाटे, इतिहास परिषद अध्यक्ष, २००८

४. संपादक चिकटे भूपेश, निवडक शोध निबंध, खंड सातवा (२००८–०९), प्रकाशक, डॉ. अरूणा राउत, इतिहास परिषद अध्यक्ष, २००९

५. धर्मधीकारी तारा, स्वातंत्र्य लढयातील स्त्री, प्रकाशक, ऑगस्ट क्रांती महोत्सव समिती, मुंबई, १९९२

६. संपादक देशमुख पी.एन., ऐतिहासिक लेख संग्रह, खंड २, प्रकाशक, गु.आ. कळस्कर, १९९६

७. कडवे रघुनाथ, १९४२ चा आष्टी स्वातंत्र संग्राम, प्रकाशक, संस्कार प्रकाशन, नागपूर, १९८६

८. संपादक मंडळ, संशोधक, प्रकाशक, कार्याध्यक्ष इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धूळे, २०१५

# "प्रदूषनाची साधने, त्याचे मानवीजीवनावर होणारे परिणाम आणि प्रदूषन नियंत्रणाच्या उपाययोजनाचे ऐतिहासीक अध्ययन"

53

**प्रा. डॉ. एन. आर. वर्मा**
इतिहास विभाग प्रमुख
श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महा.,
पुसद, जि. यवतमाळ (महाराष्ट्र)
narayanvarma67@gmail.com

**सारांशः**

*आज जगात पर्यावरण या विषयाला फार महत्व प्राप्त झाले आहे. एखादया देशाचा विकास साधनांना पर्यावरण विषयाला फार काळजीपूर्वक हाताळणे आवश्यक आहे नाही तर मोठया प्रमाणात त्या देशाला परिणामाला समोर जावे लागते. म्हणूनच आज प्रत्येक देश पर्यावरण संबंधी जागरूत झाला आहे. म्हणूनच पर्यावरणाचा ऐतिहासीक अभ्यास, अध्ययन करणे आवश्यक आहे. यासंबंधी अनेक विचारवतांनी पर्यावरणा संबंधी व्याख्या केल्या आहेत. त्यामधून सारांश असा की, पर्यावरणाचा पृत्वीवर प्रभाव होतो. त्यामधून मानवी जीवनावर परिणाम होउन मानवी जीवन प्रभावीत झालेले दिसून येते. आज जगात विकास करण्याची स्पर्धा निर्माण झाली असून त्यामधून औद्योगीकरण वाढले, शहरीकरण वाढले, नैसर्गीक साधन संपत्तीचा अनिर्बंध वापर वाढला, पण नियोजनाचा, व्यवस्थापनाचा अभाव निर्माण होवून मानवी जीवनाच्या असंख्य समस्या निर्माण होउन मानवी जीवन प्रभावीत झालेले दिसून येते. म्हणजेच पर्यावरणाचा सरळ संबंधमानवी जीवनाशी जोडलेला दिसून येतो. त्याचा ऐतिहासीक अभ्यास करणे आवश्यक आहे. त्यामुळे जगावर त्याचे विविध परिणाम दिसून येतात. जर एखादया भागात विकासासाठी सूरू केलेले औद्योगीक क्षेत्र त्यामधून निघणारा धूर, वायू, द्रव्य, पाणी त्या भागाला संपूर्ण पणे पभावीत करतो. त्यामधून त्याभागाचे प्रदुषण निर्माण होउन मानवी जीवन प्रभावतीत होते. एकदा पर्यावरण प्रदूषण वाढले तर ते शुध्द करण्यचासाठी अनेक वर्ष मानवी प्रयत्न करावे लागतात. त्यासाठी मानवाने जागरूक राहणे आवश्यक आहे. हे प्रदूशण कमी करण्यासाठी अनेक उपाययोजना आहेत फक्त गरज आहे कडक कायदे, अंमलबजावणी आणि लोक सहभागाची. वैयक्तीक लक्षदेउत हा भाग, हा प्रांत हा समाज, हे राष्ट्र माझे आहे. माझे कर्तव्य निर्सगासाठी आहे. निसर्ग वाचल तर मी, माझा समाज माझा देश वाचेल ही भावना जनतेत असावी. जनतेने स्वतःहा पुढाकार घेउन हरित कांती चळवळ राबवावी आणि निसर्गतहा साधन संपत्तीचा वापर काळजीपुर्वक करावा तरच पर्यावरण वाचेल आणि आमची पृथ्वी सजीव राहिल नाहीतर या पृथ्वीवर सजीवसृष्ठी राहणार नाही.*

## प्रस्तावणा :

आज 21 व्या शतकात भारतात आणि जगात पर्यावरण समस्येवर गंभीर चिंतन, मनन चालू आहे. कारण पर्यावरणाचा संबंध मानवीजीवनाशी जोडलेला आहे. आज जगात विकास, उन्नती, प्रगती, मानवी गरजा, भौतीक सुख साधने निर्माण करण्याची, उत्पत्ती करण्याची स्पर्धा निर्माण झालेली दिसून येते. त्यामधून मानव जातीला, त्याच्या जीवनाला कायकाय परिणाम भोगावे लागतील याची कल्पनाच नाही. या समस्या 21 व्या शतकात निर्माण झाल्याने पर्यावरण विषयाची व्याप्ती वाढली आहे. म्हणून सर्व जगात, भारतात पर्यावरण संबंधी जागरूकता वाढवीणे आवश्यक आहे. त्यासंबंधी पर्यावरणाचा ऐतिहासीक अभ्यास करणे आवश्यक आहे.

## इतर पुस्तकाचे विचार (रिव्हयू) :

आज अनेक विचारवंतानी आपआपल्या वैचारीक दृष्टीकोणातुन पर्यावरण संबंधी व्याख्या, संकल्पना स्पष्ट केल्यात. तयामधून सारांश असा की, पर्यावरणाचा पृथ्वीशी संबंध येउन पृथ्वी प्रभावीत होते. त्याचा सरळ संबंध मानवी जीवनावर होउन मानवी जीवनावर अनेक परिणाम होतात.

आज जगात, भारतात विकास, प्रगतीची स्पर्धा निर्माण झाली आहे. मानवी गरजा पूर्ण करण्यासाठी, राहणीमान वाढवीण्यासाठी, भोतीक सुख वाढवीण्यासाठी औद्योगीकरण वाढले. लोकसंख्यामूळे, रोजगारमूळे शहरीकरण वाढले. निसर्गातील साधन संपत्तीचा वापर प्रचंड वाढला. त्यामधून मानवाने निसर्गातील संपत्तीचा उपसा जास्त प्रमाणात केला. पण निसर्गात घेतलेले निसर्गाला परत केले नाही. कारण व्यवस्थापन नियोजन कोणीच केले नाही. मानवाची निर्सगातून होण्याची वृतिवाढली. हव्यासापोटी

मानव जातीने पर्यावरणाला प्रभावीत केले. त्यामूळेच निर्सगाने आज पर्यावरणाच्या माध्यमातून मानवजातीला प्रभावीत केलेले दिसून येते. यासाठीच पर्यावरणाचा ऐतिहासीक अभ्यास करणे गरजेचे आहे.

### रिसर्च वर्क :

आज पर्यावरणामूळे पृथ्वीवरील जीवसृष्टी जिवंत आहे. कारण पर्यावरणावरच सजीव सृष्टी ची वाढ अवलंबून आहे. जर मानवाला स्वतःहाचे अस्थित्व टिकवायचे असेल तर पर्यावरणाला वाचवीणे काळाची गरज आहे. कारण मानवाच्या सुख, साधनामूळे, हव्यासापोटी, स्पर्धामूळे पर्यावरण बिघडले. त्यामूळे सजीव सृष्टी, प्राणी यांना अनेक प्रकारची बाधा निर्माण झालेली दिसून येते. आज वातावरणात, प्रचंड धूळ आहे, हवादुषीत झाली आहे, वायूप्रदूषीत झाला आहे, पाणी प्रदूषीत झाले आहे. त्यामूळे मानवी जीवन प्रभावीत झालेले आपनास दिसून येते. कारण मानवाने सभोतालचे वातावरण पूर्ण पणे प्रदुषीत केले. पर्यावरणाला पोषक घटक दिले नाही. त्यामूळे पर्यावरणातील अपायकारक घटकामूळे पर्यावरणाचे संतून पार बिघडून गेले आहे. त्याचे परिणाम सजीव सृष्टी, जीव, जंतू, झाडे, पाणी, प्राणी, पशू यांना भोगावे लागत आहे. मानवाने प्रदूषन वाढवीण्याचे कार्य केले. त्यालाच पर्यावरण प्रदूषण म्हटले जाते.

### प्रदूषनाची कारणे :

1) ध्वनी प्रदूर्षन 2) धूर प्रदूर्षन 3) वाहतूक, इंधन, वायू प्रदूषन 4) पाणी प्रदूर्षन 5) हवा प्रदूषन 6) सडलेल्या वस्तू प्रदूषन 7) औद्योगीक कचरा प्रदूषन 8) रसायने, जंन्तू नाशक द्रव्य प्रदूषन 9) जंगलतोड प्रदूषन 10) करा प्रदूषन 11) अणू प्रदूषन 12) ज्वालामुखी प्रदूषन 13) विविध जीवाणू प्रर्दूषन 14) मृदा प्रदूषन 15) सागरी प्रदूषन 16) भुकंप प्रदूषन.

या घटकाव्दारे भारतात आणि जगात, भागात, प्रदेशात प्रदूषन घडून येतो. या प्रदूषनाव्दारे मानवी जीवन प्रभावीत करण्यास सुरूवात होते. एकदा देशात, प्रदेशात प्रदूषन वाढले तर ते प्रदूषन दूर करण्यासाठी, हवा शुध्द करण्यासाठी अनेक वर्ष मानवी जीवनाला प्रयत्न करावे लागतात नाहीतर मानवी जीवनावरन परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही.

### परिणाम :

1) हवा, धूर, धूके, वायू प्रदूषन वाढले तर आकाशातील ओझेनचा थर कमी होईल त्यामधून तापमान वाढेल, हिमालयातील बर्फ वितळेल आणि समूद्र, नदयाला पुर येउनज न जीवन विस्कळीत होईल. धूर, धूके चे प्रदूषन वाढले तर हवेची आद्रता वाढेल. त्यातून अपघात वाढतील. मानवी जीवनाला श्वास घेण्यास त्रास होइल. श्वसनाचे विकार वाढतील. वायू प्रदूषनामूळे हृदयावर परिणाम होउन मनूष्याचे आयूष्यकमी होईल. डोळे लालसर होतील, घशाची खवखव वाढे, फुफ्फुसावर सुज येईल, न्यूमोनीयाचा त्रास होईल, हाडाचे विकार वाढतील, कॅन्सर, त्वचा रोग वाढेल, लोक अपंग होतील आणि मृत्यूचे प्रमाण वाढेल, वनस्पती, पशु, प्राणी चे जीवन धोक्यात येईल. अस्थिरोग, दंतविकार मेंदू विकार वाढतील.

2) पाणी प्रदूषन वाढले तर शरिर क्रिया बिघडेल, अनेक प्रकारचे रोग होतील, त्वचारोग, कॅन्सर वाढेल, साथीचे रोग वाढतील, जलचर प्राणी मरतील, प्राणहानी व वित्तहानी वाढेल, आयूष्य कमी होईल. वनस्पती, पिके वर परिणाम होउन उत्पादन क्षमता कमी होइल, जल परिसर समाप्त होईल.

3) ध्वनी प्रदूषन वाढले तर कानाचे विकार वाढून हृदयावर परिणाम होईल, मानसीक रोग वाढतील, बहिरेपणा वाढेल, निद्रानांश वाढेल.

4) औद्योगीक, औष्णीक प्रदूषन वाढले तर पाण्याचे प्रदूषन वाढून जलचर प्राणी, मनूष्य जीवन प्रभावीत होईल, तापमानात वाढ होईल, ऑक्सीजन प्रमाण कमी होईल. मानवी जीवन धोक्यात येईल, रक्ताचा, हाडाचा, फुफ्फुसाचा कॅन्सर होईल, किरणोत्सारी आजार होतील.

5) कचराप्रदूषन वाढले तर रोगजंतूवाढतील, अस्वच्छतेमुळे त्वचेचेरोग वाढतील, पाणी दूषीत होईल, आरोग्यावर परिणाम होईल, बूरशीजन्य रोग होतील.

6) सडलेल्यावस्त चे प्रदूषन वाढले तर अनेक प्रकारचे रोग होतील, अस्वच्छतेमूळे आरोग्यावर परिणाम होतो.

### प्रदूषन नियंत्रणासाठी उपाय योजना :

1) हवा प्रदूषण एक जागतीक समस्या असल्यामूळे हवाशुध्द करण्यासाठी मानवी प्रयत्नातून जगातील सर्व राष्ट्रांनी स्वकर्तुत्व भावनेतून प्रदूर्षनाची तिव्रता कमी करण्यासाठी उपकरणे विकसीत करणे, हवा संतूल, साधने, वृक्ष लावगवड मोठया प्रमाणात करणे, जंगल तोड थांबवीली, सामाजीक वनीकरण करणे, प्रत्येक वार्डात, गावात, शहरात मोठया प्रमाणात हरित क्रांती चळवळ राबवीणे, वाहनाच्या इंजीनची स्वतःहा देषभाल करून कमीत कमी हवा प्रदूषन होइल त्यामार्गचा अवलंब करणे, कोळशावर चालनारी इंजीने बंद करणे, सौरउर्जा, पवन उर्जाचा वापर करणे, त्याची निर्मीती मोठया प्रमाणात करणे, औद्योगीक क्षेत्राच्या ठिकाणी झाडे लावणे, प्रदूषन परिक्षणची यंत्रणा उभारून सर्वेक्षण करणे, हवा प्रदूषन वाढवीण्याऱ्या घटकासाठी कडक कायदे करणे, कायदेशीर मार्गाचा अवलंब करणे, समाजात जागृती

घडवून आनने, टाकावू पदार्थाची योग्य विल्हेवाट लावणे, धुम्रपान बंदी करणे, अणूस्फोट वर मर्यादा टाकणे, त्यांची अंमल बजावणी करणे, सर्वांनी एकजूटीने कार्य करून हे फक्त सरकारचे कार्यनसून मानवजातीचे कर्तव्य करणे ही भावना आवश्यक आहे.

2)पाणी प्रदूषन कमी करण्यासाठी पाणी आहे तर जीवन आहे. ही भावना प्रत्येक नागरीकात असते आवष्यक आहे. पाण्यातील कचरा कमी करण्यासाठी सामाजीक चळवळी राबवीणे. कारखान्यावर बंधने घालून पाण्यात रासायनीक कचरा टाकू नये, खंडडे करून उपाययोजना करावी. पाण्याचे परिक्षण वारंवार करावे, त्यासाठी काळजीघ्यावी. सांडपाणी विषारी द्रव्ये, जडपदार्थ, कचरा, तेलगळती या नियमांची कडक अंमलबजावणी करावी. जलशुध्दीकरण केंद्र सुरू करावे, मल, मूत्र पाण्यात टाकू नये, धार्मिक कार्यातून होणारे प्रदूषन थांबवावे.

3) ध्वनी प्रदूषन मूळे अनेक रोग होतात. त्यासाठी सरकारी नियम कडक करावे, जनतेत जागृती करून त्याग भावना जोपासावी, कारखान्याच्या प्रदूशनामूळे ध्वनी प्रदूषन होत असेल तर जंगल क्षेत्रात कारखाने उभारण्यता यावे, अवजड वाहने, कर्कश वाहने यावर रहिवासी भागात संचार बंदी करावी, आवाजाचा मर्यादीत वापर करावा, गोंगाटवर प्रतिबंध घलावा, वृक्ष लागवड करावी, इंजीन व्यवस्थेत बदल करून उपाय आखावेत, उद्योजकांवर नियमाची सक्ती करावी. वाहतूकीचे नियम कडक रावे, विमानतळ दूर असावे, उत्सव, कार्यक्रमात आवाजावर मर्यादा असाव्यात.

4) कचरा प्रदूशनामूळे अनेक आजारा होता त्यासाठी जनतेत जागृती घडवून आनने आवश्यक आहे. अनेक वस्तू अशा आहेत की त्यामूळे पून्हा वापर केला जाउ शकतो. प्लॅस्टीक बंदी ची सक्ती करावी. टाकावू, निरोपयोगी वसतू पासून पून्हा प्रक्रिया करून त्याचीउपयूक्तता सिध्द करावी, भंगार वाल्याला या वस्तू दयाव्यात, कागदारचा वापर जास्त प्रमाणात करावा, प्लॅस्टीक कचरा पासून रोड निर्मीती करावी, खेल खंडडा करून कचरा नष्ठ करावा, खत तयार करावे, खंडडे बुजवीण्यासाठी घनकचऱ्याचा वापर करावा, कचरा जाळून नष्ठ करावा, गॅस निर्मीती करावी, कंपोस्ट खन करून उत्पन्न मिळवावे.

5) रासायनीक व आष्वीक प्रदूषनामूळे अनेक रोग होतात. त्यासाठी खबरदारी घेउन किरणोत्यारी रसायने, आष्वीक पदार्थ निर्मनूष्य व सुरक्षित परिसरात खंडड करून गाडावीत. अणु चाचणीवर मर्यादा आनावतीत. लोकांमध्ये जागृती करून प्रशिक्षण दयावे. अणूशक्ती चे कार्य संगणकव्दारे करावे. आणि यंत्रे नेहमी दुरूस्तीकडे काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. अणूभटटी, रासायनी भटटी भोवती झाडे लावणे, पाणी फवारणी करावी.

6) वैयक्तीक सहभाकडे लक्ष देण्याचे प्रत्येक नागरीकाचे कर्तव्य आहे. स्वतःहा पुढाकार घेउन कचरा विल्हेवाट लावावी. नैर्सगीक साधन संपत्तीचा काळजीपूर्वक वापर करावा. कागदाचा, कागदी पिशवीचा वापर करावा. सांडपाणी ची प्रक्रिया व्यवस्थीत करावी. निसर्गाचे रक्षण करावे. कंपोस्ट खताचा वापर करावा, वाहनाचा वापर आवश्यकतेनुसार करावा. वाहनांची देखभाल करावी.

**फलनिष्पत्ती :**

आज पृथ्वीवरनील जी जीवसृष्ठी जिवत आहे त्याचा पर्यावरणाशी जवळाचा संबंध आहे. आज पर्यावरणावर सजीव घटकांची वाढ आणि आसतित्व अवलंबून आहे. कारण मानवी कारणामूळे सजीव गोष्टींना अनेक प्रकारची बाधा निर्माण झालेली दिसून येते त्यालाचा प्रदूषण असे म्हटले जाते. आज वातावरणात धुळ, वायू, हवा, धूके, या घटकामूळे सजीव घटकांना आणि प्राणीमात्रांना अनेक अपाय निर्माण झालेत. पर्यावरणातील अपायकारक घटकामूळे पर्यावरणाचे संतूलन बिघडलेले आज आपन पाहत आहे. त्यामधून सजी घेटकांना परिणाम भोगावे लागत आहे. आज मानवाच्या हव्यासापोटी, विकासापोटी नैसर्गीक साधन संपत्तीचा प्रचंड वापर सुरू आहे. त्यामधून धुळ, वायू, धूके, पाणी हवा प्रभावीत झाले यालाच परर्यावरण प्रदुषण म्हटले जाते. त्यामुळे जगावर त्याचे विविध परिणाम दिसून येतात. जर एखादया भागात विकासासाठी सूरू केलेले औद्योगीक क्षेत्र त्यामधून निघणारा धूर, वायू, द्रव्य, पाणी त्या भागाला संपूर्ण पणे पभावीत करतो. त्यामधून त्याभागाचे प्रदुषण निर्माण होउन मानवी जीवन प्रभावतीत होते. एकदा पर्यावरण प्रदूषण वाढले तर ते शुध्द करण्यचासाठी अनेक वर्ष मानवी प्रयत्न करावे लागतात. त्यासाठी मानवाने जागरूक राहणे आवश्यक आहे. हे प्रदूषण कमी करण्यासाठी अनेक उपाययोजना आहेत फक्त गरज आहे कडक कायदे, अंमलबजावणी आणि लोक सहभागाची. वैयक्तीक लक्षदेउत हा भाग, हा प्रांत हा समाज, हे राष्ट्र माझे आहे. माझे कर्तव्य निर्सगासाठी आहे. निसर्ग वाचल तर मी, माझा समाज माझा देश वाचेल ही भावना जनतेत असावी. जनतेने स्वतःहा पुढाकार घेउन हरित क्रांती चळवळ राबवावी आणि निसर्गतहा साधन संपत्तीचा वापर काळजीपुर्वक करावा तरच पर्यावरण वाचेल आणि आमची पृथ्वी सजीव राहिल नाहीतर या पृथ्वीवर सजीवसृष्ठी राहणार नाही.

56

## संदर्भ ग्रंथ सूची :


1. अरोरा अर.के. 1999 – एअर पोल्यूशन, प्रथमावृत्ती, मंगलदिप पब्लीकेशन्स, जयपूर.
2. ढाके एस.व्हि. आणि इतर 2005 – पर्यावरणशास्त्र, प्रथमावृत्ती, प्रशांत पब्लीकेशन्स, पूणे.
3. कोलते एस.एम. 2021 – व्यावसायीक पर्यावरण, प्रथमावृत्ती, पिंपळापुरे ॲण्ड कंपणी पब्लीशरर्स, नागपूर.
4. मैथी एस.के. 2003 – हॅन्डबूक ऑफ मेथड इन एनव्हायरमेन्ट, प्रथमावृत्ती, एबीडी पब्लीशरर्स, जयपूर.
5. घारापूरे विठठल 2005 – पर्यावरणशास्त्र, पिंपळापुरे ॲण्ड कंपणी पब्लीशरर्स, नागपूर.

National Multidisciplinary Conference on Emerging Trends, Opportunities and Challenges in Higher Education
International Journal of Scientific Research in Science and Technology
Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

57

# भारतीय स्त्रीवर्गाच्या आत्मभान, आत्मसन्मान व परिवर्तन घडवीण्यासाठी भारतीय स्त्री साहित्याचे योगदान एक ऐतिहासिक अध्ययन

प्रा.डॉ. एन. आर. वर्मा
इतिहास विभाग प्रमुख, श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महा., पुसद जि. यवतमाळ (महाराष्ट्र)

**सारांश :–**
प्राचीनकाळ, मध्ययुगीनकाळ, १९ व्या शतकापर्यंत भारतीय समाजव्यवस्था आणि संस्कृती यांनी स्त्रीवर्ग, स्त्रीजीवन यांना समाजाच्या चौकटीत बंदिस्त करून, शिक्षण, हक्क, अधिकार, स्वातंत्र या पासून दूर ठेवण्याचे कार्य केले. स्त्रीवर्गाने बोलू नये, विचार करू नये, मत मांडू नये, पति परायनाता करावी, घर संसार सांभाळावा, कुळाचार पाळावा हे स्त्रीजीवनाचे मूख्य कर्तव्य आहे. असे समाजमत, परंपरांगत विचार प्रवाह होते. म्हणून भारतीय स्त्री समाजव्यवस्था, नियम, परंपरा, कुप्रथाच्या ओझ्याखाली भरडली गेली. भारतीय समाजाने स्त्रीजीवनाचा कोंडमारा करून, सोशिकता ची परंपरा निर्माण केली. स्त्रीवर्ग काचेचे भांडे ही उपमा देउन स्त्री एक व्यक्ती, माणूस आहे, मत, भावना, इच्छा आकांक्षा आहेत हे सर्व नाकारले. स्त्री आपल्या घरात एक वस्तू, घर सांभाळणारी, अबोलआणि चुल व मूल या संकल्पनेत वावरणारी घटक बनली. या सर्व स्त्री दु:खाची, स्त्री कुंठताची, स्त्रीबंधनाची, सोशिकताची उदाहरणे स्त्रीवर्गाने आपल्या ग्रंथात, आत्मचरित्रात, साहित्यात मांडणी करून स्त्री जागृती, स्त्री परिवर्तनवादी वाटचाल करून दिली. भेदभाव का, विषमता का, शिक्षण का नाही, दुय्यम दर्जा का, स्वातंत्र का नाही, दु:खदायी वेदना का? समानता का नाही, एक समानता का नाही, हक्क अधिकार असायलाच पाहिजे, स्वातंत्र हवे, एक व्यक्ती म्हणून जगू दया, जूने विचार नको, कुप्रथा नको, स्वातंत्र्यता म्हणजे खैराचार नाही तर मानवतावाद आहे, दृष्टीकोन बदलने आवश्यक आहे. पुरूष मानसीकते मधून बाहेर पडा हा साहित्याव्दारे लिखीत मांडणी करून संदेश दिला. स्त्रीवर्गालाच ही सर्व दु:खे निर्माण होण्यास समाज, संस्कृती, परंपरा कारणीभूत ची चर्चा लिखीत मांडण्यात आली त्यामधून भावनेचा अविष्कार मांडून स्त्री आत्मसन्मानाने, आत्मभानाने पुढचे पाउल उचलत आहे, तिला खाजगी आयूष्य आहे, स्त्री जिवंत आहे, तिला मनभावना आहेत, स्व:हाचे आयुष्य, हक्क, अधिकार, निर्णय घेण्याचा तिला अधिकार आहे. मानवता, समानता हवी, जूने मूल्ये तकलादू आहेत. स्त्री स्वातंत्र्याकडे वाटचाल करीत आहे. ती एक व्यक्ती माणूस आहे हे भारतीय समाजाने, संस्कृतीने समजून घेणे आवश्यक आहे हे मंथन करण्यात आले.

**प्रस्तावणा :–**
प्राचीन काळ ते १९ वे शतक पर्यंत भारतीय स्त्री जीवन एक विशीष्ठ समाज चौकशीत बंदिस्त होते. भारतीय स्त्री जीवन एक गंभीर संशोधनाचा चिंताजनक विषय आहे. प्राचीन काळापासून समाजाच्या इतिहासात स्त्रीवर्गाची परवशता दिसून येते. स्त्रीवर्गासाठी वेगळे नियम दिसतात, वरिष्ठ, कनिष्ठ भावना, भेदभाव, दुय्यमदर्जा दिसतो. भारतीय समाज व्यवस्थेने स्त्रीवर्गासाठी स्वतंत्र्य, लोकशाही, शिक्षण, विवाह, पूनर्विवाह असे विषय पूर्वग्रह दुषीत ठेवण्याचे कार्य केले. समाज व्यवस्था अनिष्ठ प्रथांनी ग्रासली असल्याने स्त्रीवर्गाचे हक्क, अधिकार, स्वातंत्र, शिक्षण, बाजूला सारल्या जाउन स्त्रीवर्ग फक्त घरापूरती मर्यादीत झाली. भारतीय समाजाने समानता, एकता न मानता स्त्री एक घरदासी, घर सांभाळणारी वस्तू आहे हे समीकरण निर्माण केले. रूढी, परंपरा, कर्मकांड, कुप्रथा, संस्कृती च्या गोंडस नावाखाली स्त्रीवर्गाचा भयंकर छळ केला. त्या अन्याय, अत्याचार ला सीमा, मर्यादा नव्हती. पुरूष बलवान ही संकल्पना मांडून स्त्रीवर्गाने बोलू नये, मत मांडू नये, विचार करू नये, ही मानसीकता निर्माण केली. शेवटी स्त्रीवर्गानेच ग्रंथ, साहित्याव्दारे मते, विचार माडून आपले भावविश्वाची मांडणी समाजा समोर करून, जागृती घडवून आत्मभान, आत्मसन्मान, परिवर्तन, बदल घडून आनन्याचे कार्य केले.

**इतर ग्रंथाचे (साहित्याचे) विचार –**
ताराबाई शिंदे यांचे स्त्री पुरूष तूलना, पंडीता रमाबाई यांचे स्त्री धर्म निती, रमाबाई रानडे यांचे आमच्या अयूष्यातील काही आठवणी, सरोजिनी वैद्य यांचे श्रीमती काशिबाई कानिटकर आत्मचरित्र आणि चरित्रे, आनंदीबाई कर्वे यांचे माझे पुराण, पार्वतीबाई आठवले यांचे माझी कहाणी, यशोदाबाई जोशी यांचे आमचा जीवन प्रवास, सुधा अत्रे यांचे गोदातरंग, आनंदीबाई शिर्के यांचे साजवात, कानिबाई कानिटकर यांचे रंगराव, या सर्व साहित्यामधून स्त्रीवर्गाचे दु:ख, वेदना, छळ, दुय्यम वागणूक, बालविवाह, पुनर्विवाह, विधवा विवाह, स्त्रीजीवनाचे दु:खद सोशिकता, मन, इच्छा, भावना, स्त्री स्वातंत्र्याचा अभाव, पतिचे उदाहरणे, समज, गैरसमज, वेदीन हीनता, उध्दवस्तपणा, स्त्री–पुरूष समानता हवी, स्त्री समस्यावर उपाय, शिक्षित स्त्री चे समस्या, अर्थाज, छळवाद, मानसीकता, पुरूषी अहंकार, विरह, टोचून बोलणे, अनूभव, शिक्षणाचे परिणाम, का सहन करावे, स्त्रीही जिवंत माणूस व्यक्ती आहे, स्व:ताहाचे निर्णय घेण्याचा अधिकार का नको हे विचार मांडलेले दिसतात.
श्रीमती रमाबाई रानडे यांनी 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' या साहित्याव्दारे स्त्रीवर्गाने शिक्षण घ्यावे, पुनर्विवाह करावा, स्वावलंबी बनावे, सर्व बंधने स्त्री वर्गाला का आहेत हे मांडले. प्रतिभा रानडे यांनी 'स्त्री प्रश्नांची चर्चा करून साहित्याव्दारे स्त्रीजीवन दुय्यम, कनिष्ठ का

Copyright: © the author(s), publisher and licensee Technoscience Academy. This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution Non-Commercial License, which permits unrestricted non-commercial use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited

आहे मांडून स्त्रीजीवनाचे खरे वैरी कोण असा सवाल करून आपल्या साहित्याव्दारे चर्चा केली. सरोजिनी वैद्य यांनी 'श्रीमती काशिबाई कानिटकर आत्मचरित्र आणि चरित्रे' साहित्याव्दारे स्त्रीजीवनाचे दुःख, दारिद्रय व संकटे मांडली. एकंदरीत वरील स्त्रीवादी साहित्यात स्त्रीकडे पाहण्याचा दृष्ट्रीकोण परंपरागत होता हे दर्शवीण्याचे कार्य केले. शेवटी स्त्रीजीवनात आत्मभान व परिवर्तन निर्माण करण्यासाठी ऐतिहासिक अध्यायनाची आवश्यकता आहे.

रिसर्च वर्क :–

भारतीय स्त्रीवर्गाच्या आत्मभान व परिवर्तनासाठी स्त्री साहित्याव्दारे समाजात जागृती निर्माण करणे हे साहित्योच कार्य आहे. कारण शतकानुशतके स्त्रीवर्ग अन्याय, अत्याचाराच्या खईत पडला होता. स्त्रीवर्गाला आचार, विचार, बोलण्याचे स्वातंत्र्य नव्हते. अनेक प्रकारच्या सामाजिक बंधनात व मानसिकतेत स्त्रीवर्गाला जगावे लागत असे. भारतीय पुरूषप्रधान संस्कृतीने स्त्रीवर्गाचे जीवन जगणे कठीण केले होते. चूल आणि मुल या संकल्पनेत त्यांना रहावे लागत असे. पुरूषवर्गाने बाहेरची कामे करावी तर घरातली सर्व कामे स्त्री वर्गालाच करावी हा समाज मान्य प्रचलन होती. स्त्री वर्गाला निर्णय प्रक्रिया हा शब्द माहित नव्हता. पुरूष हा बलवान आहे ही संकल्पना पुरूष प्रधान संस्कृतीने निर्माण केली होती. प्राचीन काळापासून तर १९ व्या शतकापर्यंत रूढी, परंपरा, कर्मकांड, कुप्रथा च्या नावाखाली स्त्रीवर्गाला दुय्यम वागणूक देउन तिचे अधःपतन करण्यातआले. सर्व प्रकारचे अन्यायाचे भोग स्त्रीवर्ग सहन करत असे. समाजात अघोरी मानसीकतेतून स्त्री वर्गाचे स्वातंत्र हिरावण्याचे कार्य वर्चस्व गाजवीणाऱ्या पुरूष प्रधान मानसीकतेने केले त्याचा ऐतिहासिक अध्ययन करणे आवश्यक आहे.

१९ व्या शतकात सर्व प्रथम ताराबाई शिंदे यांनी स्त्री–पुरूष तलना या साहित्याव्दारे स्त्रीजीवनाचे प्रगटीकरण केले आणि भारतीय समाजातील दोष, विसंगती मांडून समाजात श्रेष्ठ कोण हा प्रश्न उपस्थीत केला. तत्कालीन स्त्री जीवनाचे दुखे, हालाकीची, गुलामीची स्थिती मांडून याला जबाबदार कोण हा प्रश्न केला. म्हणून स्त्री जीवनाचा खरा वैरी कोण याचे उत्तर समाजाने दयावे ही भुमिका मांडली. या साहित्याव्दारे ताराबाई शिंदे यांनी स्त्री जीवनाची दुर्दशा मांडून स्त्री जागृती घडवीण्याचे कार्य केले.

२० व्या शतकात श्रीमती रमाबाई रानडे यांनी स्त्री वर्गाने शिक्षण घेउन स्वावलंबी बनवीण्यासाठी कार्य केले. त्यांनी आमच्या आयुष्यातील काही आठवणी साहित्याव्दारे स्त्री जीवनाचे अंतर्गत प्रश्न मांडले. स्त्री जीवनालाच का अपशकून, अपमान, टवाळकी सहन करावी लागते याचे कारणे मांडली. शिक्षणा शिवाय स्त्री जीवनाचा उध्दार नाही ही शिकवण दिली. धर्मकार्य करणे म्हणजे स्त्री जीवन नव्हे हा संदेश दिला. स्त्री वर्गालाच सर्व बंधने का हा सवाल भारतीय समाजाला करून स्त्री वर्गात नवचैतन्य फूलवीण्याचे कार्य केले.

२० व्या शतकात प्रतिभा रानडे यांनी स्त्री प्रश्नाची चर्चा या साहित्याव्दारे स्त्री जीवन, हक्क, अधिकार, स्वावलंबी, शकून, अपशकून, टिंगल, बंधने मर्यादा ची जाणीव स्त्री वर्गाला करून दिली. स्त्री जीवनालाच केशवपन का, सतीप्रथा का, जून्या परंपरा का, बांगडी फोडणे का?, कुळाचार का?, सकेशा, विकेशा का?, जून्या परंपरा का, समाजाकडून उपेक्षा का, अज्ञानता का, असे अनेक प्रश्न निर्माण केले.

२० व्या शतकात श्रीमती काशिबाई कानिटकर यांनी डॉ. आनंदीबाई जोशी यांचे चरित्र व पत्रे या साहित्याव्दारे लिहले की, भारतीय समाजात स्त्री शिक्षीत नको होती. कारण घरची कामे कोण करणार हा प्रश्न होता. जर स्त्री शिक्षीत झालीतर संसार बिघडेल ही अनामीक भिती तेव्हा समाजाला होती. स्त्री जीवनाने मर्यदित, बंधनात रहावे, वडिलधारे मंडळीची जोपासना करावी हे समाजाचे समीकरण होते.

२० व्या शकतकात भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांची दुसरी पत्नी सौ. आनंदीबाई कर्वे यांनी माझे पुराण या साहित्याव्दारे स्त्री जीवनाचे उदाहरणे मांडली की, विधवा स्त्रीचे जीवन नरकमय असते. विधवा स्त्रीला भारतीय समाज अपशकून, नापिता, नवऱ्याला खाल्ले, मागच्या जन्मीचे पाप, भोग या शब्द हिनवत असे. म्हणून स्त्रीवर्गाने शिक्षण घ्यावे, स्वावलंबी बनावे हा मोलाचा सल्ला दिला. विधवा स्त्री जीवनाचे अंतरंग मांडून सौ. अनंदीबाई कर्वे यांनी स्त्री एक बेवारस वस्तू ही समाजाची विचार धारा मांडली. विधवा स्त्रीने हे खाउ नये, येथे झोपू नये, गोडखावू नये, चार चौघात येउ नये, शुभकार्य प्रसंगी जाउ नये अपशकून होईल असे समाजा चे वाईट नियमाचा परिचय करून दिला आणि स्त्री वर्गात समाजातील दोष दाखवून स्त्री वर्गाला जागृत करण्याचे कार्य केले.

२० व्या शतकात पार्वतीबाई आठवले यांनी माझी कहाणी या साहित्याव्दारे विधवा, स्त्री, केशवपन, चिता, सती, समाजमत, बहिष्कार, निर्जीव वस्तू, या शब्दाची व्याख्या स्पष्ट केली. तर डॉ. सरोजीनी बाबर यांनी श्रीमती काशिबाई कनिटकर आत्मचरित्र लिहून स्त्री वर्गाने कसे बोलावे, कसे वागावे, स्त्री शिक्षण का नको, समाजाच्या भितीचे कारण काय, स्त्री वर्गाने कोठे जावे, जावू नये, आवड, निवड, कुंकू बारिक असावे की मोठे, या समाज मत, समाज मन विषयी कठोर प्रहार करण्याचे कार्य कले आणि स्त्री आत्मभान कसे वाढेल, जागृती कशी होईल चा संदेश दिला. २० व्या शतकात इरावती कर्वे यांनी स्त्री वर्गात हक्क व अधिकारची जाणीव निर्माण करण्याचे कार्य केले. त्यांनी साहित्याव्दारे स्त्री मुक्ती घडवीण्याचे कार्य केले. त्या भारतल्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या सून असल्याने स्त्री शिक्षणाचे महत्व त्यांना मान्य होते. म्हणून त्यांनी स्वःताहा ला पटेल रचेल त्या पध्दतीने स्त्री जीवनाचे स्वातंत्र्याचे अंतरंग मांडले. इरावती कर्वे यांनी युगांन्त, भोवरा, मल्हार, या कादंबरी व्दारे स्त्री मुक्तीचा स्वातंत्र्यवाद मांडला. स्त्री वर्गाला दुय्यम दर्जा का? स्त्री वर्गाला लहान पणापासून कशी वागणूक मिळते याचा उहापोह केला. स्त्रीवर्ग स्वतंत्र असावा ही त्यांची संकल्पना होती. म्हणुन समाजाचे नियम, बंधने, प्रथा त्यांना मान्य नव्हत्या. त्या स्त्री स्वतंत्र्याचे पुरस्कर्ते होल्या. स्त्री एक स्वतंत्र व्यक्तीमत्व आहे. स्त्री एक माणूस आहे. हे विचार त्यांनी साहित्याव्दारे मांडण्याचे कार्य केले आणि स्त्री वर्गात स्वातंत्र्याचे प्रतिबिंब निर्माण करून, भविष्याचा वेध घेण्याचे आवाहन केले.

२० व्या शकतकात लक्ष्मीबाई टिळक यांनी आपल्या स्मृतिचित्रे या साहित्याव्दारे तत्कालीन बाल विवाह, विवाह, स्त्री शिक्षण, संबंधी विचार मांडून भारतीय समाजाचा कर्मठपणा, परंपरा, मूल्ये, रूढी चे दाखले दिले. स्त्री जीवनाला सुध्दा मते असावे, स्त्री वर्गाने मते मांडावीत असा सल्ला दिला आणि स्त्री जागृती घडवीण्याचे कार्य केले.

59

एकंदरीत भारतीय स्त्री वर्गाचे साहित्याव्दारे आपल्यावर होत असलेला अन्याय, अत्याचार, दुय्यम दर्जाची भुमिका कधी आहे मांडून समान हक्क, समान अधिकार, समान दर्जा, सामान स्वातंत्र आम्हाला असावेत ही संकल्पना मांडण्याचे कार्य केले. स्त्री साहित्याने स्त्री—पुरूष भेदभाव समाप्त झाला पाहिजे हे मांडून भेदभाव करणाऱ्यावर कठोर शब्दात टिका केली. स्त्री वर्गाला काय पाहिजे याचा अभ्यास करण्यास पुरूष प्रधान संस्कृतीला साहित्याव्दारे भाग पाडण्याचे कार्य केले. स्त्री वर्गाने फक्त ऐकावे, बोलू नये हे आता समाप्त झाले पाहिजे. पुरूष देणारा ही भूमिका स्त्री वर्गाला आता मान्य नाही. पुरूष केंद्रीत व्यवहार आता समाप्त झाले पाहिजे. मी च्या ऐवजी आता आमचे दोघांचे ही संकल्पना समाजात रूढ झाली पाहिजे हीच स्त्री स्वातंत्र्याचे फलीत होय. भुतकाळात स्त्रीने भरपूर रडून घेतले आहे. आता २१ व्या शतकात ती सर्व अर्थाने परीपूर्ण आहे हा संदेश साहित्याव्दारे दिसतो. चूल आणि मूल हे समीकरण आता बदलून स्त्री वर्गाचे कार्यक्षेत्र बाहेर आहे हे समाजमत निर्माण करणे, स्त्री आपले जीवन आपल्या पायावर जगू शकते, स्त्री कोणत्याच क्षेत्रात कमी नाही, स्त्री आता जागृत झाली. तिच्यात स्वभावनांचा अविष्कार निर्माण झाला असून ती साहसी, धाडसी आहे, तीचे दु:ख ती समाप्त करू शकते, भेदभाव तीला आता मान्य नाही, आपल्या कर्तुत्वाचा ठसा ती समाजात निर्माण करू शकते, स्त्रीला आता आत्मभान आले, निर्माण झाले आणि परिवर्तनाकडे तीची वाटचाल सुरू आहे. हाच दृष्टीकोन बदलण्याचे आवाहन स्त्री वर्गाने सर्वांना केले आहे. प्रचंड आशा आकांक्षाची स्वप्ने घेउन स्:ताशी व इतरांशी संघर्ष करीत स्त्री स्वातंत्र्याच्या हकासाठी एक माणूस म्हणून जगू दया ची संकल्पना पूर्ण करण्यासाठी घडपडते आहे.

फलनिष्पती —

प्राचीन कालखंडापासून भारतीय स्त्री वर्गाकडे पुरूषप्रधान संस्कृतीचा, समाज व्यवस्थेचा पाहण्याचा दृष्टीकोण बऱ्याच प्रमाणात परंपरागत, दुय्यम दर्जाप्रमाणे होता. भारतीय स्त्री जीवनावर अनेक प्रकारचे दु:खदायी आघात करण्यात आले. भारतीय स्त्री एक बेवारस वस्तू प्रमाणे तिला घरात वागणूक मिळत असे. भारतीय पुरूष प्रधानतेने स्त्रीवर्गाला शिक्षणापासून वंचीत ठेवून अबोल केले. स्व:ताहाचे अपयश झाकण्यासाठी स्त्रीवर्गावर अकारण वर्चस्व गाजवीले. संस्कृतीच्या नावाखाली रूढी, पंरपरा, कर्मकांडे, कुप्रथा निर्माण करून प्रतिगामी, यातना देण्याचे कार्य केले. प्राचीन काळापासून १९ व्या शतका पर्यंत स्त्री जीवनाचा संबंध पतिपरमेश्वर सत्य मानून पतिकुटूंबाशी आपले जीवन अर्पण करणे, प्रसंगी अनेक व्यवहाराशी त्याग करणे, पतिव्रता पाळणे तिळ तिळ दु:ख भोगणारी, सेवा करणारी, मुकाटयाने सहन करणारी, अश्रू ढाळणारी, चाकोरीत राहणारी, सोशीक स्त्री म्हणजे भारतीय स्त्री अशी जीवन पध्दत निर्माण केली.

शेवटी स्त्रीवर्गाने आपले साहित्य स्व:ताहा लिहून आपले दु:ख चव्हाटयावर मांडले. साहित्याव्दारे शिक्षण, विवाह, पूर्नविवाह, संमतीवय, सामाजिक बंधने यावर लिखान होउ लागले. अनेक स्त्री साहित्यात स्त्री वर्गाच्या मनातील ताणतणाव, स्त्री दु:ख, बंधने, स्वातंत्र्याचा अभाव, विवाहनंतर पतिवर्गाचा छळ, निर्माण होणाऱ्या समस्या, शिक्षित, अशिक्षीत स्त्री वर्गाचे प्रश्न, स्त्री वर्गाचे हक्क अधिकार, बदललेली स्त्री प्रतिमा, आत्मभान, आत्मसन्मान, मनभावना, स्त्रीजीवन माणूस आहे, तिचे खाजगी आयूष्य, मैत्री, प्रेम, भावना, जून्या मूल्यावर, विचारावर लेखन सुरू झाले.

त्यामधून स्त्रीमनाचे अंतरंग मांडण्यात आले. त्यामधून स्त्री—पुरूष समानता ची संकल्पना स्पष्ट करण्यात आली.यामध्ये सौराचार नसून स्त्री स्वातंत्र्याची, स्त्री आत्मभानाची, स्त्री परिवर्तनाची व्याख्या मांडण्यात आली. समान वाटा, समान संधी, पुरूष वर्गाने स्त्री वर्गाच्या भावना समजावून घेणे ती एक माणूस आहे, व्यक्ती आहे आणि नवा मानवतावाद अभिप्रेत असून स्त्री विकासाला पूर्ण वाव मिळणे आवश्यक आहे.

संदर्भ ग्रंथ व टिपा :


१. रानडे प्रतिभा २००५ — स्त्री प्रश्नाची चर्चा — प्रकाशक — पदमगंधा प्रकारान, पुणे
२. रानडे रमाबाई २०१२— आमच्या आयूष्यातील काही आठवणी — प्रकाशक — समन्वयक प्रकाशण कोल्हापूर,
३. वैद्य सरोजीनी १९८०— श्रीमती काशिबाई — कानिटकर आत्मचरित्र आणि चरित्रे — पापूलर प्रकाशन, मुंबई
४. डॉ. कर्वे स्वाती २००८— स्त्री विकासाचे नवे क्षितीज — प्रकशक — प्रतिमा प्रकाशन पुणे
५. डॉ. वैद्य सुमन, डॉ. कोठेकर शांता २००४— स्वातंत्र भारताचा इतिहास (१९४७ ते १९८६) प्रकाशक — साईनाथ प्रकाशन नागपुर
६. डॉ. पाटील भिना २००५ — खांदेशातील समाज प्रबोधनाची चळवळ (१९०० ते १९५०) प्रकाशक — भुषण पाटील पाचोरा (जळगांव)
७. महाराष्ट्र शासन अभ्यास मंडळ २०१२ — महाराष्ट्राचा इतिहास — प्रकाशक — महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे —
८. डॉ. पगार एकनाथ २००६ — प्रबोधन पंरपरा व वृत्तपत्र सृष्टी — प्रकाशक — यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक
९. संपादक मंडळ २००१ — स्वातंत्र्य उत्तर वाडमयीन प्रवाह — प्रकाशक कुलसचिव यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक,
१०. संपादक २०१२ — शिक्षण संक्रमण (मासिक मार्च २०१२)
११. संपादक २०१२ — मिळुन साऱ्याजनी (मासीक मार्च २०१२)
१२. ढहाके वसंत आबाजी २००५ — मराठी साहित्य इतिहास व संस्कृती प्रकाशक — पापूलर प्रकाशन, मुंबई